


म. ग्रं. सं. ठाणे

विषय

सं. क्र.

REFBK-0009872


# राजा शिव छत्रपति

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक 28820
REFBK-0009872

## भाग तिसरा : अफजल–मोहीम

चित्रकार — श्री. दलाल
मुद्रण — आनंद
प्रकाशन — राजहंस

मूल्य रु. तीन फक्त
सर्वाधिकार स्वाधीन

प्रकाशक : ब. मो. पुरंदरे, राजहंस प्रकाशन, १५०० सदाशिव, पुणें २.
मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणें २.

विजयादशमी
२१ ऑक्टोबर १९५८

प्रिय वाचक,

'राजा शिवछत्रपति' या माझ्या सत्यकथनरूप शिवचरित्राचा हा तिसरा भाग. यांत महाराजांचा जावळीवरील कबजा, स्वराज्याच्या आरमारी सिद्धतेचा प्रारंभ, अफझलखानाची मोहीम व प्रतापगडचा इतिहासाला कलाटणी देणारा विजय येथवर कथाभाग आहे.

हा कालखंड सुमारे १० वर्षांचा आहे (इ. स. १६४९–१६५९).


या माझ्या प्रदीर्घ शिवचरित्राच्या एकूण स्वरूपाविषयी माझी भूमिका काय आहे ती मीं सविस्तरपणें पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत सांगितलेलीच आहे. अधिक कांही सांगण्यासारखें नाही.

बहूत काय लिहिणें? आमचें अगत्य असो द्यावें.

**ब. मो. पुरंदरे**

# अनुक्रमणिका


- महाराज ५
- जावळीच्या जाळींत १६
- कऱ्हे पठार २७
- दर्यासारंग ४१
- बडी साहेबा ५०
- अफजलखान ६०
- तुळजाभवानी ६९
- कान्होजी जेधे ७८
- हेजीब ९६
- प्रतापगड ११४
- महाराज १४४
- शाहीर अज्ञानदास १५४



जय भवानी

प्रतापगिरीचे ठायीं । आदिशक्ति विराजते
कामना पुरती तेथें । प्रचीति रोकड्या जनीं ॥



किल्ले प्रतापगड

अफजल बुरुज



स्थळप्रत
दि. 12-2-58
८८०२

# १ : महाराज

गड कोंढाणा म्हणजे स्वराज्याच्या तळहातावरचा भाग्याचा तीळच. स्वराज्य अगदी तळहाताएवढेंच होतें. पंचवीस कोस लांब आणि बारा कोस रुंद. बस्स् ! एवढेंच ! कोंढाणा किल्ला स्वराज्याच्या ऐन मध्यावर तिळासारखा झळकत होता. परंतु अखेर तो कोंढाणा हातचा गेलाच. शहाजीराजांना बादशाहानें कैदेंत ठेवलें अन् सोडलें तेव्हा, ‘ तुमच्या शिवाजीने घेतलेला कोंढाणा परत करायला सांगा ’ असा बादशाहानें आग्रह धरला. वडिलांच्या सुटकेसाठी शिवाजीराजांना कोंढाणा हातचा सोडावा लागला. फार वाईट वाटलें त्यांना.

फत्तेखानाच्या स्वारीमुळे शिवाजीमहाराजांच्या सर्व सौंगड्यांत जबर आत्मविश्वास निर्माण झाला. आपण बादशाही सरदारांपेक्षा पराक्रमांत वरचढच आहोंत आणि हें स्वराज्य आपल्याच हातून निर्माण होणार आहे, अशी मनोमन साक्ष सर्वांना पटली. फत्तेखानासारखा फौजबंद शाही सरदार मारून झोडून पार उधळून लावायचा म्हणजे काय हलकी गोष्ट झाली ? पण तीहि महाराजांच्या मूठभर मित्रांनी करून दाखविली.

तरीपण शहाजीराजांच्या कैदेमुळे स्वराज्याच्या घोडदौडींत अडथळाच निर्माण झाला. महाराजांनी वडिलांची सुटका करणें बादशाहाला भाग पाडलें खरें; परंतु बादशाहानेंहि शहाजीराजांना कैदेंतून मुक्त करून लगेच कर्नाटकांत पाठविलें नाहीं. विजापुरांत राहवून घेतलें. त्यामुळे महाराजांना मावळांत बादशाहाविरुद्ध कांहीहि गडबड करतां येईना. काय सांगावा त्याचा नेम ! एखादे वेळीं बादशाह पुन्हा शहाजी-

राजांना कैद करायचा ! दगाबाजीची जन्मखोड त्याला ! म्हणून कांही काळ महाराजांना शांत राहूनच काढावा लागला. त्यांच्या सौंगड्यांची मात्र चुळबूळ चालली होती.

महाराजांचें राजधानीचें ठिकाण आता वरेंचसें बांधून झालें होतें. राजधानीला जागा फार चांगली निवडली त्यांनी. किल्ले राजगड. जिजाबाई आईसाहेबांनाहि गड फार आवडला. अन् खरोखरच राजगडासारखा गड राजगडच. गडाचें माथें आभाळाला टेकलें होतें. तटबंदी शंकराच्या जटेंत बसलेल्या नागासारखी वळसे घेत घेत गडाच्या मस्तकाला बिलगून बसली होती. शेषाच्या फण्यासारखे दरवाजे होते. गडाला तीन माच्या, एक उंचच उंच बेलाग बालेकिल्ला, दोन राजवाडे, दोन सदर कचेऱ्या, तीन तलाव, नगारखाना, तोफखाना, शिलेखाना वगैरे अठरा कारखाने; कारभाऱ्यांना, सरदारांना व गडकऱ्यांना राहाण्यासाठी घरें; भवानी, महादेव, मारुती, बहिरोबा वगैरे देवतांचीं देवालयें; गुहा, भुयारें, खलबतखाने, पागा, वगैरे गोष्टी महाराजांनी थाटाच्या केल्या. थाटाच्या म्हणजे मराठमोळ्या थाटाच्या! दिल्ली—आग्र्याची श्रीमंती आणि मिजास येथे चुकूनहि दिसायची नाही.

महाराजांनी राजगडचा बालेकिल्ला तर असा विलक्षण अवघड बांधून ठेवला की, बालेकिल्ल्यावर चढून जाणें म्हणजे जिवावरचें काम ! ताठ उभ्या कड्यावर शिडीसारखें चढून जायचें. वीतभर लांब अन् चार बोटें रुंद आकाराच्या पायऱ्या खोदल्या होत्या. जर का थोडीसुद्धा हात पाय ठेवण्यांत गफलत झाली तर मरणच ! महाराजांची वानरसेना मात्र सर सर सर गड चढून जात असे.

गुन्हेगार कैद्यांनाहि गडाच्या बांधकामाचे धोंडे वाहावयास लावीत होते.

महाराजांचें लक्ष स्वराज्याच्या सर्वच अंगांना होतें. शेती, सैन्य, किल्ले, शस्त्रें, हेर, न्याय, वसुली, देवस्थानें, परराज्यांतील बातम्या वगैरे

अनेक बाबतींत एवढ्याशा वयांतच महाराजांनी बारीक लक्ष ठेवलें होतें.

पुण्याजवळ कोंढवें नांवाचें गाव आहे. तेथे महाराजांनी धरणाचें बांधकाम करून लोकांना पाण्याचा पुरवठा करण्याची योजना मनाशीं आखली. खोदकाम सुरू केलें.[१] उकरतांना मोठी थोरली धोंड लागली. ती प्रचंड धोंड पहारींनी व घणांनी फोडून काढल्याशिवाय पुढचें कामच चालणें अशक्य होतें. महाराजांनी हें अतिशय त्रासाचें काम येसाजी पाटील कामथे नांवाच्या मराठ्यावर सोपविलें. ' मी परत येईपर्यंत ही प्रचंड धोंड फोडून अडथळा दूर कर ! ' असें त्याला सांगून महाराज कोंढव्याहून गेले. दुसरीकडचें काम उरकून कांही दिवसांनी महाराज परत कोंढव्यास आले. महाराज यायच्या आंतच येसाजी पाटलाने ती अगडबंब धोंड फोडून काढून, अडथळा पार होता की नव्हता करून टाकला होता. एवढा मोठा खडक फोडून अडथळा दूर केलेला पाहून महाराज येसबावर निहायत प्रसन्न झाले. येसबाची पाठ थोपटून ते त्याला बक्षीस म्हणून रोख रक्कम देऊं लागले. तेव्हा येसबा महाराजांना म्हणाला की, 'मला पैसे नकोत. जर मला कांही द्यायचेंच असेल तर धान्य देणारी जमीन द्या ! पैसे खर्च होऊन जातील ! ' महाराजांनी खूष होऊन येसबाला जमीन बक्षीस दिली.[१] याच येसबाच्या भावाला बादशाही अंमलदारांनी पूर्वी कोंढाण्यावर नेऊन ठार मारून टाकलें होतें ![१] आज महाराज येसबाची पाठ थोपटून गौरवाने चांगलीशी जमीन त्याच्या पदरांत घालीत होते. स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य, महाराज आणि सुलतान यांतील हा होता फरक !

महाराज आपल्या प्रजाजनांना केवळ तलवारीला धारा लावण्याचेंच हुकूम देत नसत. शस्त्रांच्याच जोडीला समृद्ध शेती असावी म्हणून ते यत्न करीत. त्यांनी कोंढव्याजवळ जसें एक धरण बांधलें, तसेंच शिवापुरांतील बागायतीसाठी शिवापुराजवळहि एक[११] धरण बांधलें. पंत

दादाजी कोंडदेवांनी घालून दिलेली धारावसुलीची, तगाइची आणि सरकारी मदतीची पद्धत त्यांनी चालू ठेवली होती. प्रजेने आंव्याची, चिंचांची, लिंबांची, डाळिंबाची वगैरे नानापरीच्या उपयुक्त वृक्षरायांची लावणी करावी म्हणून महाराज प्रोत्साहन देत होते. अशीं झाडें लावावयासाठी शेतकऱ्यांना सरकारी जमिनी देत होते. लावलेल्या झाडांच्या उत्पन्नाचा एकतृतीयांश भाग राजवांटा म्हणून सरकारांत द्यावा असा त्यांनी नियम केला होता.[२] महाराष्ट्राचें स्वराज्य आणि संसार याच प्रयत्नांतून समृद्ध होत होता.

गोरक्षण व गोसंवर्धनावर महाराजांचें फार लक्ष असे. ते स्वतःला गोब्राह्मणप्रतिपालक म्हणवीत.[३] कायदा न करतां किंवा हुकूम न काढतांच गोहत्या बंद झाली होती. आता या लहानशा स्वराज्यांतील गाईवासरें सुखांत होतीं. बादशाही राज्यांत कोणाहि सरकारी ठाणेदारांनी, चोरांनी वा खाटकांनी लोकांचीं गाईवासरें लुटून–पिटून न्यावीं अशी बेबंदशाही चालत होती.[४] पण आता स्वराज्यांत गुरांचे गोठे निर्धास्त नांदत होते.

महाराजांनी राज्यकारभाराच्या बाबतींत पंत दादाजी कोंडदेवांचा कित्ता समोर ठेवला होता. पंतांनी पर्वतीच्या शिवारहद्दींतील अंबील ओढ्याला लहान लहान धरणें आणि पाटबंधारे घातले होते. शेतीच्या, गावकीच्या, सरकारी कामकाजांच्या, न्यायदानाच्या, सज्जनसेवेच्या, शिस्तीच्या आणि सगळ्याच कारभारांत महाराजांनी कैलासवासी दादाजीपंतांच्या रेघेखाली रेघ अन् दोरीखाली दोरी धरली होती. पंतांचा ओळंबा व्यवहाराला सोडून कधीच सरकत नसे. महाराजांचें वागणेंहि अगदी तशाच ओळंब्यांत असे. खरोखर काय सांगावी पंतांच्या कारभाराची कीर्त ? दादाजी कोंडदेव तसा लहानसाच ब्राह्मण, लहानसाच कारकून. कोण्या शाही दौलतीचा वजीर नव्हे, सदरेजहाँ नव्हे, की

कायदेआझमहि नव्हे; पण त्याने केलेले इन्साफ थोर थोर बुद्धिवंतांसहि मंजूर झाले. शाहजादा औरंगजेबासहि मान्य जहाले ! औरंगजेब म्हणत असे की, दादाजी कोंडदेवाने केलेली न्यायमनसुबी आणि दिलेले इन्साफ बहुत बहुत उत्तम आहेत !

पंतांच्या चेल्याने पंतांच्याहि कित्त्यावर ताण चालविली होती. आज पंत असते तर संतुष्टच झाले असते. शिष्यादिच्छेत् पराजयम् !

न्याय चोख मिळत होता. महत्त्वाचे तंटे गोतसभेच्या समोर साक्षी-पुरावे घेऊन गोतसभेच्या निर्णयानेच सुटत. जर तेथे समाधान झालें नाही तर फिर्यादी माणूस थेट महाराजांपर्यंत जाऊन न्याय मागूं शकत असे. विनवशिल्याने हीं कामें घडत ! साक्षी-पुरावा अपुरा असेल तर दिव्य करून निकाल सांगितला जाई. जो दिव्यी खरा ठरेल त्याला सत्पक्षी समजून न्यायनिवाडा केला जाई. काजींना कायमची रजा मिळाली होती. चोऱ्या, दरवडे, खून, मारामाऱ्या, जाळपोळी वगैरे गुंडगिरीला एकदम आळा बसला होता. हें आपलें राज्य आहे, म्हणजेच स्वराज्य आहे, याचा साक्षात्कार सर्वांस होऊं लागला. लोक म्हणूं लागले की, हें देवराज्य आहे.

अवघ्या तीन वर्षांत बारा मावळांचें रूप एवढें पालटलें.

पण खरीं दिव्यें पुढेच होतीं. महाराजांची व त्यांच्या मित्रांची, वाटेल तीं दिव्यें करायची तयारी होती. ते अत्यंत आतुरच होते. आणि याच वेळीं एक बळीराम महाराजांना कायमचा येऊन सामील झाला. कान्होजी नाईक जेधे देशमुख. शहाजीराजांना जेव्हा अटक झाली तेव्हाच मुस्तफाखानाने कान्होजी जेधे व त्यांचे कारभारी दादाजी कृष्ण लोहोकरे आणि रत्नाजी दादाजी लोहोकरे या तिघांनाहि कैद करून कनकगिरीस ठेवलें होतें. तेथे दादाजी लोहोकऱ्यांचा मुलगा रत्नाजीपंत हा कैदेंत मरण पावला.[५] पुढे शहाजीराजे विजापुरास मुक्त झाले

( दि. १६ मे १६४९ ), त्याच वेळीं कान्होजी व दादाजी हेहि सुटले. आपल्यामुळे कान्होजीसारख्या निष्ठावंताला व दादाजी लोहोकऱ्यांना तुरुंग भोगावा लागला याचें राजांना फार वाईट वाटलें. पण आता उपाय काय? राजांनी कान्होजींना बोलावून गुप्त मसलत केली आणि म्हटलें,[५]

" मावळ प्रांती तुम्ही वतनदार जबरदस्त आहा. चिरंजीव राजश्री सिवाजीराजे पुणा आहेत. त्यांकडे जमेतीनसी तुम्हास आम्ही पाठवितो. तेथे इमाने सेवा करावी. कालकालावरी लक्ष ठेवोन, जिवावरी श्रम करून त्यापुढे खस्त व्हावे. तुम्ही घरोवियातील मायेचे लोक आहा. तुमचा भरोसा मानून रवाना करितो. इमाने वर्तावे. अवघे मावळचे देशमुख देखील त्यांसी रुजू होऊन त्यांचे आज्ञेत वर्तेत यैसा विचार करून जबरदस्तीने राहावे. येखादी मोंगलाईकडील फौज, इदिलशाहीकडील फौज आली तरी आपण इमान राखावा. त्यांसी लढाई करावी."

महाराज शहाजीराजे असें बोलल्यावर लगेच कान्होजींनी बेलरोटीची आण घेतली.[५] शपथ वाहून कान्होजी म्हणाले की, शिवाजी महाराज-साहेबाचे पायासी इमानानें वर्तूं. नंतर मग राजांनी कान्होजींना व दादाजीपंतांना वस्त्रें देऊन त्यांचा मान केला.[५]

लौकरच कान्होजी व पंत पुण्याकडे निघाले. तेव्हा राजांनी चिरंजीव शिवबाकरिता पत्रें व हुजरे देऊन कान्होजींच्या बरोबर दिले व दोघांनाहि निरोपाचीं पानें दिलीं.[५]

कान्होजी पुण्याकडे निघाले ते अशी शपथ घेऊन की, आता बाच्छावाची सेवा करायची नाही ! कान्होजींच्या वाजीने तर आधीच, ' बापास न पुसतां'[१] फत्तेखानावर पराक्रम गाजविला होता.[१०]

शहाजीराजांनी पाठविलें आणि कान्होजी जेधे मावळांत आले. पुण्यांत ते शिवाजी महाराजांना भेटले. आपली चांगली निवडक माणसें त्यांनी

स्थळप्रत.
28840



महाराजांच्या हवालीं केली. शिवाय अनेक वीर महाराजांनी वेचून मिळविले होते. नवीन नवीन मिळवीत होते. टिपून, निवडून, पारखून, घडवून ते एकेकाला अचूक कोंदणांत बसवीत होते. कान्होजींच्या येण्यामुळे महाराजांचें बळ परातभर वाढलें.

यावेळीं विजापूरच्या बादशहाचें लक्ष जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांवर गेलें. आधीपासून गेलेलेंच होतें. पण शहाजीराजांच्या अटकेच्या प्रकरणामुळे जावळीवरचें लक्ष जरा ढळलें होतें, त पुन्हा खिळलें. कर्दीम चंद्रराव मोरे वारल्यानंतर, चंद्ररावाच्या विधवा बायकोने महाराजांच्या पाठबळावर यशवंतराव मोरे नांवाच्या पुरुषाला जावळीच्या गादीवर बसविलें. वास्तविक मोरे हे विजापूरच्या आदिलशाहीचे सरदार. जर एखादा ‘ चंद्रराव ’ निपुत्रिक मरण पावला तर नवा वारस कोणीं ठरवायचा ? त्याला ‘ चंद्रावा ’च्या गादीवर कोणीं बसवायचें ? हा अधिकार कोणाचा ? उघडच होतें की, हा अधिकार आदिलशाह बादशाहाचा होता. परंतु दोन वर्षांपूर्वी मरण पावलेल्या दौलतराव चंद्ररावाच्या विधवा बायकोने शिवाजीराजांच्या पाठबळावर यशवंतराव नांवाच्या पुरुषाला जावळीच्या गादीवर ‘ चंद्रराव ’ म्हणून बसविलें. म्हणजे बादशाही सरदार—जहागीरदारांच्या गादीचे वारस बादशाहाच्या मान्यतेने ठरण्याऐवजी या बंडखोर पोरट्याच्या मान्यतेने ठरूं लागले. हें बादशाहाला आवडलें नाही. पण त्याने शिवाजीराजां-बद्दल एक अक्षरहि न उच्चारतां परस्पर नव्या चंद्ररावाचें उच्चाटन करून जावळी जप्त करण्याचें ठरविलें. जावळीची दौलत, ‘ गैरी लोकीं पैस करून बळकाविली आहे ! ’ असें बादशाहाने जाहीर केलें व ती जप्त करण्याची कामगिरी आपला प्रख्यात सरदार अफजलखान याच्यावर सोपविली.

अफजलखान जावळीच्या नव्या चंद्ररावाला दौलतीसह खलास

करण्यासाठी निघाला. ही त्याची स्वारी चंद्रराव मोऱ्यांच्यासाठी होती. शिवाजीराजांविरुद्ध नव्हती. खानाला जावळीची कीर्ति माहीत होती. भयंकर डोंगरांची, अत्यंत निबिड अरण्यांनी आणि दऱ्यादरडींनी वेढलेली जावळी म्हणजे वाघांची जाळी होती. तेथे मोहीम करणें अतिशय कष्टाचें होतें. खानाने येतां येतांच पहिली डरकाळी फोडली की, ' कदीम चंद्रराव मयत झाल्यावर जावळीची दौलत, गैरी लोकीं पैस करून बळकाविली आहे !' म्हणजे वेहक्कदारांनी बादशाह हजरत आदिलशाहांच्या मंजुरीशिवायच जावळी बळकाविली आहे. म्हणून ती ताब्यांत घेण्यासाठी आपण आलों आहों. खानाने आपल्या मोहिमेचा असा डौल घालून तयारी चालविली ( जुलै १६४०. ).

अफजलखानाला या अवघड मुलखांत शिरण्याचें जिवावर येत होतें. परस्पर फौजा पाठवून जावळी घ्यावी असें त्यांचें मन म्हणत होतें. म्हणून खानाने कान्होजी जेध्यांनाच हुकूम पाठविला की, तुमच्या स्वतःच्या सैन्यानिशी जावळीवरच्या मोहिमेसाठी या. पण कान्होजी जेधे आता एका पक्क्या गुरूचे पक्के चेले बनले होते. त्यांनी महाराजांशीं मसलत केली आणि खानाशीं नुसताच पत्रव्यवहार चालू ठेवला. खान त्यांची वाट पाहात होता. पण तेवढ्यांत बादशाहाचा अफजलखानालाच हुकूम आला की, कर्नाटकच्या मोहिमेंत तुम्ही सामील व्हा. त्यामुळे खान कर्नाटकांत निघून गेला व जावळीवरची मोहीम बारगळली. अशा प्रकारें जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांवर आलेलें संकट टळलें. जावळी आणि चंद्रराव बचावले.[६]

पुरंदरगडावरून अकस्मात् बातमी आली की, महादाजी नीळकंठराव सरनाईक वारले ( दि. २३ मे १६५४ पूर्वी ). महाराजांना वाईट वाटलें. पंत फार चांगले होते. शहाजीराजांवर व शिवाजीराजांवर त्यांचें फार प्रेम होतें. सासवडजवळ चांबळी गावची इनामदारी पंतांकडे होती.

आजवर पंतांनी पुरंदरची परवरीश तारफेची केली. फत्तेखानाच्या वेळीं महाराजांवर अवघड घटका आलेली पाहून पंतांनी महाराजांना पुरंदर किल्ल्यावर सैन्यानिशी घेतलें. जर पंतांनी पुरंदर किल्ला महाराजांच्या दिमतीला दिला नसता तर फत्तेखानाविरुद्ध लढणें महाराजांना जड गेलें असतें. असा चंदनी हाडाचा म्हातारा हयातीच्या अखेरीसहि महाराजां-करिता झिजला.

ते पंत सरनाईक वारल्याचें समजतांच महाराजांनी त्यांच्या चौघां मुलांस दुखवटा पाठविला. कर्नाटकांत नुकत्याच गेलेल्या शहाजीराजांनाहि त्यांनी पत्राने ही गोष्ट कळविली. तेव्हा राजांचेंहि दुखवट्याचें पत्र पंतांच्या पुत्रांस आलें. राजांनी लिहिलें,[७]

"राजश्री नीळकंठरावास देवाज्ञा जहाली म्हणौनु लिहिलें. बहुत अनुचित जहाले. श्रीच्या करणीस कांही चालत नाहीं. तुम्ही विवेकी आहां. नीळकंठराव जैसे कांही चालत होते तेच रीतीने वर्तणे. तुम्ही सूज्ञ आहां. समाधान असो दीजे."

महादाजी नीळकंठराव मरण पावले, त्यामुळे पुरंदरच्या सरनाइकीचा प्रश्न उभा राहिला. पंतांचे चार पुत्र निळोपंत, शंकराजीपंत, विसाजपिंत, व त्र्यंबकपंत हे आपसांत भांडूं लागले. गडावर भाऊबंदकी सुरू झाल्याची बातमी महाराजांस समजली. महाराज तावडतोब गडाच्या पेठेस गेले. चौघांहि भावांनी महाराजांस गडावर आणून आपआपल्या तक्रारी त्यांना सांगावयास सुरुवात केली. गड आपल्याच हातीं असावा अशी जो तो इच्छा धरूं लागला. स्वराज्याची महत्त्वाकांक्षा डोळ्यापुढे ठेवून प्रत्येक क्षण जगणाऱ्या महाराजांना हीं स्वार्थी व मूर्खपणाचीं भांडणें ऐकून उद्वेगच आला. त्यांनी चौघां भावांना समजावून सांगण्याचा यत्न केला. पण अभिजात मूर्खपणापुढे शहाणपण चालत नाही. अखेर यांच्या भांडणापायीं पुरंदरावर एखादा बादशाही किल्लेदार

येऊन दाखल व्हावयाचा अशीं चिन्हें महाराजांना स्पष्ट दिसूं लागलीं. महाराजांनी मन कठोर केलें आणि आपल्याबरोबर गडावर नेलेल्या मावळ्यांना त्यांनी भराभर हुकूम सोडले की, गडावर आपल्या चौक्या पहारे बसवा! गड ताब्यांत घ्या!

याचवेळीं भराभरा गडावरील चौघांहि भावांच्या घरांवर महाराजांनी छापे घातले आणि चौघांनाहि बेड्या घातल्या! चौघांनाहि मग हादरा बसला. गड महाराजांच्या कबजांत गेला. महाराजांचे व महादाजीपंतांचे संबंध पितापुत्रासारखे होते. म्हणजे हीं चार भावंडें त्यांना भावासारखींच होतीं. ते तसें मानीतहि. पण बेसावध माया ठेवली तर स्वराज्य साधणार नाही हें जाणून महाराज कठोर झाले. त्यांनी चौघांहि भावांना आपल्या पुढे आणलें आणि चौघांनाहि बेड्यांतून मोकळे करून त्यांना पालख्यांचा मान दिला. आपल्या पदरीं ठेवून घेतलें व पुरंदर गडावर नवीन किल्लेदार नेमला. नेताजी पालकर! (इ. स. १६५४ ऑक्टोबर नंतर)

आता बादशाहाची भीति संपली होती. कारण शहाजीराजे कर्नाटकांत रवाना झाले होते. राजे विजापुरांत होते, तोंपर्यंतच बादशाहाची भीति वाटत होती की, तो शहाजीराजांस पुन्हा दगा करील की काय याची. म्हणूनच फत्तेखानाच्या पराभवानंतर चार वर्षें महाराजांनी बादशाहाविरुद्ध कांहीहि उठाव न करतां इतर महत्त्वाचीं कामें केलीं.

आपल्या स्वराज्यकार्यास महाराज संतसज्जनांचे आशीर्वाद मिळवीत. त्यांच्या पायाशीं ते नम्र होत. महाबळेश्वरावर गोपाळभट महाबळेश्वरकर म्हणून एक सत्पुरुष होते. याच वेळीं महाराजांनी व आईसाहेबांनीहि गोपाळभटजींचा गुरुमंत्र घेतला. तदनंतर महाराजांनी आपल्या गुरुजींना चरितार्थाकरिता वर्षासन दिलें. त्यावेळीं त्यांनी गोपाळभट महाबळेश्वरकरांस जें पत्र लिहिलें, (दि. १८ फेब्रु. १६५३) तें पुढीलप्रमाणे.[१]

श्री

वेदमूर्ति गोपाळभट बिन श्रीधरभट वास्तव्य श्रीमहाबळेश्वर.

स्वस्तिश्री शके १५७४ नंदननाम संवत्सर, फाल्गुन शुद्ध प्रतिपदा रविवासरे तद्दिनीं गोसावीयाप्रती विद्यार्थी शिवाजीराजे दंडवत.

विनंती उपरी स्वामी भले थोर अनुष्ठाते. सूर्य उपासनी. पद्महस्ती. ऐसे जाणोन, आपण मातोश्री जिजाबाई आऊसाहेब वेदमूर्ति प्रभाकरभट उपाध्ये यांच्या विद्यमाने स्वामीपासून मंत्र उपदेश संपादिला. स्वामी आपले गुरु. स्वामीस आपण आपलें अभ्योदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान सांगितलें. प्रतिवर्षी वर्षासन द्यावयाची मोईन केली असे. श्रीमहादेव साक्ष. स्वामींनी निरंतर देवापाशी आमचें कल्याण इच्छावें. लेखनालंकार.

या पत्रावर महाराजांची ‘ प्रतिपच्चंद्र ’ मुद्रा व मोर्तब आहे.

महाराजांचें मस्तक सत्पुरुषांच्या चरणीं सदैव नम्र होत होतें.

* * *

---

**आधारः**—(१) शिचसा २।१०५. (२) राजखंड १५।३३०. (३) शिचसा ३।५३४ व ३७. (४) शिचसा ५।७६८, राजखंड १६।१५ व १६. (५) जेधेश व करीणा. (६) पसासं ५५७, ५५८, ५६७; शिचनि पृ. १४१ ते ४५. (७) शिचसा १।८७ व ८८. (८) शिचसा १।९२. (९) सपत्रें पृ. ११२ व १४१. (१०) जेधे करीणा. (११) साले १०५.

शिवाय पुढील पत्रें पाहाः शिचसा २।२३३, ३४; राजखंड १५।३३४, ५, २७०.

## २ : जावळीच्या जाळींत



महाबळेश्वर, मकरंदगड, मंगलगड आणि पारघाटाचे प्रचंड पहाड यांच्या दाटींत चंद्रराव मोऱ्यांची जावळी वसली होती. हे सर्वच पहाड अंगाने एवढे अवाढव्य की, माथ्यावरून खाली पाहिलें तर पाताळ दिसावें ! झाडी तर शेवाळासारखी दाट. वाघ, अस्वलें, चित्ते आणि असलींच रानटी जनावरें येथे अतिशय होतीं. पाऊस धो धो धो पडायचा. असें वाटायचें की, आता हे प्रचंड डोंगरहि वाहून जाणार ! जावळीच्या जाळींत राज्य करायला वाघाचेंच काळीज हवें; आणि मोऱ्यांचें काळीज वाघाचेंच खरें. पिढ्यान् पिढ्या मोरे जावळीच्या दरींत दौलत थाटून बसले होते. ते स्वतःला आदिलशाह बादशाहाचे सरदार म्हणवीत. ' चंद्रराव ' हा मोऱ्यांच्या कुळीचा पिढीजात किताब होता.

मोऱ्यांची गादी आता टिकली ती केवळ महाराजांच्या पाठबळामुळेच. नाहीतर सहा वर्षांपूर्वीच बादशहाने जप्तीचा हुकूम सोडला होता. सध्याचा 'चंद्रराव' यशवंतराव मोरे केवळ महाराजांच्या कृपेमुळच गादीवर आला होता. अफजलखान आलाच होता मोऱ्यांना गिळायला. पण कान्होजी जेध्यांनी टोलवाटोलव करून ती वेळ टाळली. आता चंद्रराव मोरे आणि त्याचा कारभारी हणमंतराव मोरे जावळीची जहागीर पाहात होते. हा हणमंतराव चंद्ररावाचा नातलगहि होता.

महाराजहि आपली स्वराज्याची दौलत जीव लावून जतन करीत होते. नवे नवे नातलग महाराजांनी गोळा केले होते. नेताजी पालकर, मोरोपंत पिंगळे, आण्णाजी दत्तो प्रभुणीकर, शामराजपंत पद्मनाभी,

बहिर्जी नाईक, संभाजी कावजी कोंढाळकर, नूरखान बेग, विश्वासराव दिघे वगैरे वगैरे कितीतरी ! महाराजांभवती सर्वांनी जिवाचें कडें केलें होतें. महाराजांचा शब्द पडायचा अवकाश की कसलेंहि दिकतीचें अवघड सवघड काम असो, पोरांनी घेतल्याच उडया. अशीं माणसें मिळवायला आणि सांभाळायला महाराजच हवेत.

अजून स्वराज्य पाळण्यांतच होतें. चार पांच किल्लेच फक्त स्वराज्यांत होते. महाराजांची फार इच्छा होती की, चंद्रराव मोऱ्यांनी स्वराज्यांत सामील व्हावें. जावळी सांभाळून व उपभोगून स्वराज्यांत असावें. पण अजूनहि त्यांनी असा खडा जावळींत टाकला नव्हता.

चंद्रराव मोरे जावळींत गादीनशीन झाल्यापासून महाराजांशीं शेजार-धर्मानें वागत आला होता. पण चंदररायाची नजर हळूहळू हिरवळूं लागली. त्याची भूक वाढली. गुंजण मावळची देशमुखी आपली आहे असें चंद्रराव हक्कानें बोलूं लागला.[१] खरें म्हणजे त्याचा गुंजण-मावळाशीं कांहीहि संबंध नव्हता. महाराजांस चंद्ररावाचा हा अन्यायी दावा समजला. गुंजणमावळच्या देशमुखीवर शिळमकर देशमुखाचाच खरा हक्क होता. या शिळमकर मंडळींनी फत्तेखानाच्या स्वारींत महाराजांच्या हाताशीं उभे राहून पराक्रम गाजविला होता. कांही चुगलखोरांनी हैबतरावाला असा धाक घातला की, तुमची वतनवाडी जप्त करण्याचा डाव आता यांतच शिवाजीराजा साधून घेईल. कारण मोऱ्यांनी तंटा मांडलाय. वतन वांध्यांत पडलें आहे. हें ऐकून हैबतराव शिळमकरहि धास्तावला. ही सर्व कथा समजतांच महाराजांनी हैबतराव शिळमकराला ताबडतोब पत्रच पाठविलें.[२]

" तुमचे बाबे हुजूर खबर मालूम जाली जे, कित्येक वडिया लोकांनी तुमचे पाठी शक घातला आहे, की तुमची देशमुखा आम्ही घेऊ. तुम्हास वाईट करू, ऐसा शक तुमचे पोटी बैसविला आहे व कितेक

तुमाचिया घरोबियामध्ये एक प्रकार वर्तणूक जाली आहे असे कितेक लोक बोलताती. तरी येही गोष्टीच्या निमित्या येऊन कष्टी करितील. ऐसा शक बसविला आहे. या तिही गोष्टीकरिता व कितेक गोष्टीकरिता तुम्ही शकजादे आहा. डावा डौल होता तरी तुम्हास साहेब घरिच्या लेकरासारिखे जाणिती आणि तुमचे फार हेहि गोष्टीचे वाईट करावे ऐसे मनावर कधी धरणार नाहीत, हे तुम्हास बित्तिम कळले असावे. कोणेहि गोष्टीचा शक न धरणें. तुमचे हजार गुन्हे माफ आहेती. तुम्हासी आम्ही कांहीहि वाईट वर्तणूक करू तरी आम्हास महादेवाची आण असे व आईसाहेबांची आण असे. कोणेहि गोष्टीची चिंता न करणें. अवांतरहि लोक भेडसविले असेल ते भेटविणे. आमच्या इमानावरी आपली मान ठेऊन आम्हापासी येणे. कोणे गोष्टीची चिंता न करणें."

महाराजांनी शिळमकरांची कड घेतलेली चंद्रावाला आवडली नाही. पण राग मनांत धरून तो गप्प राहिला. एवढ्यांत महाराजांच्या राज्यांत एक पाप घडलें. मुसे खोऱ्यांतल्या रंगो त्रिमल वाकडे नांवाच्या एका कुलकर्ण्याने एका विधवा बाईशीं पाप केलें ! अन् हें महाराजांना समजलें. महाराज अशा गुन्ह्याला किती भयंकर शिक्षा देतात, हें सर्वांना माहीत होतें. पूर्वी एका पाटलाने असा 'बद अमल' केला म्हणून, त्यांनी त्याचे हातपाय तोडून टाकले होते.[३] रंगोबा भेदरला. आता शिवाजी-राजा आपल्याला मारील या भयाने रंगोबा पळाला आणि जावळींत चंदररायाच्या पाठीमागे दडला.[४] आपल्या राज्यांतल्या गुन्हेगाराला चंदररायाने पाठीशीं घातलेलें महाराजांना आवडलें नाही. पण कडूपण नको म्हणून ते उगी राहिले. पण लौकरच रंगोबा मरण पावला.

चंद्रराव बिरवाडीच्या पाटलाच्या उत्पन्नावरहि हात मारूं लागला. पाटलाच्या उत्पन्नाचें गाव स्वतः चंद्रावच खाऊं लागला. म्हणजे अन्यायच झाला. तेव्हा तो पाटील महाराजांपुढे पदर पसरून आला

न्याय मागायला. त्यांनी पाटलाला वचन दिलें की, तुला किनाऱ्याला लावलें जाईल. चिंता सोड.[५]

चंद्रावाने तर चढच आरंभिली. त्याने कान्होजी जेध्यांच्या व स्वराज्याच्या हद्दींत असलेल्या रोहिडखोऱ्यावरच चाल करून[१०], चिखलीच्या रामाजी वाडकर पाटलाला ठार केले. पाटलाचा पोरगा लुमाजी पाटील यालाहि त्याने कापून काढलें.[६] चंद्ररावाने महाराजांशीं अशी टोंगाई आरंभिली. केलेले उपकार राया विसरून गेला. बुद्धि फिरली. त्याचा कारभारी हणमंतराव मोरे तर उर्मट बनला. या हरामखोर बर्तावाने महाराज रागावले. तरीहि चार गोष्टी कडू-गोड सांगून चंद्ररावास ताळ्यावर आणतां आलें तर बघावें म्हणून त्यांनी त्याला थैली लिहिली. पण चंद्ररावाची घागर पालथी होती !

चंद्रराव व हणमंतराव मोरे भारीच गुर्मीला आले. आपलें बळ फार. आपली जावळी म्हणजे वाघाची जाळी. कोणाची छाती आहे जावळींत उतरायची ? उतरला तर फाडून काढूं. अशा गुर्मीत दोघे होते. मोऱ्यांची पागा मोठी होती. पायदळहि चांगलें होतें. शिवाय मंगलगड, मकरंदगड, रायरीचा गड आणि जोहोर मावळाचा बिकट मुलुख मोऱ्यांच्या हातीं होता. मोऱ्यांनी धनदौलतहि खूप जमविलेली होती. जरब एखाद्या दरवडेखोरासारखी बसविली होती त्यांनी. महाराजांनी केलेले उपकार त्यांच्या ध्यानांत रांहिले नाहीत.

महाराजांनी कडक थैली जासुदाबरोबर जावळीस रवाना केली. चंद्ररावाने थैली घेतली. हणमंतरावहि होता. कारभाऱ्याने थैली उघडली. रीतसर मायन्यानंतर महाराजांनी कडाडून लिहिलें होतें—[७]

" तुम्ही मुस्तफद राजे म्हणविता ! राजे आम्ही ! आम्हास श्री शंभूने राज्य दिधले. तरी तुम्ही राजे न म्हणवावे. आमचे नौकर होऊन आपला मुलुख खाऊन हमरहा चाकरी करावी. नाहीतर, बदफैल

करून फंद कराल तर जावळी मारून तुम्हांस कैद करून ठेवूं."

पत्रांतील महाराजांचा मजकूर ऐकून चंद्रराव हसला. हणमंतरावाची तर जणू अस्तनी वरच सरकली. शिवाजी भोसला जावळीशीं खेळ करतोय, पण माहीत नाही अजून मोऱ्यांची औलाद कोणत्या धारेची आहे तें! अतिशय रंगेल तोरा मोऱ्यांच्या मुखड्यांवर बसला होता.

आणि चंद्ररावाने थैली आवळून महाराजांच्या पत्राचा जवाब राजगडावर रवाना केला.[७]

राजगडावर महाराजांच्या सदरेपुढे जवाब दाखल झाला. महाराजांच्या आज्ञेने पंतांनी थैली वाचण्यास सुरुवात केली. चंद्ररावाने लिहिलें होतें,[७]

"....तुम्ही काल राजे जाहलां! तुम्हास राज्य कोण्ही दिधलें? मुस्तफद राजा आपले घरी म्हटलियावर कोण मानितो? तुम्ही लिहिलें की जावळीत येऊं! येता जावळी, जाता गोवळी! पुढे एक मनुष्य जिवंत माघारा जाणार नाही! तुम्हांमध्यें पुरुषार्थ असला, तर उदईक येणार ते आजच या! आम्ही कोंकणचे राजे असून, आमचा राजा श्रीमहाबळेश्वर! त्याचे कृपेने राज्य करितो. आम्हास श्रीचे कृपेने पादशाहाने राजे किताब, मोरचेल, सिंहासन मेहेरबान होऊन दिधले. आम्ही दाईमदारी. दरपिढी राज्य जावळीचें करितों. तुम्ही आम्हासी खटखट कराल तर पष्ट समजून करणें! येथे उपाय कराल तर तो अपाय होईल. यश न घेतां अपयशास पात्र होऊन जाल."

हा मग्रुरीचा जाबसाल ऐकून महाराज रागावले. त्यांनी अखेरचा सवाल चंद्ररावास पाठविला. त्यांत त्यांचा हेतु हा की, जर शहाणा असेल तर अजूनहि तो समजून वागेल. नाही तर त्याच्या आयुष्याची दोरी संपली! महाराजांनी चंद्ररावास अखेरची पक्की इशारत लिहिली. थैली जावळीस रवाना झाली.

थैली चंद्ररावाने उघडली. महाराजांनी तडकून लिहिलें होतें.[७]

" ....जावळी खाली करोन, हात रुमालें बांधोन, भेटीस येवोन हुजूरची चाकरी करणें! इतकियावरी वदफैली केलिया मारले जाल!"

महाराजांची थैली अशी करडी मिळाल्यावर चंद्ररावाच्या मिशीला तर जास्तच पीळ चढला. ताठर गडी महाराजांस जुमानीना! त्यांतून त्याला हणमंतरावाची भर. चंद्ररावाने महाराजांच्या थैलीस उर्मट जवाब दिला.[७]

" ....जावळीस येणारच तरी यावे! दारूगोली महझूद आहे! कांही बेजवाबास खुतें घालून लिहिलें, ते कासियास ल्याहाविलें?"

महाराजांनी हा जवाब ऐकला मात्र, अन् त्यांची आग उसळली. शिरजोर हरामखोरांचे समझोते घालणें महाराजांच्या तबियतीस नामंजूर होतें. अशा प्रत्येक मूर्खाला शहाणें करीत बसणें हाहि मूर्खपणाच ना! महाराजांस मंजूर नव्हता तो. त्यांनी कान्होजी जेध्यांना, हैबतराव शिळमकरांना, संभाजी कावजी कोंढाळकराला, बांदलनाइकांना[९] आणि रघुनाथपंत सबनिसांना तातडीचे हुकूम पाठवून हुजूर बोलाविले.[८]

महाराजांचा निश्चय झाला. चंद्रराव मोरा बेवकूफ! बदतमीज! जावळीच्या अवघड जागेची आणि हजार स्वारांची नशा चढली त्याला! बस्स्! जावळी स्वराज्यांत ताबडतोब दाखल झालीच पाहिजे! मोऱ्यांची हरळी जावळींतून उखडलीच पाहिजे!

कान्होजी, हैबतराव, संभाजी आणि रघुनाथपंत मुजरे घालीत सदरेवर हजर झाले. महाराज म्हणाले,[८]

" चंद्रराव मोरे यास मारल्याविना राज्य साधत नाही! तुम्हावाचून हें कर्म कोणास न होय! पंत, तुम्हीच त्यांजकडे हेजिबीस जावें!"

निवडक धारकरी हशम या सरदारांच्या मागोमाग जंगलांत घुसले. आकटबिकट जावळीची वाट, जंगलजाळी किर्रर्र दाट. मूर्तिमंत जणू यमाशीं गाठ. पायाखाली पाचोळा चुरचुरत होता.

जावळींत हणमंतराव मोरे होता. प्रतापराव मोरे म्हणून चंद्ररावाचा आणखी एक नातलग होता. पायदळ घोडदळहि खूप होतें. स्वतः जातीनिशी चंद्ररावहि होता.

रघुनाथपंत चंद्ररावाकडे गेले. पंतांनी बोलणीं लावलीं. पण मोऱ्यांच्या कुंडलींत पापग्रह गोळा झालेले होते ! कुंडली जमेना !

एकदम भयंकर कालवा उठला. चतुर्बेटावर, जोहोरखोऱ्यांत, शिवथर खोऱ्यांत आणि खुद्द जावळीवर हल्ला आला. हणमंतराव, चंद्रराव आणि सगळी मोरे मंडळी धावली. आरोळ्या किंकाळ्यांनी जावळी कोंदली. कापाकाप सुरू झाली. बंदुका कडकडूं लागल्या. दऱ्याखोऱ्यांत साद–पडसाद घुमूं लागले. महाराजांच्या माणसांनी जावळी कोंडली. मोरे मंडळी हत्याराची तिखट. डोळे लाल करून वार करूं लागली. आणि मोऱ्यांकडून एक पठ्ठा तर हिरीरीने झुंजत होता. त्याच्या हत्याराची काय तारीफ सांगावी ! जसें चक्र सुदर्शन. पाऊल पुढे सरकूं देईना. मोऱ्यांच्या पदरीं असा अर्जुन आला तरी कोठून ? शर्थ केली त्याने. त्याचें नांव मुरारबाजी देशपांडे.

मोऱ्यांवर चौफेर चढाई झाली. एवढ्यांत संभाजी कावजी कोंढाळकराने हणमंतराव मोरे ठार केला ![८] मोऱ्यांची दाणादाण उडाली. अन् जावळी हातची चाललेली पाहून खासा चंद्रराव पळाला. त्याने महाडापल्याड असलेला रायरीचा गड गाठला. याच धांदलींत चंद्ररावाचा भाऊबंद प्रतापराव मोरे झाडींतून लपत छपत पळाला. त्याने थेट विजापूरचा रस्ता धरला.

महाराज जावळींत जातीनिशी आले. मुरारबाजी देशपांडा अशा इरेसरीचा लढता पटाईत पाहून महाराज त्याच्या सफेजंगीवर खूष झाले. पण मुरारबाजी चुकत होता. कोणाच्या बाजूने लढायचें आणि कोणाच्या विरुद्ध लढायचें हें मुरारला कोणीं शिकवलें तें चुकीचेंच शिकवलें.

जावळी काबीज झाली (दि. १५ जानेवारी १६५६). महाराजांनी मुरारबाजीला समजावलें. त्याला विनवलें. हें कार्य स्वराज्याचें. देवा-धर्माचें. केवळ मोऱ्यांशीं वैर म्हणून शिवाजीराजे भोसले लढले नाहीत. लढणारहि नाहीत. एकेकाळीं याच मोऱ्यांना आम्हीं भोसल्यांनीच हाताचा आधार देऊन चंदरराई दिली. पण मोरे विसरले. मोरे चुकले. आता त्वां मुरारबाजीने चुकूं नये. महाराजांनी मुरारला मागणी घातली, स्वराज्याच्या चाकरींत ये. तूं हवासच! तुझ्या समशेरीची कीर्त डंक्यावर चढेल!

आणि मुरारबाजी आला. महाराजांच्या पदरीं पडला. जावळीच्यें स्वार्थी बळजोराची खिदमत करणारा अमोल रुस्तुम स्वराज्यांत सामील झाला.

जावळी कबजांत आल्याबरोबर महाराजांनी कृष्णाजी बाबाजी यांस तेथील सुभेदार नेमलें. त्रिंबक राम यांस मुजुमदार नेमलें. या दोघांनीहि जावळींतील गणशेट शेटे म्हणून एक प्रतिष्ठित गृहस्थ होता त्यास बोलावून आणलें. त्याला जुन्या सर्व हक्कदारांची माहिती विचारिली. कोण कोण हक्कदार आहेत व कोणते कोणते हक्क आजपर्यंत ते चालवीत असत ही माहिती घेऊन ती व्यवस्था पूर्ववत् चालू ठेवली.[११]

महाराज जावळीहून पुढे रायरीच्या किल्ल्याकडे चालून गेले (दि. ६ एप्रिल १६५६). कारण चंद्रराव रायरीवर जाऊन बसला होता. रायरीचा किल्ला खूपच उंच. दौलताबादेच्या दहापट. महाराजांनी गड गराडला. चंद्ररावाची कुवत आता गडापुरती उरली होती. महाराजांच्या सैन्यांत शिळमकर देशमुख होते. ते तर चंद्ररावाचे भाचे होते. मामाचा हटवाद शिळमकरांना रुचला नाही. ते महाराजांकडून झुंजत होते (एप्रिल १६५६).

एक महिना झाला. जावळीचा वाघ कांहीं नमेना. महाराज गडाशीं

धरणें धरून बसले. अखेर एके दिवशीं चंदरराजा मगरूब झाला. त्याने तलवार ठेवली. महाराजांचें मन मोठें होतें. त्यांनी चंद्ररावाला अभय कौल दिला. कांही झालें तरी चंद्रराव आपला आहे. मराठा आहे. अनुभवाने शहाणा होईल. पुन्हा त्याचा त्यालाच जावळीचा कारभार सांगून स्वराज्याची सेवा करवून घेऊं असा विचार त्यांच्या मनांत आला.[७] त्यांनी शिळमकरांना गडावर पाठवलें आणि चंद्ररावाला मानाने गडाखाली आणलें. त्याचा मानमरातब राखला. घोडा, वस्त्रें, तलवार त्याला दिलीं. मात्र त्याचा मोरचेलाचा मान काढून घेतला. महाराजांनी त्याला रुमाल दिला. पण मोऱ्याने रुमाल माघारा पाठवला. गडाखाली चंद्ररावाला लष्करांत ठेवून महाराज गडावर गेले. गड का लहान ! केवढा पसारा त्याचा. गडाचा नुसता चढावच तीन कोसांचा होता. महाराजांनी गडाच्या दुरुस्तीचा हुकूम दिला आणि गडाला नांव दिलें 'रायगड.' महाराजांना रायगड फारच आवडला. इतका कां आवडला ? रायगड प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज तें नाही समजायचें.

एवढ्यांत चंद्ररावाची आवस उगवली ! दोरीच तुटली त्याच्या औक्षाची ! महाराजांच्या छावणींत राहून त्याने विजापूरशीं सूत बांधलें. मुधोळच्या बाजी घोरपड्याकडे चंद्ररावाचीं चोरून पत्रें गेलीं. महाराजांच्या हेरांनी तीं वाटेंतच अलगद पकडलीं. तेवढ्यांत स्वतः चंद्ररावाने छावणींतून धूम ठोकली.[१२] पण कुठे पळेल ? पुन्हा कैद झाला ! महाराज चिडले होते. त्यांनी चंद्ररावाची गर्दन उडवण्याचा हुकूम सोडला. आणि मग्रुरीची जाबसाल करणारी ती हरामखोर गर्दन उडाली.[७] चंद्ररावाच्या बाजी व कृष्णाजी या मुलांनाहि महाराजांनी ठार केलें [१५] ( दि. २७ ऑगस्ट १६५६ नंतर ).

जावळीच्या जवळचे चंद्रगड, मकरंदगड, कांगोरी, सोनगड, चांभारगड हेहि किल्ले स्वराज्यांत दाखल झाले. जावळीची जागा इतकी

कमालीची बिकट होती की, अजिंक्यच ! ती अजिंक्य गुहा ताब्यांत आल्यावर महाराजांनी आपला खजिना ठेवावयास हीच जागा पसंत केली.[१३] जावळीच्या जवळच पारघाटाच्या तोंडावर व रडतोंडी घाटाच्या नाकासमोर एक डोंगर अगदी रखवालदार रामोशासारखा बसला होता. डोंगराचें नांव होतें भोरप्या डोंगर. महाराजांचें नेमकें लक्ष या भोरप्या रखवालदाराबरोबर गेलें. जावळीची–केवळ जावळीची काय पण-स्वराज्याची रखवाली हा भोरप्या करील हें महाराजांनी ताडलें. त्यांनी मोरोपंत पिंगळ्यांना आज्ञा केली की, या रखवालदाराच्या मस्तकावर तटबंदीचें पागोटें चढवा.

*मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण...*




आणि किल्ला बांधण्यास पंतांनी सुरुवात केली.

याच काळांत वरंधा घाटांतील शिवथरजवळच्या एका काळोख्या गुहेंत शस्त्रगर्भा कुबडीवर रेलून, दीपप्रकाशांत एक अत्यंत तेजस्वी पुरुष कर्मयोगाचें तत्त्वज्ञान ओवीबद्ध करण्यांत मग्न झाला होता.[१४].... समर्थ रामदासस्वामी !

* * *

**आधारः**—(१) मराठी रुमाल ३१५. (२) पसासं ७०८. (३) पसासं ५१०. (४) पसासं ६२७. (५) पसासं ६१५. (६) पसासं ७०७. (७) मोरे ह्यांची छोटी बखर इ. सं. (८) सभासद बखर पृ. ९. (९) शिचनि पृ. १४८. (१०) शिचसा २।२३३ व ३४. (११) शिचसा ४।७१७. (१२) जेधेशका. (१३) शिचनि पृ. १४९. (१४) पसासं १०३९. (१५) शिभा १८।४ ते ६.

## ३ : कऱ्हेपठार



उगवतीच्या उजव्या अंगाला पुण्यापासून पांच कोसांवर दिव्याच्या घाटाची दरड उभी आहे. दिव्याचा हा घाट चढून वर गेलें की, कऱ्हेच्या मुलखांत पाऊल पडतें. दिव्याचा घाट म्हणजे कऱ्हेपठाराचा उंबरठाच आहे.

जेजुरीपासून वज्रगड, पुरंदर, बोपदेवघाट, दिव्याचा घाट, सोनोरीचा डोंगर, ढवळगड असा बांकदार वळसा घेऊन भुलेश्वरावर्तो सह्याद्रीने एक चंद्रकोर रेखली आहे. या डोंगरी चंद्रकोरीच्या एका टोकावर भुलेश्वर महादेव आणि दुसऱ्या टोकावर जेजुरीचा खंडोबा उभा आहे. अन् या चंद्रकोरीच्या ऐन मध्यावरून कऱ्हा नदी झुळू झुळू वाहाते.

एकदा असें झालें, ब्रह्मदेव सह्याद्रीच्या शिखरावर ध्यानस्थ बसले होते. धर्मराजाने आरंभिलेल्या यज्ञाच्या कांही निकडीच्या कामासाठी भीम ब्रह्मदेवांना बोलावूं आला. भीम शिखर चढून वर आला. पण ब्रह्मदेवांची ब्रह्मानंदीं टाळी लागली होती. भीमदेवाने त्यांची समाधि उतरविण्यासाठी अनेकविध प्रयत्न केले; पण विधिराज कांही सावध होईनात. भीम मोठ्या चिंतेंत पडला. एवढयांत त्याला ब्रह्मदेवांच्या शेजारींच असलेला त्यांचा कमंडलु दिसला. त्यांत पाणी होतें. भीमाने तो कमंडलु उचलला आणि ब्रह्मदेवांच्या मस्तकावर ओतला ! कमंडलूंतलें तें गार गार, गोड गोड आणि स्वच्छ पाणी त्यांच्या मस्तकावरून खळाळूं लागलें. सह्याद्रीवरून ही गंगा भुई भिजवीत, मोत्याचीं कणसें पिकवीत, फळाफुलांच्या बागा फुलवीत पूर्वेकडे धावत निघाली. ही खळाळणारी

गंगा म्हणजे आमची कऱ्हा नदी. ब्रह्मदेवांच्या या कमंडलूचें नांव होतें 'कर.' करांतून जी जन्मली ती 'करजा.' म्हणजे कऱ्हा. कऱ्हावाई.

अर्थात् ब्रह्मदेवहि या आकस्मिक स्नानाने खडबडून जागे झालेच! घाई घाई ब्रह्मदेव उठले अन् भीमदेवाबरोबर तसेच गेले. कमंडलु सह्याद्रीवर तसाच लवंडलेला राहिला. कमंडलु खळखळ वाहातच राहिला. शतकें लोटलीं. युगें लोटलीं. अजून कऱ्हा वाहातेच आहे.

सह्याद्रीच्या या चंद्रकोरी मुलखांतून कऱ्हावाई जाते, म्हणून या पठारी मुलखाला कऱ्हेपठार म्हणतात. पुरंदर किल्ला कऱ्हेपठाराची राखण करीत उभा आहे.

पुरंदर आता स्वराज्यांत दाखल झाला होता. नेताजी पालकर तेथे किल्लेदार होता. नेताजीने गड अगदी झुंजता बनविला होता. नेतांजी कमालीचा शूर होता. आणि बुद्धिमानहि तसाच. पुरंदरावर बसून कऱ्हे-पठारांतील आणि पुरंदर घेऱ्यांतील अनेक फिर्यादींचे निवाडे त्याने अति कौशल्याने केले होते.[२] लोक फार खूष होते त्याच्या कारभारावर. त्याची कीर्ति पसरली होती की, नेताजी पालकर दूरदृष्टीने न्यायनिवाडे करतात म्हणून.

महाराजांनी आपल्या कांही किल्ल्यांचीं नांवें यावेळीं बदलून नवीं ठेवलीं.[६] रायरीचा 'रायगड' केलाच होता. चाकणच्या किल्ल्याचें नांव 'संग्रामदुर्ग' ठेवलें तेंहि बहुधा याच वेळीं. रोहिड्याचा 'विचित्रगड' झाला तोहि बहुधा याच वेळीं. तोरण्याचा 'प्रचंडगड' बनला तोहि याच वेळीं.

विजापुरांत फार चिंतेचें वातावरण पसरलें तेंहि याच वेळीं. शाही महालांत चिंताक्रांत मुद्रेने, खालच्या मानेने, फारसें न बोलतां अन् मुळींच न हसतां जो तो वावरत होता. कोकणपट्टींतल्या व शाही सल्तनतींतल्या कित्येक बड्या बड्या अंमलदारांना विजापुरांत मुद्दाम हुकूम

पाठवून बोलावून घेतलें होतें.[७] बडे बडे सरदार आपापसांत कुजबुजत होते. दिवसेंदिवस चिंता वाढतच होती. सर्वांचें लक्ष खुदाकडे होतें. हकीम शिकस्त करीत होते. बादशाह मुहम्मद आदिलशाह अतिशय आजारी होता.

बादशाह आजारी असल्यामुळे अनेक बाबतींत आदिलशाही सल्तनतींत ढिलेपणा आला आहे व अनेक अंमलदार आपआपल्या ठाण्यांवरून विजापुरांत जमा झाले आहेत, ही बातमी महाराजांना समजली. पण तेवढ्यांत महाराजांचें लक्ष कऱ्हेपठारांतील सुपे परगण्यावर गेलें. त्याला कारणहि तसेंच होतें. जोंपर्यंत सुप्याचें ठाणें आपल्या खास हुकमतींत येत नाही, तोंपर्यंत कऱ्हेपठाराची पूर्ववेस मोकाट उघडी व म्हणूनच स्वराज्याला धोक्याची आहे, असें महाराजांचें मत होतें. सुपे परगणा शहाजीराजांना जहागीर होता. राजांनी तो संभाजी मोहिते यांच्या हातीं सोपविला होता. संभाजी मोहिते म्हणजे शहाजीराजांच्या धाकट्या राणीसाहेबांचे भाऊ. राजांचे मेव्हणे. महाराजांचे सावत्र मामा. संभाजी मोहिते हे सुप्याच्या गढींत राहून परगण्याचा अंमल करीत. नातें तर मोठेंच नाजूक होतें. संभाजी मोहित्यांना महाराज ‘ मामा ’ म्हणत. पण मोहितेमामांचें आपल्या भाच्यावर मुळींच प्रेम नव्हतें. म्हणूनच सुपे ठाणें परगणा खास शहाजीराजांचा जहागिरीचा असूनहि स्वराज्यांत नसल्यासारखा होता.

हळूहळू मामांच्याविरुद्ध अनेक तक्रारी महाराजांच्या कानीं येऊन पोहचूं लागल्या. मामा लाच खाऊन रयतेवर जुल्म करूं लागले होते. तिमाजी खंडो कुलकर्णी नांवाच्या माणसाला मोहितेमामांनी अन्यायाने तीन महिने तुरुंगांत डांबून ठेवलें. त्याच्या हातांत बेड्या घातल्या. त्याला खूप चोपून काढलें. कशाकरिता ? या कुलकर्ण्याचें वतन विसाजी व रामाजी पणदरकर नांवाच्या भावांना मिळवून देण्याकरिता ! विसाजी

व रामाजी यांनी या महान् कार्याबद्दल मोहितेमामांना एक घोडा व एकशे साडेसत्तावन्न रुपये लाच दिली होती ! खाल्ल्या लाचेला जागून मामांनी तिमाजी कुलकर्ण्याला तीन महिने छळून त्याच्याकडून जबर-दस्तीने वतनाची सोडचिठ्ठी लिहून घेतली व तिमाजीला सोडून दिलें.[३]

तिमाजी कुलकर्णी सुटला. त्याने न्याय मागण्यासाठी सरळ कर्नाटकचा रस्ता धरला. तिमाजी शहाजीराजांकडे गेला. मोहितेमामांना समजलें. आपलें पाप राजांच्या कानापर्यंत गेलें आहे हें ऐकून मामांना कांहीहि वाटलें नाही ! मामा कोणालाहि भीत नव्हते. गोताला किंवा परमेश्वरालाहि ते भीत नव्हते ![४]

अशा कित्येक शिकायती शहाजीराजांच्या कानीं गेल्या होत्या. ही एक नवी तक्रार आली. राजांनी ऐकून घेऊन तिमाजीला पत्र दिलें व राजश्री चिरंजीव शिवबाकडे पाठवून दिलें. तिमाजीच्या फिर्यादीची चौकशी करण्याबद्दल राजांनी शिवबाला लिहिलें.[३]

पण तें पत्र येण्याआधीच महाराज आपल्याबरोबर निवडक स्वार घेऊन सुप्याला निघाले. दसरा होऊन गेला होता. दिवाळी पंधरा दिवसांवर येऊन ठेपली होती.[१२]

महाराज कऱ्हेपठारांत आले. सुप्याची गढी लांबून दिसूं लागली. गढींत फारशी फौज शिबंदी नव्हती. दरवाजावर पहारे होते. पाखरांच्या थव्याप्रमाणे महाराज आपल्या मावळ्यांसह सुप्याच्या गढीपुढे येऊन घोड्यावरून उतरले. सरळ आंत चालूं लागले. आता खासा खासा राजा आला. शहाजीराजाचा लेक. धनीच तो. त्याला कोण थांबवणार ? महाराज आंत गेले आणि मामासाहेबांना सांगावा धाडला की, दिवाळीचा पोस्त मागावयास आलों.[५] वडीलधाऱ्या माणसाकडून पोस्त मागायची रीतच होती. मामांच्या निरोपाची वाटहि न पाहातां महाराज झपाझप मामांच्या महालाकडे गेले. मामांना कल्पनाहि नव्हती की, हा आपला

भाचा अचानक येऊन गढींत शिरेल. महाराजांचे मावळेहि गढींत शिरले. दरवाजावर व जागजागीं मावळ्यांनी चौक्या धरल्या. महाराज मामांच्या समोर जाऊन ठाकले. महाराजांनी मामांना सरळ सांगितलें कीं, सुपे ठाणें व परगणा आमच्या स्वाधीन करा! भलताच जबर पोस्त मागितला भाच्याने मामापाशी! मामाचें दिवाळेंच काढलें! मामांनी हा दांडगावा जाणला. त्यांनी साफ नकार दिला. आपले मालक शहाजीराजे. हा पोरगा कोण हुकूम करणार? वडिलांच्या हयातींतच जहागिरींत दंडेली माजवतो? हा संभाजी मोहिता थोरल्या महाराजांचा मेव्हणा आहे, अशा गुर्मीत मामा होते. मामांचा बेत सरळ-

*राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच नेदावें ।-*



पणें सुप्याचा ताबा देण्याचा नाही असें दिसतांच महाराजांनी आपल्या मावळ्यांना हुकूम केला की, गिरफ्तार करा मामासाहेबांना !

क्षणांत मोहितेमामा कैद झाले.[५] मामा हादरले ! अन् मामांच्यापेक्षा महाराजांचे सौंगडीच जास्त हादरले. आपल्या सावत्र आईच्या भावाला महाराज तडकाफडकी कैद करतील असें कोणाला वाटलें नव्हतें. या नाजुक नातलगाला गोंजारून आर्जवून सांगतील असें वाटलें होतें. महाराजांनी मामांना पहाऱ्यांत बसवलें. गढीचा ताबा घेतला. गढींत तीनशे घोडा, बराचसा खजीना, कापडचोपड व चीजवस्त होती ती जप्त केली[५] ( दि. २४ सप्टें. १६५६ ).

महाराज नंतर मामांना भेटले. आदराने भेटले. आणि म्हणाले की, तुम्ही येथेच स्वराज्यांत राहा ! परंतु मामांचें मन भाच्याविषयी कधींच नीट नव्हतें. ते कसे राहातील ? त्यांनी नाही म्हटलें. तेव्हा महाराजांनी त्यांना सन्मानाने व उत्तम इन्तजाम देऊन कर्नाटकांत वडिलांकडे रवाना केलें. सुप्याच्या ठाण्यावर येसाजी गणेश अत्रे यांस हवालदार नेमलें.

सुपे कबजांत आलें.[१२] आता जवळ जवळ संपूर्ण कऱ्हेपठार स्वराज्यांत आलें. तिमाजी खंडेराव कुलकर्णी कर्नाटकांतून परत आला. त्याने महाराज शहाजीराजांचें पत्र शिवाजीमहाराजांना दिलें. त्याची फिर्याद महाराजांनी साक्षीपुराव्यासह ऐकली व न्याय केला. त्याचें वतन त्याला दिलें.[३]

आपल्या मेव्हण्याचे गुण शहाजीराजांना ठाऊक होते. सुप्याचा अशा प्रकाराने शिवाजीराजांनी छापा घालून ताबा घेतला म्हणून राजे मुळींच रागावले नाहीत.

एवढ्यांत विजापुरांत हाहाःकार उडाला. बादशाह मुहम्मद आदिलशाह मरण पावला ( दि. ४ नोव्हेंबर १६५६ ). मुहम्मदशाह मरतांना सर्व सरदारांस म्हणाला,[८]

स्थळप्रत.
२४४८० वि: चौरे ३३
क्रमांक ८६६ नों: दि:



"मैं और जिंदा रहता तो कर्नाटक के मुल्क को अपनी काबू में लाकर इस्लाम बना डालता! मेरी जिंदगी खत्म हो रही है! मैं अब बच न सकूंगा! मेरी यह मुराद तुम पूरी करो!"

हा बादशाह विलासी व रंगेल होता. थोरल्या भावाचे डोळे काढून टाकून व धाकट्या भावांचें एक एक बोट छाटून टाकून, त्यांना कायमचें बंदोबस्तांत ठेवून हा गादीवर बसला होता.[१] मुहम्मदच्या नंतर त्याचा मुलगा अली हा बादशाह झाला. सर्व कारभार मात्र मुहम्मदची बेगम 'बडी साहेबा' ऊर्फ 'बडी बेगम' हीच पाहूं लागली. ही बाई जबर उपद्व्यापी व कारस्थानी होती.

या वेळीं मोंगलांचा दक्षिणेंतील सुभेदार तितकाच जहरी महत्त्वाकांक्षी व कर्तबगार होता. शाहजहान बादशाहाचा तो खुद्द पुत्र होता. शाहजादा औरंगझेब! सबंध दख्खनचा मुलुख काबीज करण्याची त्याची आकांक्षा होती. विजापूरचा बादशाह मेलेला समजतांच औरंगझेबाची आकांक्षा उसळली. मुहम्मद आदिलशाह आजारी पडला तेव्हांच त्याची आकांक्षा उसळली होती. औरंगझेबानें विजापूरकरांच्या बीदरच्या किल्ल्यास एकदम वेढा घातला.

महाराजांनीहि रघुनाथ बल्लाळ अत्रे यांना दाभोळ ऊर्फ मुस्तफाबाद बंदर व भवतीचे किल्ले काबीज करण्यास कोकणांत सोडून दिलें. कोकण किनारा विजापूरकर आदिलशाहाच्या ताब्यांत होता. रघुनाथपंतांनी भराभरा छापे घालून तेथील ठाणीं व दाभोळ बंदर काबीज केलें.

महाराजांनी लगेच आपले हुशार कारभारी सोनोपंत डबीर यांस औरंगझेबाकडे बीदर परगण्यांत रवाना केलें. औरंगझेबाकडे कशाकरिता? तर, आतापर्यंत विजापूरकरांचे जे जे किल्ले, मुलुख अन् दाभोळ बंदर आपण जिंकून घेतलें आहे त्याला दिल्लीच्या शाहजादा औरंगझेबाची मान्यता मिळविण्याकरिता! म्हणजे मुलुख जिंकला विजापूरच्या

बादशाहाचा व त्याला मान्यता घेत होते दिल्लीच्या औरंगझेबाची ! याला साळसूदपणा म्हणतात ! उगीचच मोठेपणा देऊन आपण दिल्लीशीं फार निष्ठावंत आहोंत हें दाखविण्याचा हा आव होता. सोनोपंतांनी औरंगझेबाची मोठ्या नम्रपणें भेट घेतली व महाराजांनी जिंकलेल्या मुलखाला मान्यता असावी असा अर्ज केला. औरंगझेबालाहि फार आनंद झाला. शिवाजीसारखा गुंड आपण होऊन आपल्याशीं इतका नमून वागतो आहे, हें पाहून तो स्वतःवरच खूष झाला. त्याने मोठ्या रहमदिल मर्जीने महाराजांच्या अर्जास मान्यता दिली. सोनोपंतांच्या हवालीं एक पत्र करून त्यांस निरोप दिला. हें पत्र फारसी भाषेंत लिहिलेलें होतें. त्याचा थोडक्यांत हिंदवी तर्जुमा असा,[१०]

" सांप्रत विजापूरकरांकडील जे किल्ले, जो मुलुख व बंदर दाभोळ आणि दाभोळखालील मुलुख तुम्हाकडे आहे त्यास आमची मंजुरी आहे. तुमच्यावर आमचा पूर्ण लोभ आहे."

या पत्रावर तारीख होती, १८ रजब १०६७ हिजरी ( दि. २३ एप्रिल १६५७ ). औरंगझेबाचें प्रेम मिळालें ! महाराजांनी सोनोपंतांच्या मार्फत औरंगझेबाला निष्ठेचा धूपदीप दाखविला. मोरपिसांचा कुंचा त्याच्या तोंडावरून फिरविला आणि नंतर फक्त सातच दिवसांनी....

हेरांनी खबर आणली. ताबडतोब महाराज जातीने निघाले. सुमारें पांच-सहाशे मावळे बरोबर घेतले आणि ते पुण्यांत दाखल झाले. कुठे जायचेंय् अन् काय करायचेंय् याचा कुणालाहि थांग नव्हता. अन् कुणी असल्या चांभारचौकशा करीतहि नव्हता. त्याच दिवशी दिवस मावळायच्या आंत महाराज निघाले. त्यांच्या मागोमाग स्वारांनीहि लगाम ताणले.

खरोखर असें वाटतें, परमेश्वराने जेव्हा अक्कल वांटली तेव्हा हे मोंगल लोक अगदी ठरवून गैरहजर राहिले असावेत ! त्यांनी असा विचार

ला की, शिवाजीने आपल्या औरंगझेब शाहजाद्याकडे वकील पाठवून ेष्ठा व्यक्त केली आहे ना! मग आता शिवाजीचें कांहीहि भय नाही! ोपा वेलाशक! आजपर्यंत तर शिवाजीने मोंगली मुलखांत यत्किंचितहि ुडगिरी केलेली नाहीच. आणि आता तर आपण होऊन निष्ठावंत नला आहे. शिवाजी फार चांगला आहे! मोंगल ठाणेदारांना असेंच ाटलें आणि ते शांत झोपा काढूं लागले. जुन्नरचे मोंगल ठाणेदार गदी बेफिकीर होते. खाटल्यावर पडल्या पडल्या हुक्का फुंकीत कडक हारा करणारे हे बहाद्दर आता शिवाजीराजाला भ्यायला तयारच नव्हते! ोंगलांचा हा ढिला कारभार हेरांनी हेरला आणि....

....त्या काळोख्या रात्रीं महाराज आपल्या शिलेदारांसह जुन्नरपाशी ेऊन धडकले. महाराजांनी आपल्याबरोबर जरूर तें सर्व साहित्य आणलें होतें. जुन्नरच्या ठाण्याभवती उंच तटबंदी होती. तटाचे दरवाजे ंद होते. यापेक्षा जास्त काळजी घेणें म्हणजे बावळटपणा आहे हें ओळखून मोंगल मंडळी झोपली होती!

महाराज घोड्यावरून उतरून झपझप तटाकडे निघाले. अंधार दाट होता. मध्यरात्रीचा वखत होता. महाराजांच्या मागून उंदरांप्रमाणे तुरुतुरु त्यांचे मावळेहि चालले होते. तटाजवळ येतांच महाराजांनी तटाला शिडी लावली. इतरांनीहि भराभरा शिड्या लावल्या. महाराजांसह सर्वजण झर झर वर चढूं लागले. एका क्षणांत शे-दोनशे मावळे तटावर चढले. तलवारी उपसून हीं वानरें तटावरून कोटांत उतरलीं. खजिना, पागा, दारूगोळा, हत्यारें, कापडचोपड वगैरे कुठे कुठे काय काय आहे, याची खडान्‌खडा माहिती आधीच जमा केलेली होती. असे माहीतगार हेर नेहमी त्यांच्याबरोबर असतच. महाराजांनी इशारत करतांच सारे मावळे भराभर ठाण्यांत घुसले. कोणी हत्यारांच्या ठाण्यांत, कोणी खजिन्याच्या खोलींत, कोणी दारूगोळ्याकडे धावले. कांहींनी आंतून

बादशाहाचा व त्याला मान्यता घेत होते दिल्लीच्या औरंगझेबाची ! याला साळसूद्पणा म्हणतात ! उगीचच मोठेपणा देऊन आपण दिल्लीशीं फार निष्ठावंत आहोंत हें दाखविण्याचा हा आव होता. सोनोपंतांनी औरंगझेबाची मोठ्या नम्रपणें भेट घेतली व महाराजांनी जिंकलेल्या मुलखाला मान्यता असावी असा अर्ज केला. औरंगझेबालाहि फार आनंद झाला. शिवाजीसारखा गुंड आपण होऊन आपल्याशीं इतका नमून वागतो आहे, हें पाहून तो खतःवरच खूष झाला. त्याने मोठ्या रहमदिल मर्जीने महाराजांच्या अर्जास मान्यता दिली. सोनोपंतांच्या हवालीं एक पत्र करून त्यांस निरोप दिला. हें पत्र फारसी भाषेंत लिहिलेलें होतें. त्याचा थोडक्यांत हिंदवी तर्जुमा असा,[१०]

" सांप्रत विजापूरकरांकडील जे किल्ले, जो मुलुख व बंदर दाभोळ आणि दाभोळखालील मुलुख तुम्हाकडे आहे त्यास आमची मंजुरी आहे. तुमच्यावर आमचा पूर्ण लोभ आहे."

या पत्रावर तारीख होती, १८ रजब १०६७ हिजरी ( दि. २३ एप्रिल १६५७ ). औरंगझेबाचें प्रेम मिळालें ! महाराजांनी सोनोपंतांच्या मार्फत औरंगझेबाला निष्ठेचा धूपदीप दाखविला. मोरपिसांचा कुंचा त्याच्या तोंडावरून फिरविला आणि नंतर फक्त सातच दिवसांनी....

हेरांनी खबर आणली. तावडतोब महाराज जातीने निघाले. सुमारें पांच-सहाशे मावळे बरोबर घेतले आणि ते पुण्यांत दाखल झाले. कुठे जायचेंय् अन् काय करायचेंय् याचा कुणालाहि थांग नव्हता. अन् कुणी असल्या चांभारचौकशा करीतहि नव्हता. त्याच दिवशी दिवस मावळायच्या आंत महाराज निघाले. त्यांच्या मागोमाग स्वारांनीहि लगाम ताणले.

खरोखर असें वाटतें, परमेश्वराने जेव्हा अक्कल वांटली तेव्हा हे मोंगल लोक अगदी ठरवून गैरहजर राहिले असावेत ! त्यांनी असा विचार

केला की, शिवाजीने आपल्या औरंगझेब शाहजाद्याकडे वकील पाठवून निष्ठा व्यक्त केली आहे ना! मग आता शिवाजीचें कांहीहि भय नाही! झोपा वेलाशक! आजपर्यंत तर शिवाजीने मोंगली मुलखांत यत्किंचितहि गुंडगिरी केलेली नाहीच. आणि आता तर आपण होऊन निष्ठावंत बनला आहे. शिवाजी फार चांगला आहे! मोंगल ठाणेदारांना असेंच वाटलें आणि ते शांत झोपा काढूं लागले. जुन्नरचे मोंगल ठाणेदार अगदी बेफिकीर होते. खाटल्यावर पडल्या पडल्या हुक्का फुंकीत कडक पहारा करणारे हे बहाद्दर आता शिवाजीराजाला भ्यायला तयारच नव्हते! मोंगलांचा हा ढिला कारभार हेरांनी हेरला आणि....

....त्या काळोख्या रात्रीं महाराज आपल्या शिलेदारांसह जुन्नरपाशी येऊन धडकले. महाराजांनी आपल्याबरोबर जरूर तें सर्व साहित्य आणलें होतें. जुन्नरच्या ठाण्याभवती उंच तटबंदी होती. तटाचे दरवाजे बंद होते. यापेक्षा जास्त काळजी घेणें म्हणजे बावळटपणा आहे हें ओळखून मोंगल मंडळी झोपली होती!

महाराज घोड्यावरून उतरून झपझप तटाकडे निघाले. अंधार दाट होता. मध्यरात्रीचा वखत होता. महाराजांच्या मागून उंदरांप्रमाणे तुरुतुरु त्यांचे मावळेहि चालले होते. तटाजवळ येतांच महाराजांनी तटाला शिडी लावली. इतरांनीहि भराभरा शिड्या लावल्या. महाराजांसह सर्वजण झर झर वर चढूं लागले. एका क्षणांत शे-दोनशे मावळे तटावर चढले. तलवारी उपसून हीं वानरें तटावरून कोटांत उतरलीं. खजिना, पागा, दारूगोळा, हत्यारें, कापडचोपड वगैरे कुठे कुठे काय काय आहे, याची खडान्‌खडा माहिती आधीच जमा केलेली होती. असे माहीतगार हेर नेहमी त्यांच्याबरोबर असतच. महाराजांनी इशारत करतांच सारे मावळे भराभर ठाण्यांत घुसले. कोणी हत्यारांच्या ठाण्यांत,: कोणी खजिन्याच्या खोलींत, कोणी दारूगोळ्याकडे धावले. कांहींनी आंतून

कोटाचा दरवाजा उघडला. आणि मग बाहेरचे मावळे आंत आले. मोंगल खडबडून जागे झाले. कापाकापी सुरू झाली. अन् आरडा-ओरडा माजला.

मराठ्यांनी जें दिसेल तें उचलून बाहेर पळावयास सुरुवात केली. सातशे जातवान् घोडा पागेंत ठाणबंद होता. सगळे घोडे उंदरांनी पळवले! मोंगल फक्त मरत होते! सगळा खजिना बाहेर पडला. कापडाचीं ठाणीं, हत्यारें, हिऱ्या–मोत्यांच्या संदुका भराभरा पळविल्या जात होत्या. अगदी घाई चालली होती. झटपट सारें ठाणें स्वच्छ झालें! जखमी मोंगल फक्त विवळत पडले होते. बाकी सर्व प्रेतें! सारी लूट घाडयांवर लादून ही मावळी वानरधाड जशी गुपचूप आली, तशीच गुपचूप पसार झाली![११]

कांही तासांपूर्वी जुन्नरच्या ठाण्यांत लाखो रुपयांची दौलत होती. आणि आता? आता अगदी रिकामें! फक्त मौल्यवान् शांतता शिल्लक होती! ( दि. ३० एप्रिल १६५७. ) औरंगझेबाने महाराजांना तें प्रेमाचें पत्र पाठवून फक्त सातच दिवस झाले होते!

महाराज ही लूट घेऊन स्वराज्यांत आले. स्वराज्यांत म्हणजे पंधरा कोसांवरील चाकणला. असाच धुमाकूळ मोंगलांच्या आसपासच्या भागांतहि त्यांनी घातला. जुन्नरला साडेदहा लाख रुपये, हिरेमोतीं, कापड, सामानसुमान व शिवाय सातशे घोडे महाराजांना मिळाले.[११]

ही सर्व लूट चालू असतांनाच मिनाजी भोसले नांवाचा महाराजांचा साथी मोंगलांच्या श्रीगोंद्यावर चालून गेला होता. त्यानेहि थोडी फार मिळकत केली.

महाराजांना आणखी एक मोठा आनंद झाला. पुरंदरावरून साखरे-सारखी गोड खबर आली. महाराजांच्या राणीसाहेब सईबाईसाहेब पुरंदरगडावर प्रसूत होऊन पुत्र झाला ( दि. १४ मे १६५७ ).

आईसाहेबांना नातू झाला. स्वराज्याचा युवराज जन्माला आला. बाराव्या दिवशीं पाळणा डोलला. युवराजांचें नांव ठेवलें, संभाजीराजे ![१२]

पण महाराजांचें लक्ष संसारांत थोडेंसेंच. बाकीचें स्वराज्याच्या धावपळींत. महाराजांनी आपली स्वारांची टोळी घेतली आणि ते मोंगलांच्या अहमदनगरकडे दौडले. हीं आमंत्रणें हेर घेऊन येत! नगरचा दिमाख अजून कायम होता. गेलीं सत्तावन्न वर्षें नगरकिल्ल्यांत मोंगलांचें ठाणें होतें. नौसीरखान नांवाचा मोंगल सरदार किल्ल्यांत होता. फौजहि खूप होती. महाराज फारच मोठें धाडस करीत होते. पण तसें पाहिलें तर फारसें मोठेंहि नव्हतें. कारण नाहीच डाव साधला तर पळून यायचें हें आधीच ठरलेलें असे.

महाराज अहमदनगर शहराजवळ आले. किल्ला आणि शहर यांत दीड कोसांचें अंतर होतें. मावळ्यांसह महाराज त्या शाही शहरांत घुसले. पण तेवढ्यांत नौसीरखान फौजेसह आला. महाराजांना लूट फारशी मिळाली नाही. लढाई करीत बसणें हा महाराजांचा हेतु नव्हता. मिळाली तेवढी लूट घेतली व महाराज वळले. पण खान आलाच. चकमक सुरू झाली. मावळे कांही पडले. कांही जखमी झाले. तरीहि महाराजांनी खानाला माघारा रेटलें. आणि पुण्याकडे ते पसार झाले.[११]

अन् महाराजांचा उद्योग औरंगझेबास समजला. असा चिडला भयंकर की, सांगतां सोय नाही. त्याने मुल्ताफतखानास ताबडतोब जुन्नरकडे रवाना केलें. मुल्ताफतखान जुन्नरला पोहोचला तेव्हा तेथे महाराज थांबलेले होते थोडेच! औरंगझेबाला गोड गोड आश्वासनें, त्याने मागितलीं नसतांहि देऊन, महाराजांनी चांगलेंच फसवलें होतें.

औरंगझेबाने कार्तलबखानास जुन्नरच्या बंदोबस्ताकरिता व होशदारखान, राय करणसिंह, रायसिंह, शाएस्ताखान, अब्दुल मुनीम वगैरे सरदारांस सरहद्दीवर रवाना केलें व त्यांना अत्यंत कडक लेखी हुकूम

दिले. त्यांचा थोडक्यांत हिंदवी म्हणजे मराठी तर्जुमा असा,[१३]

"शिवाजीच्या मुलखांतील गावें जमीनदोस्त करा! लोकांच्या कत्तली उडवा! दयामाया विलकूल दाखवूं नका! त्यांचें सर्वस्व लुटून आणा! पुणें आणि चाकण हीं शिवाजीचीं ठाणीं धुळीस मिळवा! आपल्या मुलखांतील जे कोणी लोक शिवाजीस सामील असतील त्यांचीं सरसहा मुंडकीं उडवा!"

या हुकमावरून औरंगझेब किती चिडला होता याची कल्पना येते. हें सगळें असें होणार हें महाराज जाणूनच होते. कारण त्यांनी आपण होऊन बादशाहाच्या या शाहजाद्याच्या नाकांत काडी घातली होती. तेव्हा हा भयंकर संतापी माणूस जास्तच खवळणार हें उघड होतें. महाराजांनी आधीच आपले धूर्त व बिलंदर वकील रघुनाथपंत कोरडे यांस तातडीने औरंगझेबाकडे रवानाहि केलें होतें. कशाकरिता? जुन्नर व अहमदनगर येथे लूट करून दांडगाई केली म्हणून पश्चात्ताप व्यक्त करण्याकरिता! माफी मागण्याकरिता! महाराजांनी रघुनाथपंतांबरोबर औरंगझेबाकडे विनंती पाठविली की, असें पुन्हा मी कधीहि करणार नाही! झाल्यागेल्याची क्षमा करा! मी केव्हाहि तुमच्या पदरीं नोकरी करण्यास तयारच् आहें!

पंतांनी अगदी गंभीर व पश्चात्तप्त मुद्रेने औरंगझेबापुढे महाराजांची नम्र प्रार्थना कथन केली. केलेल्या लुटीबद्दल महाराजांस किती दुःख होत आहे, हेंहि सांगितलें. पण लुटून नेलेली दौलत परत करतों असें चुकूनहि या बिलंदर वकिलाच्या तोंडून वाक्य निघालें नाही! महाराजांचे सगळेच वकील, सेनापति, सौंगडी इथूनतिथून सारखेच बेरकी होते. एका माळेचे मणी.

औरंगझेबानेहि घासाघीस न करतां मोठ्या उदार अंतःकरणाने माफी केली! म्हणजे? औरंगझेब इतका निवळला कसा? त्याला कारणहि

तसेंच होतें. तें अगदी गुप्त होतें. पण तें महाराजांना ठाऊक होतें! तें कारण म्हणजे औरंगझेबाचा बाप शाहजहान बादशाह तिकडे आग्र्याच्या किल्ल्यांत आजारी पडला होता. आपले परमपूज्य वडील अतिशय आजारी पडले आहेत असें समजल्यावर कोणाचें चित्त अस्वस्थ होणार नाही बरें? त्यांतून औरंगझेबाचें तर आपल्या बापावर फार प्रेम! त्यामुळे त्याला दिल्लीला जाण्याची ओढ लागली होती. त्याला वडिलांची फार काळजी वाटूं लागली. जिवाची अगदी तगमग होऊं लागली. बादशाह आजारी पडला की, त्याचीं पोरें अगदी घाबरीं होऊन जात. दुःखाने नव्हे! बापाची गादी बाप मरायच्या आंतच आपल्याला कशी मिळेल या काळजीने! बादशाह दुर्दैवाने फक्त आजारी पडला किंवा सुदैवाने संपूर्ण मेला म्हणजे त्याच्या पोरांना अस्मानाएवढा आनंदच होत असे. अन् मग लौकरांत लौकर आपल्या सर्व भावांना ठार मारून बादशाही तख्त बळकावण्यासाठी त्यांच्यांत शर्यत लागे! औरंगझेबाला काळजी लागली होती ती बाप लौकर बरा होण्याची नव्हे; तो लौकर मरण्याची व आपल्याला तख्त मिळण्याची! औरंगझेबाची, बापाविरुद्ध लढायची व बापाला ठार करण्याचीहि कर्तव्यतत्परता होती! त्याच्या बापाने म्हणजे शाहजहानने आपल्या बापाविरुद्ध पूर्वी बंड केलेंच होतें. शाहजहानच्या बापानेहि अकबराविरुद्ध हेंच केलें होतें. केवढी भव्य, दिव्य, उदात्त परंपरा ही! कित्येकदा बाप मरण्याची फार वेळ वाट पाहात बसावें लागल्यामुळे या शाहजाद्यांना बापाचा व खुदाचा फार राग येई! जणू त्यांना वाटे, हा लेकाचा बाप जन्मालाच आला नसता तर काय बहार उडाली असती!! आपणच एकदम नसतों का बादशाह झालों!!! पण काय करणार!

औरंगझेबाने महाराजांना क्षमा केली आणि महाराजांना एक पत्र दिलें. त्याचा हिंदवी तर्जुमा असा,[१४]

"तुमची अर्जदास्त रघुनाथपंत वकील यांजबरोबर जी पाठविलीत ती आम्हास पावली. मजकूर ध्यानांत आला. तुम्हीं केलेलीं कृत्यें विसरण्याजोगीं नाहीत. तथापि तुम्हीं त्या कृत्यांबद्दल पश्चात्ताप केला आणि हा दरबार उपेक्षा करणारा नाही हें तुम्हीं जाणलेंत. आता तुमची सर्व नजर निभ्रांतपणें आमचेच ठायीं आहे, हें आम्ही जाणून तुमच्या कृत्यांचेबद्दल कांहीहि मनांत किल्मिष ठेवीत नाही. तरी तुम्हीं याबद्दल संतोष मानून असावें. आमचे लोभाची पूर्णता समजावी."

या पत्रावर तारीख होती जखर १ हिजरी १०६८ (दि. १४ फेब्रुवारी १६५८).

औरंगझेबाचें सैन्य स्वराज्यांत घुसण्याची भीति टळली. शिवाय जुन्नर, नगर, श्रीगोंदा वगैरे ठिकाणची लूटहि बिनबोभाट पदरांत पडली.

कऱ्हेपठारीचा खंडोबा महाराजांवर अगदी प्रसन्न होता. यशामागून यश पदरीं पडत होतें. राजकारणें साधत होतीं. शिवाय स्वराज्याच्या अंगणांत खेळावयास युवराज आला होता.

या वेळीं शहाजीराजे कर्नाटकांत होते.

बापाचा व भावांचा निकाल लावण्यासाठी औरंगझेब दिल्लीकडे धावत होता.

* * *

---

**आधार:**—(१) सभासद पृ. ११. (२) पसासं ८५२, ९५४ ते ५६ २३२२; शिचसा ७, पृ. ६१ ते ६४. (३) शिचसा ७।४४. (४) शिचसा ५।८२४. (५) सभासद पृ. ८. (६) जेधेशका. (७) आघइ पृ. २००. (८) शिचत्रसं २।३४. (९) आघइ. पृ. १५३ व ९३. (१०) राजखंड ८।५ (११) सभासद पृ. ८; J. N. S. Shivaji Page 50. (१२) जेधेशका. (१३) J. N. S. Shivaji Page 51. (१४) राजखंड ८।५.

## ४ : दर्यासारंग



औरंगझेब पक्का आंतल्या गांठीचा होता. दिल्लीचें तख्त मिळविण्या-करिता त्याला घाईघाईने जावें लागलें. नाही तर तो महाराजांच्या मागे हात धुऊन लागला असता. मराठ्यांचें स्वतंत्र राज्य निर्माण होण्याची कल्पनाच औरंगझेबाला सहन होत नव्हती. पण दिल्लीच्या ओढीमुळे शिवाजीचा हा वंडावा सोडून त्याला जावें लागलें. पण महाराजांनी ही औरंगझेबाची गुप्त अडचण आधीच ओळखून हा लुटीचा डाव साधून घेतला होता.

औरंगझेब जरी दिल्लीकडे निघून गेला होता तरी त्याच्या मनांत महाराजांबद्दल भयंकर राग ठासून भरलेला होता. त्याने जातां जातां हा राग बरोबर नेलाच आणि शिवाय विजापूरच्या अली आदिलशाह बादशाहाला पत्राने जें कळविलें त्याचा हिंदवी तर्जुमा असा,[1]

"दख्खनच्या मुलखाचें संरक्षण करा. व्यवस्था चांगली ठेवा. शिवाजी तुमचे किल्ले बळकावून बसला आहे. त्याला हुसकावून लावा! त्याला जर तुम्ही जिंकून नोकरीवर ठेवणारच असाल तर त्याला कर्नाटकांत नोकरी द्या; पण महाराष्ट्राच्या डोंगराळ भागांत ठेवूं नका! तुम्ही आमच्याशीं निष्ठेने वागा, म्हणजे तुमचें कल्याण होईल. आम्ही हल्ली फौजेसह दिल्लीकडे जात आहोंत."

आता महाराज औरंगझेबालाहि भीत नव्हते आणि विजापूरच्या अली आदिलशाहालाहि भीत नव्हते. राजगडच्या राजवाड्यांतून हरघडी त्यांना दिसत होता कोंढाणा. शहाजीराजांच्या सुटकेच्या वेळीं कोंढाणा

विजापूरकरांना देऊन टाकावा लागला होता. महाराजांना तो परत हवा होता. दररोज दहा वेळां कोंढाणा त्यांना बेचैन करीत होता. महाराजांचें दलबादल जमूं लागलें. गर्जनांनी अस्मान भरून गेलें. बादळाची पूर्वतयारी जय्यत झाली. हत्यारांच्या विजा सळसळूं लागल्या. महाराजांनी पराक्रमप्रलयासाठी फुंकर घातली आणि स्वराज्याच्या सैनिकांचें, राजगडच्या दरवाजांतून प्रचंड वादळ सुटलें. शिंगें फुंकलीं गेलीं. हर हर महादेव अन् जय भवानीच्या आरोळ्यांनी कानठळ्या बसल्या. शिवतांडव सुरू झालें. पहिला त्रिशूल घुसला तो कोंढाण्यावरच्या सुलतानशाही सैन्याच्या छातींत. कोंढाणा काबीज झाला.[२] गडावर भगवा झेंडा चढला ( दि. १३ ऑगस्ट १६५७ या सुमारास ).

रघुनाथ बल्लाळ अत्रे यांनी दाभोळ काबीज केलेंच होतें.[३] ते आता दंडाराजपुरीवर चालून निघाले ( दि. १४ ऑगस्ट १६५७). रघुनाथपंतांनी दंडाराजपुरीलगतचा किनारा जिंकला व जंजिऱ्याच्या सिद्दीला मोर्चे लावले. जंजिऱ्याचा हा सिद्दी म्हणजे पाण्यांतला उंदीरच होता ! जंजिऱ्यावरची कलाल बांगडी कोकणच्या उरांत धडकी भरवीत होती. महाराजांची तळमळ अशी होती की, हा पाण्यांतला सिद्दी कायमचा बुडवून टाकून सबंध उत्तर कोकण काबीज करायचेंच. पण मुरुडजवळ असलेला समुद्रांतील हा जंजिरा काबीज करणें अत्यंत अवघड होतें. त्याकरिता उत्कृष्ट आरमाराची जरूरी होती. महाराजांनी समुद्राचें बळ ओळखलेलें होतें. सह्याद्रि, समुद्र आणि मावळे यांच्या प्रचंड सामर्थ्यानिशी महाबलवंत स्वराज्य उभें करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. रघुनाथपंतांना जंजिरा प्रत्यक्ष काबीज करणें अशक्य होतें. परंतु शिद्दीवर त्यांनी मराठी जरब मात्र बसविली.[११]

या वेळीं महाराजांचे मुख्य मुख्य अंमलदार महाराजांच्या बरोबरच घोडे दौडीत होते. पुढीलप्रमाणे हे अधिकारी होते. शामराज नीळकंठ

रांझेकर (पंत पेशवे), वासुदेव बाळकृष्ण हणमंते (मुजुमदार), महादाजी शामराज सुरनीस (सचिव), माणकोजी दहातोंडे सरनौबत (घोडदळाचे सरसेनापति),नूरखान बेग सरनौबत (पायदळाचे सरसेनापति) या सर्व मंडळींशिवाय कितीतरी तडफेचे तरुण, प्रौढ आणि वृद्ध मराठेहि या पराक्रमाच्या वादळांत सामील झाले होते. निळोपंत बहूतकर, सोनोपंत डबीर, कान्होजी जेधे, पंताजी गोपीनाथ बोकील वगैरे अगदी म्हातारी मंडळी; बाजी जेधे, तान्हाजी, येसाजी, सूर्याजी, नेताजी, जिवा महाल्या, मोरोपंत पिंगळे, रामचंद्रपंत बहूतकर, त्र्यंबकपंत डबीर वगैरे तरुण आणि........कितीजणांचीं नांवें सांगू ? सगळे, सगळे, सगळे —प्रत्येकजण चौखूर घोडदौड करीत होता.

महाराज स्वतः गुप्त वेषाने कल्याणच्या बाजूस कोकणांत याच वेळीं उतरले. ते असें धाडस करूं लागले की, त्यांच्या जिवलगांचा जीव काळजीने खालीवर होई. पण मनीं घेतलेलें धाडस तडीला नेल्याशिवाय ते सोडीत नसत. धाडस, महत्त्वाकांक्षा आणि पराक्रमाची हौस नसेल तर तो पुरुष कसला ? महाराज पुरुष होते. पुरुषोत्तम होते. महाराज सर्व टेहेळणी करून देशावर आले. यावेळीं दसरा नुकताच होऊन गेला होता ( दि. ६ ऑक्टोबर १६५७ नंतर ).

महाराजांनी आपल्याभवती असलेल्या एकेका बहाद्दराला भराभर एकेक कामगिरी सांगितली. दादाजी बापूजी रांझेकरांना महाराजांनी फर्मावलें, कल्याण काबीज करा म्हणून. सखो कृष्ण लोहोकऱ्यांना म्हटलें भिवंडी जिंका म्हणून. बाकीच्या प्रत्येकाच्या भिवया उत्सुकतेने हुकूम झेलायला उंचावल्या होत्या. अन् मग महाराजांनी एकेकाला एकेक गड फर्मावला. लोहोगड, तुंग, तिकोना, विसापूर, राजमाची, प्रबळगड, सरसगड वगैरे चाळीस किल्ल्यांची मोहीम महाराजांनी आखली.

आणि आश्चर्य केवढें ! भराभरा एकेक ठाणें स्वराज्यांत दाखल होत

गेलें. भिवंडी व कल्याण हीं दोन्हीहि महत्त्वाचीं ठाणीं एकाच दिवशीं ( दि. २४ ऑक्टोबर १६५७ ) काबीज झालीं. महाराजांच्या कानावर चहूंकडून विजयाच्या बातम्या वर्षूं लागल्या. आनंदाची उधळण सतत होत राहिली. आपल्या बहाद्दर सौंगड्यांचें शौर्य पाहून महाराजांना केवढा अभिमान वाटला ! कां वाटूं नये ? हे मर्द म्हणजे महाराजांच्या अंगावरचे जडावाचे एकेक अलंकार होते.

कल्याण काबीज होतांच महाराज स्वतः कोकणच्या स्वारीवर निघाले. फौजेसह ते कल्याणला आले. समुद्र कल्याणच्या खाडींत घुसून नाचत होता. मराठी पराक्रमावर महाराज आणि समुद्र दोघेहि निहायत प्रसन्न झाले होते. झुळझुळू धावत येत सागराच्या लाटा किनाऱ्यावर फुटत होत्या. जणू तो जलराजा महाराजांपुढे पायघड्या पसरीत होता. खाडींत उभ्या असलेल्या लढाऊ नौका उंच गगनांत भगवे ध्वज डोलवीत स्वतःहि डोलत होत्या. स्वराज्याचें हें पहिलें आरमार सागरावर तरंगत होतें. महाराजांनी स्वराज्याचा पहिला सरखेल म्हणजे सागराध्यक्ष म्हणून नेमलें दर्यासारंगास. शिवाय इब्राहीमखान, दौलतखान, सिद्दी मिस्री व मायनाक भंडारी हे अत्यंत शूर, धाडसी व निष्ठावंत अधिकारी आरमारांत सामील केले.[५] आरमारी तळासाठी कल्याणलाच एक किल्ला खाडीवर तामीर करावयाचा हुकूम महाराजांनी आबाजी महादेव सुभेदारांस दिला. हाच तो दुर्गाडीचा किल्ला. त्याचा पाया खणतेवेळीं महाराजांस अमूप द्रव्य सापडलें.

कल्याणहून महाराज जातीनें माहुलीच्या किल्ल्यावर चालून निघाले. माहुलीचा किल्ला असनगावच्या जवळ आहे. याच माहुलीगडावर शहाजीराजांनी निजामशाही टिकविण्यासाठी अखेरची झुंज मोंगलांशीं, एकवीस वर्षांपूर्वीं दिली होती. त्यांत ते हरले होते. तो गड महाराजांनी आज जिंकला ( दि. ८ जानेवारी १६५८ ). यानंतर लगेच महाराज

राजगडावर परत आले.[६] या दिवशीं मकरसंक्रांत होती ( दि. १४ जानेवारी १६५८ ).

महाराज नंतर राजगडावरून चौलकडे वळले. चौल पोर्तुगीझ फिरंग्यांच्या ताब्यांत होतें. तेंहि काबीज झालें. गोव्याच्या गोरंदोराच्या, म्हणजे गव्हर्नर जनरलच्या छातींत धडकी भरली. महाराजांचें सैन्य थोडें होतें. पण त्या सैन्याची ताकद सुरुंगाच्या दारूसारखी भयंकर होती. महाराजांनी तळें आणि घोसाळें हीं दोन्हीहि कोटबंद सागरी ठाणीं यावेळीं लगेच काबीज केलीं.

गोव्याच्या गोरंदोराने मराठ्यांच्या या पुंडाईबद्दलचा रिपोर्ट

*मध्ययुगीन भारताचा पहिला दर्यादिला*



पोर्तुगालला आपल्या फिरंगी राजाकडे पाठवून दिला (दि. ५ मे १६५८).

कोकणच्या उत्तर भागांत महाराजांनी या सहा–सात महिन्यांत पराक्रमाने अक्षरशः तुफान उडवून दिलें. एवढे क्रूर व चिवट फिरंगी अन् सिद्दी, पण तेहि घाबरून गेले. महाराजांनी रत्नागिरी, खारेपाटण वगैरे अनेक ठिकाणें जिंकलीं व खारेपाटणच्या जवळच समुद्रांत विजयदुर्ग नांवाचा जबर जंजिरा बांधण्यास सुरुवात केली. आता सुवर्णदुर्ग, कल्याण आणि विजयदुर्ग हीं बळकट आरमारी ठाणीं निर्माण झालीं.

महाराज आता दक्षिणेकडच्या कोकणांत उतरले. विजयदुर्गच्या किल्ल्यावरहि गेले. अथांग सागर पसरला होता. वर आकाश खाली समुद्र आणि विजयदुर्गावर महाराज उभे होते. तिघांनाहि उपमा एकमेकांचीच. आकाशांत ढग भिरभिरत होते. महाराजांचा शेला, अंगरखा आणि मोत्यांचा तुरा वाऱ्यावर नाचत होता आणि सागराच्या लाटा विजयदुर्गावर आदळत होत्या. जणू महाराजांना त्या किताब बहाल करीत होत्या आणि ओरडून म्हणत होत्या, 'हे महाराष्ट्राच्या महाराजा, जा! हें तुझें आरमार घेऊन क्षितिजाच्या पलीकडे जा! दुष्मनांचें होडगेंसुद्धा पश्चिम किनाऱ्यावर तूं फिरकूं देऊं नकोस! बदमाषगिरी करून कुणी बदफैली करील तर तोफेच्या दणक्याने तूं तें उडव! मी तें लगेच गिळून टाकीन! महाराजा, तूं पाण्यावरचाहि पातशाह आहेस! साफ गनीम बुडव!'

महाराजांनी संगमिरी नांवाची लढाऊ गलबतें बांधवून या वेळीं समुद्रांत सोडलीं. भगव्या झेंड्याचा धाक पश्चिम समुद्रावर चांगलाच बसला. ज्याच्याजवळ आरमार, त्याच्या ताब्यांत समुद्र हें तत्त्व महाराजांनी अचूक ओळखलें होतें.

गोमांतकाचे जवळ कुडाळ व सावंतवाडी येथे सावंत भोसले म्हणून एक घराणें जहागीर सांभाळून होतें. हे भोसले म्हणजे महाराजांचे

भाऊबंदच होते. भगवंतगडापासून तेरेखोलच्या किल्ल्यापर्यंतचा समुद्र-किनारा सावंतांच्या मुलखाला लागून होता. पण आरमाराकडे त्यांचें लक्ष नव्हतें. हे सावंतराजे स्वतःला आदिलशाहाचे सरदार म्हणवीत. या वेळीं (इ. १६५८ अखेर) विजापुरकरांचा सरदार रुस्तुमजमान हा राजापुरापासून वेंगुर्ल्यापर्यंतच्या कोकणचा सुभेदार होता. अर्थात् सावंतांचाहि मुलुख रुस्तुमजमानच्या हुकुमतीखाली होताच. परंतु लखम सावंतांचें व रुस्तुमचें वाकडें आलें. तेव्हा रुस्तुमने सावंतवाडीवर स्वारी केली. लखम सावंतांच्या व त्याच्या चकमकी झडूं लागल्या. आपलें बळ अपुरें आहे हें लखम सावंतांनी जाणलें व महाराजांकडे मदतीकरिता धाव घेतली. सावंतांचा वकील पितांबर शेणवी महाराजांकडे आला व उभयतांचा तह ठरला.[७] तहांत सावंतांनी स्वराज्यांत सामील होऊन महाराजांचें स्वामित्व मान्य केलें. सावंत भोसले व शिवाजी महाराज भोसले एक झालेले पाहून रुस्तुमजमान मुकाट्याने गप्प बसला.

याच स्वारींत गोवलेकर सावंत हे महाराजांच्या भेटीस आले. त्यांस नांवाजून महाराजांनी पदरीं ठेविलें. गोवलेकर सावंतांपाशी एक अप्रतिम दुधारी तलवार होती. ही तलवार जलचरांच्या मुलखांत (युरोपांत) तयार केलेली होती. बहुधा ती फिरंगाणांत (पोर्तुगालांत) तयार झालेली असावी. ती अत्युत्कृष्ट तलवार सावंतांकडून महाराजांस मिळाली. त्याबद्दल महाराजांनी सावंतांना तीनशे होन (सुमारें १०५० रुपये) आणि मानाचा पोषाख दिला. महाराजांनी या तलवारीचें नांव 'भवानी' असें ठेविलें. हीच ती भवानी तलवार!

मोरोपंतांनी जावळीच्या खोऱ्यांतील किल्ला बांधून पूर्ण केला. महाराज किल्ला पाहावयास आले. पंतांनी आपली सारी बुद्धि ओतून गड घडवला होता. महाराजांना गड फारच आवडला. आईसाहेबांनी गड पाहिला तेव्हां तर त्यांना अगदी मनापासून हा दागिना आवडला. खरोखरच किल्ला

मोठा तालेदार बांधला होता. असें वाटत होतें की, किल्ला बाहूंत कवळावा. महाराजांनी चांगलें म्हटलें. पंत धन्य झाले. गडावरती वाडे, सदरा, तळीं, चोरवाटा, चिलखती बांधणीची तटबंदी आणि बालेकिल्ला पंतांनी बांधला होता. गडावर जाईच्या वेलीखाली स्वयंभू शिवलिंग सापडलें. त्यावरती महाराजांनी लगेच देऊळ बांधवून त्याला नांव दिलें केदारेश्वर.[८] महाराजांनी गडाचें नांव ठेवलें 'प्रतापगड'. गडाच्या पूर्वेला महाबळेश्वराचा प्रचंड पहाड, दक्षिणेस व उत्तरेसहि असेच उंच उंच पर्वतपुत्र अन् पश्चिमेस तशींच दरींखोरीं होतीं. या सह्याद्रीच्या मगरमिठींत कोणत्या शत्रूची हिम्मत होती प्रतापगडावर चालून येण्याची? सबंध मावळपट्टींत प्रतापगडाइतका अडचणीचा व विकट किल्ला आता दुसरा नव्हता. गडाभवती अरण्य तर इतकें घनदाट होतें की, एकवेळ हिडिंबेच्या डोक्यांतील ऊं सापडली असती पण इथे लपलेला हत्ती सापडला नसता!

सईबाईसाहेब प्रसूत झाल्यानंतर कांही दिवसांनी आईसाहेबांनी त्यांना व युवराज संभाजीराजांना पुरंदरावरून राजगडावर नेलें.[९] सईबाईसाहेबांची प्रकृति फारच अशक्त झाली होती. बाळराजांचें अंगावरच्या दुधाने पोट भरेना. म्हणून नसरापूरजवळच्या कापूरव्हाळ नांवाच्या गावच्या गाडे नांवाच्या मराठा घराण्यांतील धाराई नांवाच्या स्त्रीस आईसाहेबांनी राजगडावर बोलावूं धाडलें. धाराई लगबगा आली. आईसाहेबांनी संभाजीराजांना तिच्या मांडीवर ठेवलें. धाराईने बाळराजाला पदराखाली घेतलें. धाराई युवराजाची दूधआई झाली.[९] तिच्या दुग्धधारेवर बाळराजा पोसला जाऊं लागला. तिचीं स्वतःचीं दोन मुलें शूर निपजलीं होतीं. स्वराज्याच्या सैन्यांत तींहि मुलें सामील झालीं होतीं.[९]

समर्थ रामदास स्वामींनी चाफळला आपल्या मठांत रामजन्म व अन्य


महोत्सव सुरू केले होते. रामाची मूर्ति तेथे स्थापन केली होती. महाराजांनी जावळीच्या खजिन्यांतून दरसाल श्रीदेवास दोनशे होन ( रु. सातशे ) देण्याची आज्ञा केली, ती याच वेळीं.[१०]

यावेळीं स्वराज्याचे सरनौबत माणकोजी दहातोंडे हे फारच वृद्ध झाले होते. तरीहि पराक्रम गाजवीतच होते. पण आता महाराजांनी त्यांच्या जागीं तितकीच धडाडी आणि धार असलेला वीर निवडला. तो म्हणजे नेताजी पालकर. नेताजी पुरंदरची किल्लेदारी पाहात होता. आता पुरंदरावर मुरारबाजी देशपांडा किल्लेदार झाला, नेताजी सरनौबत झाला आणि माणकोजी महाराजांच्या सदरेवरचे सल्लागार बनले.

महाराजांच्या धुमाकुळाने विजापूरच्या दरबारांतील हवा भयंकर तापली होती. सर्वांत जास्त संतापली होती एक व्यक्ति ......उलिया बेगम बडी साहेबा! बादशाह अली आदिलशाहाची आई.

* * *

**आधारः**—(१) J. N. S. Shivaji. Page 55. (२) शिवापूर यादी शिचप्र पृ. ५०. (३) इसंऐटि भा. ४ पृ. ४१. (४) पसासं ७२२. (५) सभासद पृ. ९७; पसासं २२२९. (६) शिचप्र पृ. ५०. (७) सांइसा ७. (८) इसस्फुले भा. ३ पृ. ७५. (९) गाडेकरीणा. (१०) पसासं १०४०. (११) शिभा १८।५०.



## ५ : बडी साहेबा

महाराजांच्या या तुफानी धुमाकुळाच्या एका पाठोपाठ एकेक खबरी विजापुरांत येऊन पोहोचत होत्या. दरबार अगदी खवळून गेला होता. रोज कांही ना कांही तरी ‘गेल्याची’ खबर येत होती. आज हा किल्ला गेला, उद्या तो किल्ला गेला, तो मुलुख गेला, अमुक ठाणें लुटलें, अमुक बंदर जिंकलें, शिवाजीने शाही मुलखावर लुटीचा साफ झाडू मारला,[१] निम्मी कोकणपट्टी गेली, असेंच कांही ना कांही रोज जात होतें. असेंच जर होत राहिलें तर एक दिवशीं विजापूर आणि दुसऱ्या दिवशीं आपणच ‘गेल्याची’ बातमी ऐकायची वेळ येईल, ही चिंता बादशाहाला बिलगून बसली! आता या शिवाजीच्या बंडखोरीला करावें तरी काय, हें कोणाला कळेना. सरदार डोक्याला हात लावून बसले होते. पण हेंहि खरें होतें की, आदिलशाही दरबारचें बळ शिवाजी महाराजांपेक्षा असंख्य पटींने जास्त होतें. महाराजांस साफ चिरडून टाकणें बादशाहाला कांही कठीण नव्हतें. परंतु एवढ्या मोठ्या अफाट बळाच्या बादशाहीस हा शिवा बंडखोर भीत कसा नाही, याचेंच आश्चर्य सर्वांस वाटत होतें. सगळे सरदार फिकरमंद झाले होते.

बादशाही महालांत तर संतापाचें केवळ तेल उकळत होतें. बादशाहापेक्षा त्याची आईच जास्त खवळली होती.[२] तिने महाराजांना किती शिव्या मोजल्या असतील, खुदा जाणे! मनांतल्या मनांत दिवसांतून दहा वेळां महाराजांना तिने जिवंत जाळलें असावें, वीस वेळां जिवंत सोलून काढलें असावें आणि पन्नास वेळां त्यांची गर्दन उडविली असावी! अर्थात् मनांतल्या मनांत!

## भाग तिसरा

१८५२

शिवाजी भोसल्याची बगावत बीखो बुनियाद उखडून काढण्याचा निश्चय बाईंनी केला. पण एकदा शहाजीराजांना त्यांच्या पोराची हरामखोरी कळवून पाहावी असा विचार करून बादशाहाच्या नांवानें एक दमदाटीचा खलिता राजांकडे कर्नाटकांत रवाना केला. 'या तुमच्या पोरास आवरा ! नाहीतर त्याच्या वंडखोरीचा नतिजा फार भयंकर होईल !' हा खलित्याचा आशय होता.[८]

आपला पुत्र इतका प्रतापवंत बनलेला ऐकून शहाजीराजांस धन्यताच वाटली. त्यांनी दरबारला सरळ कळविलें. 'पोरगा माझें ऐकत नाही ! तुमचें तुम्ही पाहून घ्या[८] !'

आता आला का घोटाळा !

बड्या साहेबिणीचें ठाम मत:झालें की, शिवाजी आणि शहाजी, दोघेहि निमकहराम आहेत ! प्रथम शिवाजीचा नाश केलाच पाहिजे. ती विचार करूं लागली.

महाराजांना विचार करायला वेळच नव्हता. ते आपलें बळ वाढवीत होते. किल्ले बेलाग बनवीत होते. आरमारी तळ समर्थ करीत होते. पागा, पायदळ आणि तोफा मिळतील तितक्या मिळवीत होते. राजगडावरून बुद्धिबळाचा डाव खेळत होते. भवती असलेली मंडळी आणि आईसाहेब डोळ्यांत तेल घालून पटावरची हालचाल टेहळीत होत्या. जरा कुठे संधी दिसली की, महाराजांस सर्वजण सुचवीत, हें प्यादें सरकवावें पुढे !

बेगम बडी साहेबा मात्र संतापलेली होती.[८] ही बडी साहेबीण म्हणजे अली आदिलशाहाची आई. ती त्याची सख्खी आई नव्हती. पण तिचें अलीशाहावर फार प्रेम होतें. राज्याचा सर्व कारभार तिच्याच हातीं होता. ही गोवळकोंड्याच्या सुलतान महंमद कुतुबशाहाची मुलगी व मरहूम मुहम्मद आदिलशाहाची बायको होती.[२] हिचें नांव होतें ताज

उद्ध मुखदिरात.[३] तिला वडी साहेबा किंवा उलीया जनाबा[४] या सन्मानदर्शक नांवांनीच सल्तनतींतील लोक ओळखत होते. मराठी मुलखांत मात्र तिला वडी साहेबीण म्हणत. तिचा दरारा विजापूरच्या दरबारांत फारच कडक होता. सर्वजण तिला फार भीत. कारण, होतीच तशी ती पाताळयंत्री. दरबारांतील एक अत्यंत बडा सरदार व सेनापति खान मुहम्मद याला तिने अफजलखानाच्या सांगण्यावरून ठार मारून टाकलें होतें[६] (दि. १० नोव्हेंबर १६५७). तसेंच, वहलोलखान नांवाच्या एका सरदाराचें वर्तन निष्ठेचें नाही असा तिचा समज झाल्यावरोवर त्यालाहि तिने छाटून टाकलें[५] (जुलै १६५८). अशी ही महा कजाग बाई आता महाराजांवर संतापली होती. तिने पक्का इरादा केला की, शिवाजीचा साफीसाफ नायनाट करायचाच. तिने आपल्या वजिरामार्फत सर्व सरदार-मनसबदारांना दरबारची तश्रीफ फर्मावली.[७]

दरबारांत एकेक महशूर रुस्तुम, गाजलेले कदीम समशेरबहाद्दर आणि मानकरी दाखल झाले. दरबारची शान नेहमीइतकीच आजहि झगमगत होती. गालिचे, भव्य कमानीवर झुळझुळणारे रेशमी झालरदार पडदे, रंगीबेरंगी काचांचीं मोठमोठीं झुंबरें, सोन्याचांदीच्या जाळीदार हंड्या, जाळीदार धूपदाणींतून सर्वत्र पसरणारा सुगंधी धूर, हातांत सोन्याचे नक्षीदार दंड घेतलेले शाही गुर्झबारदार, उंचावर असलेलें वैभवशाली तख्त, त्यावर भरजरी लोड, गिरद्या व मसनद आणि मखमलीचें झालरदार हिरवें छत्र असा थाट नेहमीचाच असे. दरबारचे बाहेर तलवारी किंवा भाले घेऊन उभे असलेले धिप्पाड पहारेकरी असावयाचेच. दरबारांत बादशाहाच्या जनानखान्यांतील बेगमांना बसण्याकरिता स्वतंत्र सज्जा असे. त्याला जाळीदार पडदे लावलेले असत. तख्ताच्या उजव्या हाताशीं खाली वजीर उभा राहात असे.

तख्ताच्या दोन्ही बाजूंस सोन्याचे दंड घेतलेले गुर्झबारदार उभे राहात. त्यांच्या सोन्याच्या दंडांवर सोन्याचाच अर्धचंद्र व चांदणी असे. अन् झुळझुळीत रेशमी शेमला त्या दंडाला बांधलेला असे. बादशाह दरबारांत प्रवेश करीत असतांना ते गुर्झबारदार बादशाहाच्या अल्काबाच्या ललकाऱ्या देत.

दरबार भरला. बादशाह अली आदिलशाह ललकाऱ्यांच्या निनादांत दरबारांत येऊन तख्तावर बसला. उभा असलेला दरबार सतत कुर्निसात करीत होता. बडी बेगमहि पडद्यांत येऊन बसली. ती अत्यंत अस्वस्थ होती. दरबारांत बाजी घोरपडे, मंबाजी भोसले, झुंजारराव घाटगे, अंकुशखान, रुस्तुमजमान, मुसेखान, याकूत, अंबर, हसन, पठाण, सिद्दी हिलाल, पहिलवानखान वगैरे अत्यंत प्रमुख असे बावीस व इतर असंख्य सरदार होते.[७] दरबारापुढे अत्यंत महत्त्वाचा सवाल होता शिवाजीच्या बंडाचा बीमोड करण्याचा. कोण तयार आहे शिवाजीवर चालून जायला हा सवाल होता.

तख्तापुढच्या चौरंगावर एका तबकांत विडे ठेवलेले होते. शिवाजीची शरारत खतम् करावयास जो तयार असेल त्याने तख्तापुढचा विडा उचलावा!

दरबारांत अत्यंत गंभीर वातावरण पसरलें होतें. कोणाचीहि मान वर होत नव्हती. शिवाजीवर स्वारी करणें म्हणजे फारच महागाईची गोष्ट होती!

बड्या साहेबिणीने एकदम मोठ्याने सवाल फेकला.[९]

"बताओ। कौन तैयार है? शिवाजीको गिरफ्तार करने के लिये कौन जान की बाजी लगाएगा? बताओ!"

दरबारचा नूर जास्तच गंभीर झाला. भयाण स्तब्धता पसरली. जो तो मान खाली घालून उभा राहिला. बेगमेच्या कपाळावर रागाच्य

आठ्या चढल्या. तिचे डोळे वटारले गेले. बादशाहाहि अस्वस्थ झाला. आता बाई जास्तच खवळणार हें स्पष्ट दिसूं लागलें.

तेवढ्यांत चाहूल उमटली. दरबारांत उभ्या असलेल्या सरदारांतून एक अत्यंत धिप्पाड देह एकदम पुढे आला. अफजलखान! अफजलखान! कुर्निसात करीत करीत खान पुढे झाला. सर्व दरबाराचे डोळे त्याच्यावर खिळले. बड्या साहेबिणीची मुद्रा एकदम फुलली. बादशाह खूष झाला. अफजलखानाने पुढे होऊन झटकन् तबकांतील विडा उचलला![७]

आता दरबारचा नूर एकदम पालटला. अफजलखान मोठ्या हिमतीने आणि आवेशाने म्हणाला,[१]

"मैं शिवाजीको गिरफ्तार कर हुजूरके आगे पेश करूंगा!"

ही प्रतिज्ञा ऐकून साहेबीण निहायत खूष होऊन गेली.[१] दरबारी मनसबदारांनी खानाची वाहवा सुरू केली. जो तो धन्यवाद देऊं लागला. मरहबा! सुबहान अल्ला! शाबाश! जीते रहो बहादर! उम्र दराज हो! आमीन आमीन आमीन!

दरबारांत एकदम उत्साह दाटला. सुतकी, रडवे आणि चिंताक्रांत चेहरे हसले. बादशाहाने अफजलखानास लगेच मोत्याचा तुरा, शिरपाव, खिलत, घोडा, फिरंग, वगैरे मानचिन्हें देऊन त्याची सर्फराजी केली.[१] खानाने खूपच मोठी मोहीम अंगावर घेतली. पण खानाला मात्र ती फारशी मोठी वाटत नव्हती. शिवाजी तर केवळ एक कोहस्तानी बगावतखोर लडका. सहज मारूं. आसानीने खतम् करूं, अशी त्याला उम्मीद होती.

विजापुरांत स्वारीची प्रचंड तयारी सुरू झाली. तंबू, शामियाने, उंट, हत्ती, तोफा, दारूगोळा, दाणावैरण आणि सैन्य यांची जमवाजमव सुरू झाली. विजापूर शहर लष्करी आमदरफ्तीने गजबजून गेलें. शहराबाहेर

स्वीकृत.
२४४८०
दि. १२-२-८९

**भाग तिसरा**

प्रचंड छावणी पडली. सुमारें बारा हजार घोडेस्वार व दहा हजार पायदळ लष्कर डेरेदाखल झालें.[१०] बाराशे उंट, पासष्टाहून जास्त हत्ती, असंख्य लहान मोठ्या तोफा, पालख्या, भोई, नोकर, बाजार, बाजार-कामगार वगैरे अफाट पसारा औरसचौरस पडला.[११]

खानास बादशाहाने अगणित खजिना दिला.[११] खानाची जंगी तयारी झाली. कूच करण्याचा दिवस जवळ आला. तेव्हा बादशाहाने खानाची एकांतांत भेट घेतली व त्याला असा स्पष्ट हुकूम दिला की, तूं शिवाजीला हरउपायाने दगा करून ठार मार![१६] आणि नंतर बादशाह खानाला म्हणाला,

..................

*स्वराज्यावरील वादळाचे ढग जमूं लागले...*



"हमारी फौज में माँ-बदौलत के अरमानों को उँचे उठानेवाले तुमही एक हो। काफरों के और बूत के सच्चे दुश्मन भी तुम हो। विजयनगरके रामराजाके बाशिंदो को तुम्ही ने परास्त किया। तुम्हारे कदम जमीन को थर्राते हैं। पहाड काँपने लगते हैं। दर्यामें तूफान उठता हैं। तुम्हारे होते शहाजीका वह नाचीज़ छोकरा शाही सल्तनत के विरोध में बग़ावत का झण्डा खडाही कैसे करता है। शिवाजी इस्लामका खातमा करने पर तुल गया है। दख्खन की पहाडीयोंने उसका हौसला और भी बढा दिया है। इसीलिये शाही दौलत की काफी लूट उसने की। क्या शाही सल्तनत को भी अब वह मिटा देगा? शिवाजी को कैद करने की हिंमत और किसी में नही। माँ-बदौलत चाहते हैं यह काम तुम करो।"

हें ऐकून खान खूष होऊन म्हणाला,[१२]

" हुजूर के इन अल्फाजोंने मेरी ताकद और भी बढ़ा दी है। हुजुरने यह काम मुझपर सौंप दिया यह आला दर्जा किया। अब मैं दुनियाको दिखला दूंगा कि अफझल खाँ अपनी कलाई में कितनी ताकद रखता है। उस बदमाष शिवाजी को जेरबंद कर यदि हुजुर के सामने पेश न किया तो मेरी सारी शेख़ी फजूल हो जायगी।"

आणि मग खूष झालेल्या बादशाहाने अफजलखानाला अत्यंत मौल्यवान् अशा कितीतरी वस्तु व अलंकार बक्षीस दिले.[१३] त्याने आपली खास स्वत:ची अत्यंत तीक्ष्ण कट्यार अफजलखानास दिली. या कट्यारीचें म्यान रत्नजडित होतें.[१४]

बड्या साहेबिणीनेहि खानाला सल्ला दिला:[१५]

" हमारी फौज बिलकुल नाचीज है। हम दोस्ती करना चाहते है, ऐसा बहाना बनाकर शिवाजीको धोखा देना!"

आपल्या ताकदीची आधीच घमेंड असलेला खान आता तर जास्तच

गर्विष्ठ बनला. त्याने बादशाहास कुर्निसात केला व तो आपल्या छावणींत गेला.

बादशाहाने खानाबरोबर अनेक सरदार दिले. अंबर, याकूत, मुसेखान, हसनखान पठाण, रणदुल्लाखान, अंकुशखान, सिद्दी हिलाल, घोरपडे, नाईकजी पांढरे, खराटे, कल्याणजी यादव, मंबाजी भोसले (शहाजीराजांचा सख्खा चुलत भाऊ), झुंजारराव घाटगे, काटे,[१६] जिवाजी देवकांते, प्रतापराव मोरे जावळीकर, अबदुल सय्यद, सय्यद बंदा, रहीमखान (अफजलखानाचा पुतण्या), पिलाजी मोहिते, शंकराजी मोहिते, पहिलवानखान, सैफखान[१७] आणि यांशिवाय कितीतरी इतर सरदार खानाच्या फौजेंत दाखल झाले. खानाचा थोरला मुलगा फाजलखान व इतर दोघे पुत्रहि बापाबरोबर निघाले. वकील म्हणून कृष्णाजी भास्कर कुलकर्णी या चतुर कारभाऱ्यास खानाने बरोबर घेतलें. आदिलशाही हिरवा झेंडा छावणींत फडकूं लागला. एवढा पसारा आता महाराजांवर लोटणार होता. शिवाय जातां जातां अनेकजण सामील होणार होते. तसे त्या लोकांना हुकूम सुटले होते. शिवाय महाराजांच्या पदरीं असलेल्या सरदारांना फोडून आपल्याकडे वळविण्यासाठी बादशाहाने मावळांतील देशमुखांना कडक दमदाटीचीं फर्मानें सोडलीं. शिवाजी सापडेपर्यंत मोहीम सख्त चालविण्याची तयारी खानाने ठेवली होती. निदान तीन वर्षे मोहीम सहज चालावी ![१८] सर्व तयारी पूर्ण झाली.

लोकांची अगदी खात्री झाली की, आता शिवाजी भोसला बरबाद होणार ! याच विजापूर शहरांत थोड्याच दिवसांत शिवाजी साखळदंडांत गिरफ्तार होऊन दाखल होणार ! जिवंत नाही आला तर त्याचें मुंडकें बादशाहाला नजर होणार !

अफजलखान निघाला. त्याने बादशाहाला व बड्या साहेबिणीला निघण्यापूर्वी बार बार कुर्निसात केले. शाहाने मेहेरनजर ठेवून त्याला

निरोप दिला. तो महाप्रचंड शरिराचा अफजलखान जेव्हा कुर्निसात करून चालूं लागला तेव्हा एखाद्या पर्वताचें शिखरच हालत चाललें आहे, असा भास होत होता ! [१९]

रणवाद्यांचा व फौजेच्या आरोळ्यांचा आवाज अस्मानाला पोहोचला. खानाचा आघाडीचा हत्ती निशाणासह चालूं लागला. बादशाह व बेगम साहेबीण आनंदाने उचंबळली. रंगीबेरंगी स्वप्नें रंगविण्यांत बादशाहा-पासून जनानखान्यांतल्या खोजापर्यंत सगळेच दंग झाले. महाराजांच्या ज्वलज्जहाल वैऱ्यांनाहि नक्की कल्पना येईना की, या शिवाजीचें आता होणार तरी काय ! खानाने तोफा, दारूगोळा, कापड, खजिना, धान्य, शस्त्रें वगैरे युद्धसाहित्य इतकें अफाट घेतलें होतें की....

....की तें महाराजांना खूप दिवस पुरावें !

खान विजापुरांतून बाहेर पडला. सामानाच्या गाड्या व उंट मागोमाग चालूं लागले. सैन्याची लांबच लांब रांग लागली. पालख्या, मेणे, मेहमील, अंबाऱ्या वगैरे थाटहि होता. खानाने आपल्याबरोबर जनानखानाहि घेतला होता! [२०] म्हणजे खान सहकुटुंब, सहपुत्र, सहपरिवार निघाला होता, मावळांत वाऱ्यासारख्या भरारणाऱ्या महाराजांना पकडायला !

खान विजापुरांतून बाहेर पडल्यावर पहिली मजल त्याने फक्त दोन कोसांची मारली.[२१] लष्कराचा मुक्काम पडला. रात्र झाली. डोक्यांत मोठमोठे मनोरे उंच चढत होते. एवढ्यांत तेथे एका गुलामाने प्रवेश केला. तेथे म्हणजे शामियान्यांत, मनोऱ्यांत नव्हे ! आणि त्या गुलामाने अगदी दुःखी मुद्रेने खानाला खबर दिली की, ' फत्तेलष्कर हाती मर गया '. [२२] खानाचा फत्तेलष्कर हत्ती मेला ! केवढा हा अपशकुन ! [२३] तरी पण खानाचा धीर खचला नाही. खानाचा युद्धोत्साह खरोखर अत्यंत दांडगा होता.[२४] तो बुझदिल नव्हता.

फत्तेलष्कर हत्ती मेल्याची बातमी शहरांत बादशाहाला नंतर समजली, तेव्हा त्याने आपला खास बिनीचा हत्ती खानाकडे रवाना केला.[२२] खानाचा उत्साह कायम राखण्यासाठी ही बादशाही जपणूक होती. पण स्वतः खानाचा उत्साह असल्या अपशकुनाने मावळणारा नव्हता. मेलेला हत्ती आता त्याला रोखूं शकणार नव्हता. हजारो जिवंत हत्तीहि त्याला रोखूं शकणार नव्हते. त्याची खात्री होती की, फत्तेलष्कर मेला तरीहि माझें लष्कर फत्तेच होणार!

भोसल्यांच्या द्वेषाची सणक खानाच्या डोक्यांत जास्तच चढली. तो मनांतल्या मनांत एक एक डाव ठरवूं लागला. शिवाजीवर जायचे तें असें मुकाट्याने नाही, तर वाटेने जातां जातां मराठ्यांचीं झाडून सारीं देवदैवतें उध्वस्त करीत करीत जायचें! बघूंच ती त्यांची भवानी आणि विठोबा माझ्या घणांच्या घावाखाली कसे टिकतात ते! बस्स. मी 'बुत्‌शिकन!' मी 'दीन दार कुफ्रशिकन्!'[२५] मी गाझी!

आणि खानाने आपल्या फौजेला हुकूम सोडला.

'तुळजापूर! तुळजापूर!'

* * *

---

**आधारः**—(१) शिचवृसं २ पृ. ३५. (२) आघइ पृ. १९६. (३) शिचवृसं २ पृ. ६. (४) शिचवृसं २ पृ. ३४. (५) शिचप्र पृ. ५७. (६) जेधेशका. (७) पोवाडा. (८) सभासद ब. पृ. १२. (९) पोवाडा; सभासद ब. पृ. १३. (१०) शिचनि पृ. १६८. (११) सभासद ब. पृ. २४, १३; पोवाडा. (१२) शिभा १७।१ ते ३८. (१३) शिभा १७।३९ ते ४५. (१४) शिभा १७।४६ व ४७. (१५) पसासंले. ७९१ (१६) शिभा १७।५१ ते ५८. (१७) शिभा २१।५७ ते ५९. (१८) पोवाडा पृ. १०. (१९) शिभा १७।४८ व ४९. (२०) शिभा २३।४६. (२१) शिभा १७।६६. (२२) पोवाडा पृ. ११. (२३) शिभा १७।६० ते ६४. २४) शिभा १७।६५ (२५) B. J. Inscrip. Page 82.



## ६ : अफजलखान

हा एक भयंकर माणूस होता ! त्याची ताकद महिषासुरासारखी होती. शरिराने आडवा, धिप्पाड अन् उंचहि भाल्यासारखा पुरा. उभा राहिला की चिरेबंदी बुरुजासारखा भासे. लोक त्याला फार भीत. विशेष म्हणजे सज्जनांनाहि त्याची भीति वाटे ! कारण त्याचा देह जसा राक्षसी, तसाच त्याचा स्वभावहि राक्षसी होता. तो अत्यंत शूर होता. तितकाच क्रूरहि होता. कपटीपणा आणि दगाबाजी ही त्याची नीति होती. तो स्वतःला 'बुत्‌शिकन्' आणि 'कुफ्रशिकन्' म्हणवून घेई.[1] 'मूर्ति आणि मूर्तिपूजकांचा विध्वंसक' हा याचा अर्थ. अर्थातच बादशाह आणि बडी साहेबा यांच्या गळ्यांतला तो ताईत होता.[15]

अफजलखान जरी असुरी वृत्तीचा होता, तरी कर्तबगारहि तसाच जबर होता. त्याने एखादी कामगिरी अंगावर घेतली की, ती तो फत्ते केल्याशिवाय राहात नसे. मग ती कितीहि अवघड असो. तो स्वतःच्या कर्तबगारीवरच एवढा मोठा सरदार झाला होता. त्याचा जन्म वास्तविक एका सामान्य गरीब घरांत झाला. त्याची आई भटारीण म्हणजे स्वयंपाकीण होती.[2] पण प्रखर पराक्रमाने तो मोठा झाला. कर्तबगारीने मोठा झाला.

खान शहाजीराजांचा मनापासून द्वेष करीत असे. त्यांना व त्यांच्या मुलाबाळांना तो अगदी पाण्यांत पाहात असे. म्हणूनच शिवाजी महाराजांना नेस्तनाबूद करण्यासाठी त्याने ही मोहीम मोठ्या उत्साहाने हातीं घेतली. मत्सर हीच त्याची प्रेरणा होती.

प्रथम खानाने आपल्या समशेरीची चमक दाखविली ती कर्नाटकांतील मोहिमांत. रणदुल्लाखानाच्या हाताखाली तो सरदार होता. त्याच वेळीं शहाजीराजेहि रणदुल्लाखानाच्या हाताखाली स्वाऱ्या–शिकाऱ्या करीत होते. म्हणजे अफजलखान व राजे कमींतकमी सहा वर्षें ( इ. १६३८ ते १६४३ ) रणदुल्लाखानाच्याच सेनापतित्वाखाली एकत्र काम करीत होते. रणदुल्लाखानाचें शहाजीराजांवर अतिशय प्रेम होतें. तो राजांना फार मान देई. बंगळूर शहर राजांना दिलें रणदुल्लाखानानेच. आपला शाही सेनापति शहाजीसारख्या एका काफरावर इतकें प्रेम करतो, हेंच बहुधा अफजलखानाला सहन होत नसावें. पुढे रणदुल्लाखान मरण पावल्यावर मुस्तफाखान, अफजलखान आणि बाजी घोरपडे हे भोसल्यांचे तिखट वैरी मेतकुटासारखे एक झाले. त्यामुळे राजांच्या नशिबीं सतत अपमान, त्रास, घात येऊन वसले. शहाजीराजांना कैद केलें मुस्तफाने व बाजी घोरपड्याने. त्यांच्या हातापायांत बेड्या घालून अत्यंत अपमानास्पद रीतीने मिरवीत विजापुरांत आणलें होतें अफजलखानानेच. हा अपमान राजांच्या इतका कांही जिव्हारीं लागला होता की, सूडा-शिवाय त्यांचें मन निवणें कठीणच होतें. आईसाहेबांनाहि हें असह्य झालेलें होतें.

आणखी एक प्रकार खानाच्या हातून घडला होता. शिवाजी-महाराजांचे सख्खे थोरले भाऊ राजे संभाजी भोसले हे बाळपणापासून शहाजीराजांपाशीच असत. ते वडिलांप्रमाणेच शूर होते. कर्नाटकांत राजांच्या बरोबरीने मोहिमांत भाग घेत. कनकगिरीचा किल्ला काबीज करण्याची कामगिरी बादशहाने अफजलखानावर सोपविली होती. खानाने कनकगिरीला वेढा घातला. शाही हुकमावरून संभाजीराजे भोसले हेहि अफजलखानाच्या बरोबर या वेढ्यांत सामील झाले (इ. १६४५). लढाई सुरू झाली. किल्ल्यावरून तोफा बंदुकांच्या फैरी

झडत होत्या. आणि एक दिवशीं संभाजीराजांनी हल्ला चढविला असतां खानाने राजांना जरूर ती मदत केली नाही. त्यामुळे संभाजीराजे पेचांत सापडून ठार झाले ! शहाजीराजांचा केवढा मोठा ठेवा हरपला. त्यांचा कर्तबगार पुत्र खानामुळे ठार झाला. आईसाहेबांचा तर पोटचा गोळा गेला. खानानेच जाणूनबुजून आपल्या संभाजीराजांना ठार मारलें अशी पक्की खात्री आईसाहेबांची व महाराजांची झाली.[३] आपली सून खानामुळे विधवा झाली ही गोष्ट आईसाहेबांच्या मनाला सतत झोंबत होती.

अफजलखानाने कर्नाटकांत पराक्रम मात्र खूप गाजविला होता. श्रीरंगपट्टणच्या राजाचा पराभव खानानेच केला.[४] कर्णपूरमच्या राजाला त्यानेच शरण आणलें.[५] मदुरा शहर त्यानेच उध्वस्त केलें आणि कांची शहर काबीज करून तेथील अगणित सोनें खानानेच लुटलें.[६] बेदनूरच्या वीरभद्रराजाला त्यानेच विजापूरचा मांडलिक बनविलें.[७] केंगनायकाच्या बसवापट्टण किल्ल्यावर हल्ला करून त्याने अद्वितीय पराक्रम केला व केंगनायकाचा पराभव केला.[८] चिकनायकनहळ्ळीचा राजा तर खानाच्या केवळ दराऱ्यानेच शरण आला ![८] त्याने बेलूर व टुमकूर येथील युद्धांतहि खूप पराक्रम गाजविला होता.

अफजलखानाचा दरारा दरबारांतील सरदारांतहि फार होता. त्याच्या दराऱ्याची एक विलक्षण गोष्ट आठवते. पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट. अफजलखान तेव्हा रणदुल्लाखानाच्या हाताखाली फौजेंत सरदारी करीत होता ( इ. १६४३ पूर्वी ). विजापूर दरबारने रणदुल्लाखानाला सरसेनापति नेमलें होतें. सर्व लहानमोठ्या सरदारांना हुकूम सोडले होते की, रणदुल्लाखानाच्या छावणींत दाखल होऊन त्याचे हुकूम पाळा. असाच एक हुकूम सिद्दी अंबर नांवाच्या सरदारासहि गेला होता. परंतु सिद्दी अंबरचें व रणदुल्लाचें थोडें वाकडें होतें. सिद्दी अंबर रणदुल्लाच्या

हुकमाखालीं वागावयास तयार होईना. तो रणदुल्लाकडे आलाच नाही. अंबर येत नाही हें पाहिल्यावर त्याला कैद करून आणण्यासाठी रणदुल्लाने अफजलखानास रवाना केलें. सिद्दी अंबर अत्यंत शूर होता. त्याच्यापाशी दोन हजार फौजहि होती. अफजलखान फौज घेऊन सिद्दी अंबरवर निघाला. अफजलखान आपल्यावर चालून येतोय हें सिद्दीला समजतांच तो इतका कांही घाबरून गेला की, त्याने स्वतः होऊनच स्वतःच्या हातापायांत बेड्या घालून घेतल्या व तो अफजलच्या स्वाधीन झाला.[१७]

अफजलखानाच्या पराक्रमाची दहशत एवढी मोठी बसली होती की, सीलोनचा अधिपतीहि खानाला व त्यामुळे विजापूर दरबारला भीत असे.[९] अफजलखानाने एकदा औरंगझेबालाहि आपलें पाणी दाखविलें होतें. औरंगझेब जेव्हा बीदर व कल्याणी भागांत विजापूर-करांशीं लढत होता ( इ. १६५७ ), तेव्हा खान महंमद सरनौबतच्या बरोबर अफजलखानाने विलक्षण पराक्रम गाजविला होता[१०]. तेव्हा-पासून औरंगझेब अफजलखानाला फार वचकून होता.[११] आणि याच लढाईंत कदाचित् अफजलखानाच्या हातून औरंगझेब कैदच होण्याची व कदाचित् ठार होण्याचीहि वेळ आली होती! केवळ औरंगझेबाचें तकदीर सिकंदर म्हणून त्यावेळीं तो अफजलच्या तडाख्यांतून सुटला! या लढाईंत एक विलक्षणच प्रकार घडला, तो असा—

औरंगझेबाने विजापुरकरांचा बीदरचा किल्ला जिंकला ( दि. २९ मार्च १६५७ ) व नंतर तो कल्याणीचा किल्ला घेण्यास गेला. तोहि त्याने त्यावेळीं जिंकला ( दि. २ ऑगष्ट १६५७ ). नंतर औरंगझेब आसपासच्या भागांत धुमाकूळ घालूं लागला. या मोहिमेंत त्याचा असा हेतु होता की, जास्तींत जास्त विजापूरकरांचा मुलुख जिंकून मोंगल साम्राज्य वाढवावें.

औरंगझेबाला रोखण्यासाठी विजापुराहून फौज निघाली. खान महंमद या नामवंत सरसेनापतीच्या हाताखाली मोठी फौज रवाना झाली. त्यांतच अफजलखान होता. औरंगझेबाच्या फौजेला या फौजेने घेरलें व अडचणीच्या प्रदेशांत कोंडलें. अफजलने शौर्याची कमाल केली. असें आता अगदी स्पष्ट दिसूं लागलें की, औरंगझेबाची सर्व मोंगली फौजेसह कत्तल होणार. निदान औरंगझेब कैद तरी खासच होणार. औरंगझेबाची अगदी पांचावर धारण बसली. अब्रू व जीव जायची वेळ आली. आता ?

विजापूरचा सेनापति खान महंमद हा होता. या वेळीं खान महंमदाच्या हातीं आपलें जगणें वांचणें आहे, हें ओळखुन औरंगझेबाने मुठींत नाक धरून खान महंमदाकडे अगदी दीनवाण्या शब्दांत पत्र पाठवून जीवदान मागितलें ! हें पत्र गुप्तपणें खान महंमदाकडे आलें. पत्र आलें तेव्हा तो निमाज पढत होता. औरंगझेबाने आपली दीनवाणी स्थिति लिहून अप्रत्यक्षपणें धाकहि घालून ठेवला होता. "मोंगलांचा हा राजपुत्र औरंगझेब तुमच्यापाशी अभय मागतो आहे. आपण कृपा करून माझा बचाव करा. पण जर माझ्या जीविताला किंवा इज्जतीला धक्का लागला तर दिल्लींत माझ्या वडिलांना फारच क्रोध येईल !"

खान महंमदाने हें पत्र वाचलें. खूप विचार केला. जर औरंगझेबाने लिहिलें आहे, त्याप्रमाणे प्रकार घडून दिल्लीहून फौजांचा दर्या सुटला तर विजापुरावर केवढें भयंकर संकट येईल आणि मग त्यापल्या अली आदिलशाह बादशाहास, बड्या साहेबिणीस व शाही तख्तास कोण वांचवूं शकेल, असा गंभीरपणें विचार करून त्या म्हाताऱ्या सरसेनापतीने औरंगझेबाला कोंडींतून जिवंत जाऊं देण्याचें ठरविलें ! खान महंमद पुढच्या संकटाला घाबरला. पण त्यांत त्याचा कांहीहि स्वार्थ नव्हता. बादशाह व बडी साहेबीण यांचेंच हित तो पाहात होता.

खान महंमदाने औरंगझेबाला चिठ्ठी लिहिली की, "उद्या तुम्हीं आमच्या फौजेंतून सुरक्षितपणें निघून जावें! एल्गार करावा."

ही गोष्ट अफजलखानाला अजिबात माहीत नव्हती. तो एकाच आनंदांत होता, औरंगझेब सापडणार! पण दुसऱ्या दिवशीं खान महंमदाने गुप्तपणें केलेली व्यवस्था फळास आली. औरंगझेब सुखरूपपणें फौजेसह दौडत उधळत निघून गेला! त्याला वाट मोकळी मिळाली!

हें पाहून अफजलखान आगीसारखा संतापला. हें झालें कसें? कोणीं केलें? कोणीं सोडलें औरंगझेबाला? जर मोंगल राजपुत्र हातीं लागला असता तर विजापूरबादशाह, आपला प्यारा धनी अली आदिलशाह याचा अवघ्या दुनियेंत कीर्तीचा डंका वाजला असता! सुटला! कसा सुटला? अफजलचा तीळपापड उडाला. अन् अफजलला सुगावा लागला की, आपल्या प्रत्यक्ष सरसेनापतीने—खान महंमदानेच हें असें केलें! मग तर खानाचा भयंकर भडका उडाला. पर्वतासारखा तो धिप्पाड अफजलखान ज्वालामुखीसारखा पेटला. त्याला आवरणें आता अशक्य झालें होतें. त्याने आपल्या दोन्ही हातांत दोन दुधारी पट्टे चढविले आणि तस्साच तो थेट विजापुरास गेला. त्याचा अवतार आणि आवेश भयप्रद होता. लोक टकमका पाहूं लागले. ते पट्टे लवलववीत आणि दणदण पावलें टाकीत तो थेट बादशाहाच्या दरबारांत गेला. त्याच्या पावलांनी भुई हादरत होती. बादशाह व बडी बेगम आश्चर्याने डोळे विस्फारून पाहूं लागली. काय झालें? काय झालें?

आपल्या हातांतील पट्टे दणादण जमिनीवर आदळीत दातओठ खात खान उभा राहिला. शाहाने विचारलें त्याला, काय झालें म्हणून! तेंव्हा औरंगझेब हातचा निसटल्याची ती हकीकत त्याने सांगितली. तो अत्यंत आवेशाने बोलत होता. ती हकीकत ऐकल्याबरोबर बादशाहाने

व बड्या साहेबिणीने खान महंमदाकडे तातडीने हुकूम पाठविला की, ताबडतोब विजापुरांत हाजीर व्हा !

खान महंमद विजापुरास निघाला. पालखींत बसून तो येत होता. बड्या बेगमेने व शाहाने आपलें म्हणणें ऐकावें म्हणून तो खुदाची प्रार्थना करीत होता. खान महंमदाने सारी हयात तख्ताच्या सेवेंत घालविली होती.

बड्या बेगमेने सर्व तयारी जय्यत करून ठेवली होती. खान महंमदाची पालखी विजापुरांत मक्का दरवाजांतून आंत शिरली अन् तेवढ्यांत...........मारेकऱ्यांच्या तलवारींचे सपासप सपासप घाव पालखीवर आदळले ! खान महंमदाचे तुकडे तुकडे झाले ! तो क्षणांत मेला ( दि. १० नोव्हेंबर १६५७ ).

अफजलखान असा होता ! विजापुराहून शिवाजीमहाराजांवर स्वारी निघण्यापूर्वी, वरील प्रकार फक्त एक वर्ष सात महिने आधी घडला[१२]

अफजलखानाने एकदा जरबेचा एक हुकूम त्याच्या जहागिरींतील लिंगशेटी नांवाच्या माणसास पाठविला होता. तो पाहिला की, अफजलखान ही काय व्यक्ति आहे हें स्पष्ट उमगतें. खान लिंगशेटीला लिहितो[१३] :

" जेथे अससील व जेथे जासील तेथुनू खोदुनू काढुनू जो (कोणी तुला) आसिरा देउनू ठेउनू घेईल त्यास (सुद्धा) जनोवासमेत (म्हणजे वायकामुलांसह) काटुनू (म्हणजे ठार करून) घाणियांत घालुनू पिलोनू !! हे तुम्ही येकीन व तहकीक जाणणें !"

हुकमाच्या विरुद्ध जर वर्तणूक घडली तर, खान म्हणतो, 'तुला सर्वांसह ठार मारीन ! व मारल्यानंतर तेल्याचे घाण्यांत घालून पिळून काढीन !'

अफजलखानाचे आणखी गुण काय काय गावेत ? खानाने विजापुरां-

तील 'अफजलपुरांत' एक शिलालेख कोरला. त्यांत त्याने स्वतःचे गुण कोरून ठेवले. तो स्वतःबद्दल म्हणतो,

'कातिले मुतमर्रिदान व काफिरान
शिकंदए बुनियादे बुतान!'

'काफीर व बंडखोर यांची कत्तल करणारा व मूर्तींचे पाये उखडून काढणारा!'

कोण? अफजलखान!

दुसऱ्या एका शिलालेखांत अफजलखान म्हणतो, मी कोण आहे? तर मी, 'दीन दार कुफ्रशिकन्' म्हणजे, 'इस्लामचा सेवक व काफिरांना तोडणारा' आहे![१]

अफजलखानाने हें भयंकर क्रूर व्रत निःसंशय प्रामाणिकपणाने चालविलें होतें. त्याला तें जन्मजात अंगवळणींच पडलेलें होतें. हेंच कार्य उत्तम आहे, असें तो समजत असे. स्वतःलाहि तो उत्तम पुरुष समजत असे. स्वतःच्या उत्तमपणाची त्याने स्वतःच्याच शिक्क्यांत खात्री देऊन ठेवली होती. त्याच्या शिक्क्यांत पुढीलप्रमाणे मजकूर होता,[१२]

'गर्र अर्ज कुनद सिपहर अअला
फजल फुजला व फजल अफजल
अझ हर मुल्की बजाए तसबीह
आवाझ आयद अफजल अफजल.'


याचा अर्थ असा : जर उच्च स्वर्गाला इच्छा झाली की,उत्तम माणसांची उत्तमता आणि अफजलखानाची उत्तमता यांची तुलना करून दाखवावी, तर प्रत्येक ठिकाणाहून जपमाळेंतील (अल्ला अल्ला या) आवाजाऐवजी अफजल हा (च सर्वांत उत्तम माणूस आहे असा) आवाज येईल.

अर्थात् हा त्याचा गैरसमज होता!

पण असा 'उत्तम पुरुष' वाटेल त्या उपायांनी शिवाजी महाराजांना पकडून आणण्यास व जिवंत न सापडल्यास वाटेल त्या उपायांनी त्यांचा निर्मूळ फडशा पाडण्यास निघाला होता. आणि आता तो त्वरेने दौडत होता तुळजापूरकडे! महाराष्ट्राच्या आणि महाराज शिवाजीराजे भोसल्यांच्या कुलदेवता तुळजाभवानीचे घणाच्या घावांखाली तुकडे उडविण्याकरिता महिषासुर चौखूर उधळत निघाला होता.

* * *

**आधारः**—(१) B. J. Inscrip. Page 82. (२) पोवाडा. (३) सभासद. पृ. १४; पोवाडा पृ. १८. (४) शिभा १७।४. (५) शिभा १७।५. (६) शिभा १७।६. (७) शिभा १७।७. (८) शिचत्रसं २ पृ. १४ व १५. (९) शिभा १७।८. (१०) आघइ पृ. १९९. (११) शिभा १७।१०. (१२) बसातीनुस्सलातीन. (१३) शिचसा खं. ११।१००. (१४) सभासद पृ. १४. (१५) आघइ पृ. १३० व १९१. (१६) शिचसंत्र. २ पृ. ३५. (१७) आघइ पृ. १७८.



# ७ : तुळजाभवानी

अफजलखान तुळजापुरावर दौडत निघाला. तुळजापूरच्या भवानीचं मंदिर फार प्राचीन. उभ्या महाराष्ट्राची आईच ती. भवानीदेवीला आवातन केल्याबिगर कुणा मराठ्याच्या घरीं पुरणवरण शिजायचें नाही. कुणाच्या दाराला तोरण चढायचें नाही. कुणाच्याहि भाळीं बाशिंग लागायचें नाही. खुद्द आईसाहेबांचें आणि महाराजांचें मन सदैव आई-भवानीच्या मांडीवर निर्चिंत विसावलेलें असायचें. त्या तुळजाभवानीच्या राउळावर खानाचें दळबादळ आलें.

खान आला. सारा गाव भयाने सैरावैरा धावत सुटला. तुळजापुरांत तोडाफोडीला उधाण आलें. मूर्ति खडाखड फुटूं लागल्या. सबंध क्षेत्र खानाने पार उध्वस्त केलें. देवीचे पुजारी भोपे होते. त्यांना खानाने पिटाळून लावलें.[1] खान भवानीच्या देवळांत शिरला. या देवीवर शिवाजीची व साऱ्या मराठ्यांची मोठी भक्ति आहे, हें त्याला माहीत होतें. खान आपल्या ताकदीच्या गर्वाने व मराठ्यांच्या धर्मद्वेषाने बेहोष झाला होता. ती अष्टभुजा तुळजाभवानी समोर दिसतांच तिला उद्देशून खान आवेशाने म्हणाला,[2]

"बताव मुझे तेरी करामत ! बताव तेरी अजमत !"

दाखव, दाखव तुझ्या सामर्थ्याचा चमत्कार ! भवानीला आव्हान देत खानाने देवीवर हल्ला चढवला आणि खाडकन् मूर्तीवर घाव घातला ! तुळजाभवानी फुटली ! भवानीचा चुराडा उडाला ![3] खानाने

लगेच देवीपुढे एक गाय मारली ![२] मराठ्यांच्या तुळजापुराचा आणि तुळजाभवानीचा काय हा भयंकर अपमान ![३] आणि तोहि मराठ्यांच्या देखत ! पिलाजी मोहिते, शंकराजी मोहिते, कल्याणराव यादव, नाईकजी खराटे, नाईकजी पांढरे, प्रतापराव मोरे, झुंझारराव घाटगे, काटे, घोरपडे आणि महाराजांचे प्रत्यक्ष चुलते मंबाजीराजे भोसले अफजलखानाच्या सैन्यांत होते ! महाराष्ट्राचें केवढें दुर्दैव ! खान तर बोलूनचालून मराठ्यांच्या महाराष्ट्रधर्माचा, स्वराज्याचा आणि राजाचा उघड उघड दुष्मन होता. कारण त्याचें महाराष्ट्राशीं नातें शत्रूचेंच होतें. पण या मराठ्यांचें काय ? भोसले, घोरपडे, मोहिते, मोरे, घाटगे, पांढरे, काटे, खराटे म्हणजे कोण ? जातीचे अस्सल मराठे हे. अफजलखानाबरोबर शिवाजीराजांचा अन् स्वराज्याचा हे सारेजण गळा कापायला निघाले होते. तुळजापूरची भवानी खानाने फोडली तरीहि त्यांना खंत नव्हती. गाय मारली,....खान तर रोजच गाई मारीत होता–[४] या मंडळींना त्याबद्दल कांहीहि वाटत नव्हतें. आत्मघातकी अधःपात ! आपलें आणि आपल्या संसारांतील जीवजीवाणूंचें क्षणभंगुर जिणें सुखाचें बनविण्यासाठी हें पाप ! किंमतच कळत नव्हती त्यांना स्वराज्याची, महाराष्ट्रधर्माची आणि महाराजांची.

खानाने तुळजापुरांत कांही काळ मुक्काम केला. खानाचा घण आता पडणार होता पंढरपुरावर ! खान पंढरपुरावर निघाला. आला ! भीमा-चंद्रभागा भयभीत झाली. खानानें पंढरपुरांतहि थैमान घातलें. पुंडलीक पाण्यांत फेकला. विठ्ठलाच्या देवळालाहि तोशीस लागली.[३] विठ्ठलाची मूर्ति मात्र वांचली.

महाराजांनाहि गुप्त खबरदारांनी खबर टाकोटाक पोहोचविली की,[१४]

“ विजापुराहून अफजलखान सरदार बारा हजार स्वारांनिशी नामजाद जहाला आहे ! ”

खान पुढे निघाला. वाटेंतली देवळें टिकत नव्हतीं.[१०]

खानाच्या स्वारीची आणि अत्याचारांची एकेक भयंकर खबर महाराजांच्या व आईसाहेबांच्या कानांत उकळलेल्या तेलाप्रमाणे शिरत होती. तुळजाभवानीचें देऊळ खानाने फोडलें ही बातमी महाराजांस समजली.[३] त्यांना भयंकर संताप आला. मन उठलें. पण विवेकाने खूण केली, ‘ जरा थांब ’ म्हणून.

खानाच्या बातम्यांनी आईसाहेब तर बेचैन झाल्या. आता हा वैरी स्वराज्यांत घुसणार. माझ्या पोराबाळांनी रक्त शिंपडून उभें केलेलें हें पीक हा महिषासुर आता तुडवून काढणार. याच विश्वासघातक्यामुळे माझा शंभूराजा कनकगिरीच्या लढाईंत बळी पडला. माझी सून याने विधवा केली. महाराजस्वारींना कर्नाटकांतून हातींपायीं बेड्या घालून यानेच मिरवीत नेलें. हाच तो भोसल्यांच्या मुळावर उठलेला वैरी, आता शिवबाच्याहि जिवावर उठला आहे. आईसाहेबांचा जीव तगमगूं लागला.

महाराजांचा मुक्काम यावेळीं राजगडाजवळ शिवापट्टण येथे होता.[५] खान देवळें फोडीत येत होता. त्यांत त्याचा एक मोठा धूर्त डाव होता. भवानी अन् पांडुरंगासारखीं महान् दैवतें फोडलीं की, शिवाजी चिडेल व चिडून डोंगरी किल्ल्यांतून बाहेर पडेल. आपल्यावर चालून येईल. अन् असा तो मोकळ्यां मैदानीं यावा ही खानाची मनापासून इच्छा होती. कारण मोकळ्या मैदानांत शिवाजीच्या चिमूटभर सैन्याचा साफ चुराडा उडविणें अगदी सोपें होतें, म्हणून खान आपली ही राक्षसी अक्कल चालवीत होता. खान हेच उद्योग करीत वाईकडे येत होता.

पण त्याच्या दुर्दैवाने महाराज फारच शहाणे होते ! ते ओळखून होते की, आता चिडून आपण तुळजापूरचा सूड घेण्यास गेलों तर सर्वच नाश होईल. भवानी तर फुटलीच आहे पण स्वराज्याचें नशीबहि फुटेल !

महाराजांपाशी यावेळीं आईसाहेब, गोमाजी नाईक पाणसंबळ कृष्णाजी नाईक, मोरोपंत, निळोपंत, आण्णाजीपंत, सोनोपंत, गंगाजी मंगाजी, नेताजी पालकर, रघुनाथपंत्र अत्रे, प्रभाकरभट राजोपाध्ये, वगैरे जिवाभावाचीं माणसें होतीं.[६] खानाचें आजपर्यंतचें भयंकर चरित्र आणि तो सध्या घालीत असलेलें थैमान डोळ्यापुढे उभें राहून सर्वांचींच धाबीं दणाणलीं होतीं. खानाचें केवढें बळ तें! दैत्यच! बारा हजार घोडा, दहा हजार पायहशम, शिवाय भला जंगी तोफखाना आणि अगणित युद्धसाहित्य त्याच्या हातांत आहे. आपल्याजवळ काय आहे? सारें पोरदळ! कसा टिकाव लागावा? या विचारांनी जो तो चिंतावला होता? आता काय होणार! आता कसें होणार?

महाराज शांत होते. त्यांच्या डोक्यांत मात्र विचाराचें चक्री वादळ उठलें होतें. ते सतत विचार करीत होते. हृदयांत ती एकच शक्ति वास करीत होती. तिचेंच स्मरण ते सतत करीत होते. जगज्जननी तुळजा-भवानी!

महाराजांनी आपल्या मंडळींच्या मसलतींत असा एक विचार मांडला की, तो ऐकून सर्व मंडळी जास्तच धास्तावली. महाराज म्हणाले,[६]

"आपण आपली कुल फौजलष्कर मुस्तेद करावें आणि खानासी जावळीस गाठून युद्ध करावें! आपण प्रतापगडास जावें."

युद्ध? खानाशीं? अवघड! अशक्य! महाराजांचा लढाईचा विचार कोणालाहि अजिबात पटला नाही. सर्वांनी अगदी स्पष्ट सांगून टाकलें,[६]

"झुंज देऊं नये! सल्ला करावा!"

खानाशीं वाटाघाटी कराव्या, म्हणजे तह करावा, हा विचार निक्षून प्रत्येकाने मांडला. अर्थात् तह करायचा म्हणजे स्वराज्यांत घेतलेले किल्ले व मुलुख आचवावे लागणार, खान त्याशिवाय ऐकणार नाही.

खानाला ते पूर्णपणें ओळखून होते. महाराजांनी नेमक्या, मोजक्या व अचूक शब्दांत खान कसा आहे, तें सांगून टाकलें. ते म्हणाले,[६]

" खानाने संभाजीराजियांस जसें मारिलें तसें तो आम्हास मारील! म्हणोन सल्ला करणें नाही. युद्ध करोन मारितां मारितां जें होईल तें करूं!"

परंतु युद्धाचा विचार कांही केल्या कोणाच्या मनास झेपेना. सर्वजण खानाच्या संकटाने हादरले होते. महाराजांचें मन आणि महिषासुर-मर्दिनी भवानीचें मन सारखेंच होतें. देवद्रोही, धर्मद्रोही उन्मत्त महिष हा! वाटाघाटी कशाच्या करताय् त्याच्याशीं? त्याला फाडा! उडवा मुंडकें! पृथ्वी त्रस्त झाली!

महाराज क्रांतविचारी होते. त्यांच्या मनांत विचारमंथन चालू होतें आपल्या स्वतःच्या जीवनहेतूचाच आविष्कार त्यांच्या विचारांत होत होता. महाराज आपल्या मनाशींच म्हणाले,[७]

' बादशाहाने माझ्यावर चिडून या खानाला पाठविलें आहे. निशुंभ दैत्याप्रमाणे याने तुळजाभवानीचा अपमान केला. खान सद्धर्माचा नाश करावयास जन्मला आहे. तो पापांची रास रचतोय्. तो दररोज गाईंची हत्या करीत सुटला आहे. हे सर्वच यवन पृथ्वी बुडवावयास उठले! विष्णूने दहा वेळां अवतार घेऊन पृथ्वी तारली. रामाने रावणाला आणि कृष्णाने कंसाला ठार केलें. त्यांनी धर्मसंस्थापना केली. नरसिंहाने खांबांतून प्रगट होऊन आपल्या नखांनी हिरण्यकशिपूला फाडलें. मींहि खानाला ठारच मारलें पाहिजे! या असुरी दुष्टांचा नाश मीच करीन! त्याचकरिता माझा जन्म!'

पण सर्व मंडळींचें मत खानाशीं तंटा घालूंच नये असें होतें. त्यांचें म्हणणें पडलें की,[८]

" हें कठीण कर्म! सिद्धीस गेलें म्हणजे बरें. नाही तर कसें होईल?"

त्यावर महाराज म्हणाले,[८]

"खानाशीं सल्ला केलियाने प्राणनाश होईल. युद्ध केलियाने जय जाहलियास उत्तम. प्राण गेलियाने कीर्ति आहे! त्याकरिता खानाशीं युद्धच करावें!"

एवढ्यांत आणखी एक खबर महाराजांपुढे दाखल झाली. अफजलखान पंढरपुरावरून मलवडीस गेला. मलवडीच्या जवळ नाईक निंबाळकरांचें फलटण होतें. खानाला माहीत होतें की, फलटणचे बजाजी नाईक निंबाळकर हे शिवाजी भोसल्याच्या बायकोचे भाऊ आहेत. येथे खानाने महाराजांस डिवचण्याकरिता आणखी एक प्रकार केला.[१] त्याच भयंकर प्रकाराची बातमी येऊन थडकली.

खानाने बजाजी नाईक निंबाळकरांना कैद करून आणलें. त्यांच्या गळ्यांत साखळदंड बांधला. जणू शिकार करून आणलेलें रानटी जनावरच. खानाने विचार केला की, आता शिवाजीचा मेव्हणाच हातीं सापडला आहे. याची सुंता करून याला हत्तीच्या पायीं देऊन ठार मारावें![१] वास्तविक बजाजी नाईक निंबाळकर हे विजापूरच्या बादशाहाचेच निष्ठावंत सरदार होते. त्यांची बहीण सईबाइ ही शिवाजीमहाराजांना दिलेली होती. तरीहि नाईक निंबाळकर, महाराजांस कधीहि सामील झालेले नव्हते. उलट महाराजांविरुद्ध ते पूर्वी फत्तेखानाबरोबर विजापुराहून आलेले होते. महाराजांशीं लढले देखील होते. मग अशा बादशाहनिष्ठ निंबाळकरांना ही शिक्षा कां म्हणून?

बजाजी नाईक शिवाजीमहाराजांचे नातलग होते, एवढेंच कारण बस्स्! खानाने नाईक निंबाळकरांच्या गळ्यांत तोप म्हणजे साखळदंड बांधून हत्तीच्या पायीं देण्याचा मनसुबा केला आहे, ही बातमी महाराजांकडे आली. आता काय करायचें?

आता शिवाजी काय करतो हेंच खानाला बघायचें होतें. शिवाजीने आता तरी चिडून डोंगराळ भागांतून माणदेशाच्या मैदानांत यावें

एवढ्याच हेतूने हा भयंकर डाव खानाने टाकला होता. भवानी फोडली तरी शिवाजी बाहेर आला नाही. आता तरी येईल की नाही?

महाराज चिंतेंत पडले. यावेळीं सईबाईराणीसाहेबांची प्रकृति बरी नव्हती. त्या बऱ्याच आजारी होत्या. आपल्या भावावर खानाने प्राणांतिक संकट आणलेलें पाहून त्या बहिणीला काय वाटलें असेल?

महाराज फिकिरींत पडले. विचार करायलाहि सवड नव्हती. अखेर महाराजांनी एक उपाय योजला. खानाच्याच सैन्यांत नाईकजीराजे पांढरे म्हणून अस्सल मराठा सरदार होते. तेवढेच एक सरदार वजनदार, कदीम व निंबाळकरांना जवळचे होते. पांढरेराजांच्या मनाला कांही कौल लावून पाहावा, झाला तर उपयोग होईल, अशा आशेने महाराजांनी नाईकजीराजे पांढऱ्यांकडे एक विनंतीचें पत्र अत्यंत गुप्तपणें तावडतोब पाठवून दिलें.[१] महाराजांनी लिहिलेला मजकूर पुढील आशयाचा असावा.[१]

'कांही रदबदल करून खान अजम अफजलखान मजकुरांचे हातून बजाजीनाईक निंबाळकरांची सुटका करावी. एवढें पुण्य पदरीं घ्यावें. निंबाळकर आपल्याच दरबारचे निष्ठेचे खिदमतगार असूनहि त्यांच्यावर झालेली इतराजी आपण हरप्रयत्नाने दूर करावी. कांही रक्कम दंड म्हणून भरावी लागली तरी प्रयत्नपूर्वक भरून नाईक निंबाळकरांची सुटका होय तें करावें.'

अशा आशयाचें पत्र नाईकजी पांढऱ्यांचे हातीं पडलें. महाराजांनी बहुता प्रकारें कागद लिहिला होता, तो वाचून पांढऱ्यांच्याहि हृदयांत बजाजीबद्दल आपुलकी पालवली. ते अफजलखानाच्या डेऱ्यांत गेले. त्यांनी खानाची आर्जवणी केली की, बजाजीनाईक निंबाळकरांस बेडींतून मोकळें करावें. पण खानाची मर्जी वळेना. नाईकजी पांढऱ्यांनी तरीहि नेटाने बोलणें लावलें की, बजाजींना सोडा. खानालाहि थोडा विचार

पडलाच. कारण बजाजीकरिता आपण हट्टाला पेटून राहिलों, तर नाईकजीसारखा आपल्या छावणींतला मातबर सरदार मनांतून रुष्ट होईल. हे मराठे स्वजनांचा व स्वधर्माचा अभिमान फारसा धरीत नाहीत; पण स्वतःचा अहंकार दुखावला तर एखादवेळीं नाराज होतात. म्हणून खान विचारांत पडला. अखेर, 'नाईकजीराजे यांनी बहुत कांही आडमूड होऊन ( निकराने ) आबदलाखानास अर्ज केल्यावरी, साठी हजारावरी करार करून होन साठ हजार (दोन लाख दहा हजार रुपये ) बजाजीनाईक निंबाळकर जर दंड भरावयास तयार असेल तरच जिवंत सुटेल,"[१] असें खानाने पांढऱ्यांना सांगितलें! केवढा हा दंड! पण अखेर नाईकजी पांढरे जामीन राहिले व बजाजींची साखळदंडांतून सुटका झाली. बजाजी, महादाजी व सावित्रीबाई निंबाळकर यांनी मलवडी येथील सावकार जयचंदीभाई व वावानभाई यांच्याकडून पंचोत्रा व्याजाच्या दराने ही रक्कम कर्जाऊ काढली व खानापुढे ठेवली. या सावकारांकडे बजाजींनी आपली फलटणची देशमुखी गहाण टाकली.[१]

महाराजांना उघड्या मैदानांत खेचण्याचा खानाचा हाहि डाव वाया गेला. मग मात्र खान वाईच्या रोखाने निघाला.

मावळचे देशमुख महाराजांच्या बरोबरीने स्वराज्याच्या कामगिरींत सामील झालेले होते. कान्होजीनाईक जेधे, झुंजारराव मरळ, हैबतराव शिळमकर, बांदल, धुमाळ, पासलकर, डोहार, मारणे, कोंडे, शितोळे, खोपडे, निगडे, गायकवाड, पायगुडे, ढमाले वगैरे सर्व देशमुख मंडळी आपआपल्या मावळांतल्या मावळ्यांनिशी स्वराज्याच्या झेंड्याखाली जमा झाली होती. देशमुख आले की, त्यांच्या मागोमाग देशपांडेहि आलेच. पाटील पटवारीहि आलेच. चौधरी, चौगुले, येसकर, रामोशी हेहि आलेच. सारीं बारा मावळें, घाटमाथा, तळ कोकणच्या चौदा ताली, बारा बंदरें अन् सागरवारा महाराजांच्या शेल्याखाली आला होता.

मावळांतले हे देशमुख पूर्वी बादशाहाचे नोकर होते. या आपल्याच एकेकाळच्या नोकरांना पुन्हा आपल्या दावणींत आणण्यासाठी व शिवाजीराजांपासून फोडून काढण्यासाठी विजापूरच्या बादशाहाने व अफजलखानाने सर्वांना अत्यंत जरबेचीं व आमिषांचींहि फर्मानें सोडलीं. विजापुरी स्वारांबरोबर हीं दमदाटीचीं फर्मानें निघालीं.

असें सर्वच बाजूंनी स्वराज्यावर वादळ आलें होतें. आता खान वाईच्या जवळ येऊन पोहोचला होता. पूर्वी खान वाईसुभ्याचा सुभेदार होता. महाराजांचें मुत्सद्दीमंडळ बावचळून गेलें होतें. मोठे मोठे मुत्सद्दी वृक्ष या वादळाने करकरा लवत होते. परंतु महाराज मात्र शांत आणि गंभीर होते. ते सह्याद्रीच्या शिखरासारखे, राजगडच्या बुरुजासारखे अन् दर्यांतल्या जंजिऱ्यासारखे अचल होते. त्यांचा आपल्या भवानीवर पूर्ण विश्वास होता. त्यांचा डावा हात डाव्या कमरेवर होता. उजवा हात हृदयावर होता. दोन्हीहि ठिकाणीं भवानी नांदत होती. भवानी देवी आणि भवानी तलवार !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे [illegible]
क्रमांक 24480 वि: [illegible]
क्रमांक 866 नों. दि. 12-2-58

---

**आधारः**—(१) प्रा.ग.ह. खरेकृत 'महाराष्ट्राचीं चार दैवतें.' (२) पोवाडा. (३) शिभा १८।१८; सभासद पृ. १३; पोवाडा; राजखंड २०।२१७; शिचसा १।४७, ६८. (४) शिभा १८।२३ व २४. (५) जेधे करीणा. (६) सभासद पृ. १४. (७) शिभा १८।१७ ते ३८. (८) सभासद पृ. १५. (९) शिपसासं. ले. १७९७. (१०) शिपसासं. ले. ७९९.



# ८ : कान्होजी जेधे

कान्होजी नाईक जेधे म्हणजे उभ्या बारा मावळांतली एक मातब्बर आसामी होती. कान्होजींना मान मोठा. मावळच्या माना त्यांच्यापुढे आदराने लवत. त्यांचा शब्द कधी कोणीं मानला नाही असें व्हावयाचें नाहीं. मावळांतल्या रयतेला त्यांचा आधार डोंगरासारखा वाटायचा. कान्होजींचें वजन मोठें. मोठीं मोठीं माणसें त्यांच्या आवाजाखाली वागत होतीं. लोक कान्होजींना म्हणत, 'आम्ही कांही तुम्हावेगळे नाही ![1]' कान्होजींनी सांगायचें अन् मंडळींनी करायचें असा मावळचा रिवाज झाला होता.

रोहीडखोऱ्याची देशमुखी कान्होजींच्या कुळांत पिढ्यान् पिढ्यांची होती. त्यांचा वाडा कारींत होता. कारी हें गाव आलें भोरच्या दक्षिणेला चार कोसांवर. उंच उंच डोंगरांच्या दाटींत आणि रायरेश्वराच्या अजस्त्र डोंगराच्या मांडीवर कारी वसली होती. किर्र झाडी, दऱ्या कपारी अन् त्यांत कारी. कसाबसा शंभर उंबरठ्यांचा गाव. कान्होजींचा वाडा त्यांत सर्वांत मोठा. काळ्या पोतींत जसें टप्पोरें डोरलें गुंफलेलें असावें, तसा. आंत गुरांनी गजबजलेला गोठा. धान्याच्या कणग्यांनी तुडुंबलेला कोठा. वैरणकाडीचा गडगंज साठा. फुरफुरती पागा अन् चारचौकी अंगण. वाड्याला दिंडी दरवाजा अन् आंत देवडी. नोकर-चाकर अन् शिलेदार हशमांची वर्दळ वाड्यांत सतत असायची. जेधे देशमुखांचें खानदान मोठें इभ्रतीचें. पसाराहि तसाच मोठा. गणगोत, पाहुणारावळा, आला गेला धरून नाइकांच्या चुलीवर कांही नाही तरी

तीन तीन पायऱ्यांचा तांदूळ सहज वैरत होता. अन् आता तर कान्होजी नाईक शिवाजीमहाराजांच्या उजव्या हाताचे सरदार होते. मग पसारा असा असायचाच.

कान्होजींचा संसारहि ऐसपैस होता. त्यांना पांचजणी बायका होत्या. सावित्रीबाई, येसूबाई, चंदूबाई, रखमाबाई अन् कृष्णाबाई.[२] हा खास जनाना. शिवाय हौसमौज वेगळीच! त्यांना पांचजण मुलें होतीं.[३] बाजी, चांदजी, नाईकजी, मताजी आणि शिवजी बाजींनें तर फत्तेखानावर तलवारीची शर्थ करून भगवाझेंडा गनिमांच्या गर्दीतून बचावून आणला होता.[३] बाकीचीं पोरेंहि बापाच्या अन् भावाच्या वळणावर चाललीं होतीं.

कान्होजींचे कारभारी दादाजी कृष्ण लोहोकरे म्हणून हुषार अन् निष्ठावंत ब्राह्मण होते. दादाजीपंत आणि त्यांचे भाऊ सखोपंत कान्होजींच्या सदरेवर सेवा करीत होते. दोघेहि शूर होते. [३] त्यांच्या प्रीतींतले होते.

कान्होजींचें कुळदैवत नागेश्वर महादेव. प्राचीन दैवत. कारीच्या जवळच आंववडयाला नागेश्वराचें मंदिर होतें. पण खुद्द कान्होजींच्या देवघरांत अडीच हात उंचीची पितळेची एक मूर्ति आणि शिवलिंग होतें.[४]

कान्होजींचें मन फार फार मोठें होतें. त्यांच्या ढालीएवढ्या छातीखाली आभाळाएवढें मन होतें. उत्रवळीच्या खोपड्यांशीं आणि हिरडोशीच्या बांदलांशीं त्यांचें चार पिढ्यांचें हाडवैर होतें. इतकें की, एकमेकांचीं लग्नाचीं वऱ्हाडें कापून काढायला कुणाचे हात कचरत नव्हते![५] पण शहाजीराजांच्या पदरीं कान्होजी नाईक पडल्यापासून कान्होजींचें मन जास्तच विस्तारलें. आपण नुसती सेवा करतों आहोंत बाच्छावाची! छेः! हें कांही खरें नाही. आता सेवा करायची तर

भोसलेराजांचीच, असें त्यांच्या मनाने घेतलें अन् कान्होजींनी स्वतः शहाजीराजांना विनविलें की, मला पदरांत घ्या. रणदुल्लाखानाच्या नोकरींत आहे सध्या. तुम्ही मला खानाकडून स्वतःकडे मागून घ्या.[२] आणि शहाजीराजांनी रणदुल्लाखानापाशी कान्होजींसाठी मागणी घातली. खानाने खुषीनें मानली. कान्होजी तेव्हापासून ( नोव्हेंबर १६३६ ) शहाजीराजांच्या पदरीं पडले. मूळचाच हिरा. आता कोंदण मिळालें सोन्याचें. तेरा वर्षें नाईक राजांच्या पदरीं कर्नाटकांत होते. पुढे शहाजीराजांना मुस्तफाखानाने व बाजी घोरपड्यांनी दगाबाजी करून कैद केलें. त्यावेळीं कान्होजींना व दादाजीपंत लोहोकऱ्यांनाहि कैद भोगावी लागली. शहाजीराजे सुटले (दि. १६ मे १६४९), तेव्हा हेहि सुटले. मग मात्र महाराजांनी गुप्त कानमंत्र देऊन कान्होजींना व दादोजीपंतांना शिवबाकडे पुण्यास पाठवून दिलें. कान्होजींना कानमंत्र दिला की, शिवबाला व स्वराज्याला सांभाळा ![३]

कान्होजी नाईक मावळांत आले. अन् मग स्वराज्याचा डाव अगदी आट्यापाट्यांसारखा रंगला. खोपड्यांशीं व बांदलांशीं असलेलें उरलें-सुरलें वैर आता ते पूर्ण विसरले. बांदलांच्या व खोपड्यांच्या हातांत हात घालून महाराजांच्या पुढे मुजरे करूं लागले. संपलें संपलें वैर ! आता खोपड्यांच्या घरांत त्यांच्या उत्पन्नाच्या वांटण्या भावाभावांत करायची वेळ आली तर कान्होजी स्वतः वडीलपणाने जाऊन त्या करीत.

सगळी देशमुखमंडळी कान्होजींनी आपल्या मायेंत घेतली होती. आता दादाजी कोंडदेवांनी आणि महाराजांनी शिकविल्याप्रमाणे सर्वांचें ठरलें होतें. काय ? आता आपल्याच रक्ताने हत्यारें नाही भिजवायचीं. मरायचें तर देवाधर्मासाठी. मारायचें तर गनिमांनाच.

कान्होजीनाईक मावळांत घरींच होते सध्या. कारण पावसाळा तोंडा-

वर आला होता (जून १६५९). मावळच्या जमिनी उन्हाळयांत तापून पावसाची वाट पाहात होत्या. याच वेळीं खान विजापुराहून निघून तुळजापूर–पंढरपूर उरकून पुढे सरकला होता आणि बादशाहाने काढलेलीं दमदाटीचीं फर्मानें मावळांतल्या सर्व देशमुखांकडे रवाना झालीं होतीं.

आणि एक दिवशीं धाडकन् बादशाहाचें एक जबर कडक फर्मान कान्होजीनाईक जेध्यांच्या दारांत येऊन थडकलें! शाही जासूद फर्मान घेऊन आला. बादशाहाचें फर्मान? बादशाहाला कां आताच एवढी उचकी लागली? मोठ्या कुतूहलाने कान्होजींनी थैली हातीं घेतली. फर्मान उलगडलें. फर्मानाच्या कपाळावर अली आदिलशाह बादशाहाचा बारा बुर्जी शिक्का होता. नेहमीप्रमाणे फर्मान फारसी भाषेंत होतें. फारसनविसाकडून त्यांनी फर्मान वाचून घेतलें. फर्मानांतील सुरुवातीचा शिक्का व शिक्क्याच्याहि वर मजकूर होता. तो पुढीलप्रमाणे.[७]

'या अली मदद. मुहर शाही जद ज मिहर मुर्तजा बर मिहर व माह खुश्रव आदिल अली बाद अज मुहंमद बादशाह १०६८'

या शिक्कयाच्या खाली फार्सी मजकूर होता. त्याचा सारांशाने हिंदवी म्हणजेच मराठी तर्जुमा पुढीलप्रमाणे,—

" मशहुरूल अनाम कान्होजी जेधे देशमुख—

शिवाजीने अविचाराने व अज्ञानाने निजामशाही कोकणांतील मुसलमानांना त्रास देऊन लूट करून पातशाही मुलखांतील कित्येक किल्ले हस्तगत केले आहेत. यास्तव त्याच्या पारिपत्यासाठी अफजलखान महमदशाही यांस तिकडील सुभेदारी देऊन नामजाद केलें आहे. तरी तुम्ही खानमजकुरांचे रजामंदींत व हुकमांत राहून शिवाजीचा पराभव करून, त्याचा निर्मूल फडशा करावा. शिवाजीच्या पदरच्या लोकांस आश्रय न देतां त्यांस ठार मारावें व या आदिलशाही दौलतीचें कल्याण

चिंतावें. अफजलखान यांची शिफारस होईल त्याप्रमाणे तुमची सर्फराजी केली जाईल. त्यांचे हुकमाप्रमाणे वागावें. तसें न केल्यास परिणाम चांगला होणार नाहीं, हें जाणोन या सरकारी हुकमाप्रमाणे चालावें. तेरीख हिजरी १०६९ सवाल ५ हुजूरची परवानगी झाली असे.”

फर्मान कडक होतें. कान्होजी गंभीर झाले. केवढें हें संकट ! खानाला ते चांगले ओळखत होते. कर्नाटकांत एकाच छावणींत ते खानाबरोबर वावरलेले होते. हा इसम काय वृत्तीचा आहे, हें त्यांना ठाऊक होतें. खान म्हणजे शुद्ध कपटकसाई ! कान्होजींच्या डोक्यांत खळबळ उडून गेली. खानाची ती आडमाप आकृति, वारेमाप फौज आणि गरजणारा तोफखाना त्यांच्या डोळ्यापुढे दिसूं लागला. आता हा खान संगळ्या मावळ मुलखाची माती करून टाकणार, एक मान शिल्लक ठेवणार नाही, जे जे कोणी या स्वराज्याच्या फंदांत पडले ते घरादारांसकट, बायकापोरांसकट मसणांत जाणार, नव्हे, त्यांच्या घराचेंच मसण होणार, रडायलाहि उरणार नाही कोणी, हें स्पष्ट दिसूं लागलें. जीव आणि संसार जगवायचे असतील तर मुकाट्याने खानाचे पाय धरले पाहिजेत, नाही तर मरायला[२] उभें राहिलें पाहिजे. बादशाहाने झालेली चूक सुधारायला संधी दिली आहे. फर्मानाप्रमाणे खानाच्या पायाशीं सेवेला हजर व्हा. नाहीतर मरायला तयार राहा ! शिवाजीचें आता अगदी तळपट होणार हें नक्की आहे ! या फर्मानाचा अर्थ हा असा होता.

कान्होजी सुन्न झाले. आता कसें व्हायचें ? आपल्याप्रमाणेच इतर देशमुखांनाहि अशीं दमदाटीचीं फर्मानें आलेलीं असणार. अन् खरोखरच तशीं आलींहि होतीं.

अन् कान्होजी एकदम ताडकन् उठले. काय त्यांच्या डोक्यांत आलें काय नु ! भराभरा अंगावर कपडे चढवीत त्यांनी आपल्या मुलांना

हाकारलें. बाजी, चांदजी, मताजी, नाईकजी, शिवजी ! वाड्यांत एकदम धावपळ उडाली. घोडे तयार करण्याचा त्यांनी नोकरांना हुकूम सोडला. मुलें पुढे आलीं. कान्होजींनी निघायची तयारी केली. पोरांनाहि त्यांनीं फर्मावलें की, चला माझ्यासंगतीं. स्वारीची तयारी करा. पांचींहि पोरें कंबर आवळून तलवार बांधून तयार झालीं. कान्होजींनी बादशाहाकडून आलेलें तें फर्मान कमरेला खोचलें. सर्वांचीं नागेश्वरापुढे माथीं टेकलीं आणि ते बाहेर पडले. पांचहि जणांच्या टांगा बापामागोमाग घोड्यांवर पडल्या. धुळीचा लोट कारींतून उठून उधळत निघाला. कुणीकडे ? अफजलखानाकडे ?

कान्होजींनी वेलवंडखोऱ्यांत घोडा दौडला. समोर हिरव्या डोंगरावर काळा राजगड निळ्या आकाशांत भगवाझेंडा फडफडवीत उभा होता. महाराजांचा मुक्काम राजगडापलीकडे शिवापुरास होता.[८] कान्होजी वाऱ्यासारखे निघाले होते,....महाराजांकडे !

धक्का देणाऱ्या एकापेक्षा एकेक भयंकर बातम्या राजगडावर येत होत्या. सर्वांचीं मनें काळजीने सुकून गेलीं होतीं. महाराज चिंताक्रांत होते. एवढ्यांत कान्होजीनाईक आले. महाराजांना वर्दी गेली. आपल्या पांच पुत्रांना बरोबर घेऊन नाईक महाराजांच्या महालांत मुजऱ्यासाठी गेले. नाइकांना पाहून महाराजांना मोठें नवल वाटलें. कुतूहल दाटलें. आज नाईक अगदी सहपरिवार आले ! काय बेतावर येणें केलें ?

अन् पांच पुत्रांसह नाइकांनी महाराजांना मुजरे घातले.[३] त्या मुजऱ्यांत नितांत भक्तीचा गहिंवर होता. महाराजांनी त्यांचें हसून आगत-स्वागत केलें. महाराजांना आनंद झाला. अगदी वखताला नाईक आले होते. तरी पण कुतूहलाने महाराजांनी पुसलें की, अगदी पांची पुत्रांसह येणें केलेंत ? त्यावर नाईक म्हणाले की, तसाच कांही अवघड मुकाबला आलाय. तेव्हा महाराज नाइकांसह खलबतखान्यांत गेले.

दोघांचींहि मनें अगदीं तंग गंभीर होतीं. तेथे लगेच मसलत सुरू झाली.

कान्होजीनाइकांनी आलेले बादशाही फर्मान महाराजांपुढे ठेवलें आणि म्हटलें की, आम्हांला बाच्छावाचें फर्मान आलें आहे. महाराजांनी फर्मान पाहिलें. अफजलखानाला येऊन सामील व्हा नाहीतर परिणाम बरा होणार नाही, अशी त्यांत बादशाहाने दमदाटी दिली होती. तें पाहून महाराज म्हणाले,[३]

" तुमचे शेजारी खंडोजी खोपडे देशमुख उत्रवळीकर हे अफजलखानाकडे गेले !..."

कान्होजींच्या मावळांतले खंडोजी खोपडे देशमुख अफजलखानाला जाऊन सामील झाले हें ऐकून कान्होजींना धक्काच बसला. आपल्या स्वराज्यांतला एक मोठा देशमुख खानाला जाऊन मिळाला ! कान्होजी प्रमाणे खोपड्यांनाहि दमदाटीचें शाहीफर्मान आलें होतें. फर्मानांत जशी दमदाटी होती तसेंच आमिषहि होतें. खंडोजी खोपडे स्वराज्याचा झेंडा सोडून सरळ खानाकडे गेले. हें ऐकून कान्होजी तर बेचैन झाले. आणखी एक बातमी होती. कऱ्हाडजवळच्या मसूरचे सुलतानजी जगदाळे देशमुख हेहि खानाला मदत करावयास धावत गेले.[१०] आपल्यांतलीं माणसें खानास सामील होऊं लागलीं? कान्होजींच्या काळजाला धसकाच बसला. महाराज मग मुद्दामच कान्होजींना म्हणाले,[८]

" तुम्हीहि जा ! तुम्ही बादशाहाचा हुकूम मोडून राहिलांत म्हणजे तुमच्या वतनांस अपाय होईल ! तुमच्या जिवावरच हें संकट येऊन पडलें आहे ! तुम्हीहि जा ! "

महाराजांचे हे शब्द ऐकल्यावर तर कान्होजींचें काळीज कातरलें गेलें. हरामखोरी ? केवळ वतनाच्या, आणि संसाराच्या गाडग्यामडक्यांसाठी स्वराज्याशीं आणि महाराजांशीं हरामखोरी ? कान्होजींच्या चेहऱ्यावरच्या रेषान् रेषा आणि पापण्याभिवयांतील केसन् केस जणू

तरारून महाराजांना म्हणत होता की, काय बोलताय हें महाराज ? जेध्यांची औलाद असल्या हरामखोराच्या पोटची नाही ! हा कान्होजी जेधा गेलीं तेवीस वर्षें भोसल्यांच्या पायावर शिर वाहून जगतोय, तो अशा ऐन वख्ताला निमकहरामी करण्यासाठी ? आमच्यापुढे बाच्छावाने सतरा जहागिऱ्या ओतल्या तरी जेधे हरामजादगी करणार नाहीत ! महाराजांपरीस काय पोटचीं पोरें लाडकीं झालीं आम्हाला ? नगा नगा बोलूं महाराज असें ! तलवार घेऊन मुंडकीं कापा त्यापरीस आमचीं ! मी आन् माझीं पांच पोरें खस्त होऊन पडतों तुमच्या पायावर ! बहत्तर हाये निर्वंस झाला तर !

*कांहीं येक परीक्षावें । शोधावें बहुतांपरी...*



महाराज कान्होजींकडे पाहातच राहिले. उफाळून कान्होजी म्हणाले,[१]

“ थोरल्या महाराजांनी कर्नाटकाहून तुमच्या शेवेसाठी मला पाठविलें ! तें आमचें इमान शाबूत हाये ! म्यां खासा आन् माझे पांचजण लेक व आमचा जमाव देखील महाराजांच्यापुढे खस्त होऊं ! आम्ही इमानास अंतर करणार नाहीं ! ”

“ तुमच्या वतनास धक्का बैसेल ”[१]

“ वतन महाराजांचे पायावर ठेवलें ! साहेब कामासाठी वतनास पाणी सोडलें ! ”

आणि खरोखरच कान्होजींनी महाराजांच्यापुढे हातावरून अक्षरशः पाणी सोडलें.[२]

महाराजांनी कान्होजींचें मन पाहिलें ! त्यांची ती निष्ठा पाहून महाराजांची मुद्रा प्रसन्न होऊन पिवळ्या चाफ्यागत फुलली. महाराजांचे ते महाराजांचेच ! गेले ते महाराजांचे नव्हतेच ! महाराजांची खात्री होती की, कान्होजीनाईक नक्की नक्की आपलेच ! त्यांनी नाइकांचें मन पाहिलें म्हणून नाईक काय रागावले म्हणतां काय ? छेः नांव नाही ! महाराजांत आता शंभर हत्तींचें बळ आलें.

मग महाराजांनी व नाइकांनी आलेल्या खानाच्या मुसीबतीचा बारीक विचार केला. महाराज नाइकांना म्हणाले:[१]

“ वरकड मावळचे देशमुख व तुम्ही येके जागा बैसोन त्यांचा मुद्दा मनास आणणें. ”

कारण जसें जेधे नाइकांना फर्मान आलें होतें तशींच इतर सर्व देशमुखांनाहि फर्मानें आलेलीं होतीं. प्रत्येक देशमुख अशा चिंतेंत पडला होता की, आता करावें तरी काय ? महाराजांसकट आता स्वराज्य बुडणार ! खानाचा नांगर मग मावळावरून फिरल्याविना राहणार नाही. सगळे बिचारे गोंधळून गेले होते. महाराजांनी या देशमुखांशीं बोलून

त्यांच्या पाठीवरून हात फिरवायचें काम कान्होजींना सांगितलें. पुढचीं पावलें कशीं टाकायचीं हें सारें ठरवून कान्होजी माघारी कारीस निघाले. तेव्हा महाराज म्हणाले,[३]

" तुमचा कबिला कारीस आहे, तो ढमढेऱ्यांचे तळेगावास पाठवा. "

कारण? सुरक्षितता. बायकामाणसें मावळांत नकोत. अकस्मात एखादवेळीं दगाहि व्हायचा. नाइकांनी तेंच करायचें ठरविलें.

कान्होजीनाईक कारीस आले. त्यांनी सर्व देशमुखांना बोलावूं पाठवलें. नाइकांचें आवातन आल्यावर सगळे देशमुख आले. कान्होजींच्या सदरेवर अवघे एकजागा बसले.[१] सर्व घाबरलेले देशमुख म्हणाले की, आम्हांला बादशाहाची कडक फर्मानें आलीं आहेत. अफजलखानाशीं रूजू व्हा म्हणून हुकूम केलाय शाहानें. त्यावर कान्होजी म्हणाले की, आम्हांलाहि आलें आहे. पण कान्होजींच्या दांडगट शब्दांत, दांडगट चेहऱ्यावर आणि दांडगट देहावर भयाचें, भ्यालयाचें कांहीच चिन्ह नव्हतें! अफजलखानाचें बळ त्यांच्या खिजगणतींतहि नव्हतें. देशमुख-मंडळींचीं काळजें कापायला काढलेल्या कोंबड्यासारखीं उडत होतीं! शिवाय खंडोजी खोपडा स्वराज्य सोडून खानाला सामील झाल्याचेंहि त्यांना ठावें होतें. देशमुखांनी कान्होजींनाच विचारलें:[१]

" नाईक तुमचा विचार काय आहे? "

त्यावर कान्होजीनाईक म्हणाले,....अगदी धारेंत म्हणाले, अगदी आवेशाने म्हणाले,[१]

" आम्ही? आम्ही राजश्री स्वामीच्या पायाशीं इमान धरून वतनास पाणी देखील सोडिलें! आम्ही व आपले लेक देखील महाराजांपुढे खस्त होवे यैसा आमचा दृढ विचार आहे!! हें मऱ्हाष्टराज्य आहे! अवघियांनी हिम्मत धरून जमाव घेऊन महाराजासन्निध राहोन येकनिष्ठतेने शेवा करावी! तुमचा विचार काय आहे? "

तेव्हा अवघे देशमुख वीरश्रीने फुरफुरले. त्यांचे सारें भय उडालें. मऱ्हाष्टराज्याच्या महादेवावरची त्यांची भक्ति उफाळून आली. अवघे देशमुख म्हणाले,[१]

" नाईक, तुमचा विचार तोच आमचा विचार ! "

झालें, ठरलें ! आपल्या इमानाची अक्षत देशमुखांनी नाइकांच्या पदरांत टाकली. देशमुखांच्या माना महाराजांच्या हुकमाला कुर्बान आहेत हें कान्होजींनी ताडलें. कान्होजी खूष झाले. मिशीला पीळ पडला. अस्सल मराठ्याच्या जातकुळीचें इमान सतीसारखें असतें. शिंदळकीचें नसतें ! कोरलखिंडीपासून मोहोरखिंडीपर्यंत आणि पवने-पासून कोयनेपर्यंत मावळच्या घरट्या–खोपट्यांतून महाराजांवरच्या निष्ठेचे साद पडसाद उमटले.

कान्होजींचे कारभारी दादाजीपंत कल्याणच्या ठाण्याचे हवालदार होते.[२] ते कारीला आले. त्यांच्याबरोबर नाइकांनी आपलीं व त्यांचींहि वायकामाणसें देऊन ढमढेऱ्यांच्या तळेगावास त्यांना रवाना केलें.[३] कारण सुरक्षितपणासाठी ही काळजी घेण्यास राजश्री स्वामींनीच सांगितलें होतें. राजश्री स्वामी म्हणजे शिवाजी महाराज.

महाराज शिवापुरास होते. खान वाईंत येऊन थडकला होता. कृष्णा नदीच्या काठावर त्याची दाट छावणी पडली होती. हिरवे झेंडे वाईवर फडफडत होते.

सर्व देशमुखांसह व त्यांच्या मावळी सैन्याच्या जमावासह महाराजांपाशी जायचा बेत कान्होजींनी मुक्रर केला. लगेच सर्वांनी आपआपल्या मावळ्या समशेरबहाद्दरांच्या तुकड्या मावळखोऱ्यांतून बाहेर काढल्या. आता खानावर भवानीच्या अपमानाबद्दल सूड घेण्यासाठी सगळेजण धुमसत होते. बादशाहाच्या पत्रांशिवाय खुद्द खानानेहि देशमुखांना पत्रें पाठविलीं होतीं. हैबतराव शिळमकरांना त्याने पत्र

पाठविलें.[११] कान्होजी जेध्यांच्या, शिवजी जेधे नांवाच्या एका मुलालाहि खानाने पत्र पाठविलें की, तुमचा बाप व भाऊबंद शिवाजीची चाकरी करतात म्हणून तुम्ही मनांत कांहीहि संकोच धरूं नका ![१२] अर्थात् हीं आलेलीं पत्रें आता देशमुखी दप्तरांच्या बासनांत विश्रांति घेत. पडलीं होतीं कायमचीं !

महाराज जरी आपलीं राजकारणें सावधानपणें करीत होते तरी प्र यत्नाबरोबरच श्रीभवानीच्या चिंतन–पूजनांत ते तल्लीन होत होते त्यांची नितांत खात्री होती की, जगदंबा आपणास यश देईल. आणि एक दिवस अत्यंत विस्मयजनक प्रकार महाराजांच्या प्रत्ययास आला. महाराज झोपले. झोप लागली आणि त्यांना स्वप्न पडलें.[१३] साक्षात् तुळजाभवानी त्यांच्या स्वप्नांत त्यांना दिसली. तें दिव्य स्वरूप दिसतांच ते क्षणभर गोंधळून गेले. ते फक्त वारंवार नमस्कार करीत जगदंबेच्या चरणीं लीन झाले. जगदंबा भवानीने त्यांना उठवून हसतमुखाने म्हटलें,[१३]

" चिंता करूं नकोस. तुजला यश मिळेल. मी तुझी तलवार होऊन राहिलें आहें !! "

असें बोलून ती महान् तेजस्वी मूर्ति महाराजांच्या भवानी तलवारींत शिरत शिरत अदृश्य झाली ! तें कोटिसूर्यप्रभेसारखें दीप्तिमान् तेज तलवारींत प्रवेशून विलीन झालें. जगदंबेपुढे महाराज नमस्कार करीत राहिले होते.[१३]

आणि महाराजांच्या नेत्रपाकळ्या उमलल्या. त्यांनी डोळे उघडून पाहिलें. तें स्वप्न होतें. तुळजाभवानीने स्वप्नीं येऊन आशीर्वाद दिला ![१३] केवढा आनंद झाला त्यांना ! महाराजांनी हात जोडले. जगदंब ! जगदंब ! जय भवानी !

आणि आईसाहेबांस, नेताजीस, मोरोपंतांस आणि निळोपंत, रघुनाथपंत, गोमाजीनाईक पाणसंबळ, सोनोपंत, कृष्णाजीनाईक,

प्रभाकरभट राजोपाध्ये वगैरे मंडळींस त्यांनी आपणाजवळ बोलावून हें दिव्य स्वप्न त्यांना कथन केलें. आणि म्हणाले,[१४]

" श्री प्रसन्न जहाली ! आता अफजलखानास मारून गर्दीस मेळवितों ! ! "

या सर्व मंडळींचीं धावीं दणाणलेलीं होतीं. हीच मंडळी सारखी म्हणत होती की, खानाशीं तह करा ! युद्ध नको ! तह करा ! युद्ध नको ![१४] त्या मंडळींना हा तुळजामातेचा दिव्य साक्षात्कार महाराजांनी सांगितला. जिवलग मंडळींनाहि हायसें वाटलें. महाराजांना स्वतःला तर आता मृत्युंजयाचें वळ आल्यासारखें वाटूं लागलें. तरीहि विवेकी व धीरोदात्त महाराज म्हणाले,[१४]

" आता एकच तजवीज करावी. संभाजीराजे चिरंजीव आणि मातुःश्री आईसाहेब यांस राजगडावरच ठेवावें. जर अफजलखान मारून जय जहाला तरी पुढे चालवावयास माझा मी आहेंच. परंतु एखादे समयीं युद्धीं माझा प्राणनाश जहाला तरी चिरंजीव संभाजीराजे आहेत, त्यांस राज्य देऊन त्यांचे आज्ञेंत तुम्हीं राहावें ! "

महाराज निर्वाणीचें बोलत होते. सर्वांचीं मनें थरथरत होतीं. खान वाईत आला होता. त्याच्याबरोबर जावळीकर चंद्रराव मोऱ्यांचा एक भाऊबंद प्रतापराव मोरे हा होता. प्रतापरावाची जबर महत्त्वाकांक्षा होती की, जावळीची दौलत आणि चंद्रराई परत आपण मिळवायची. शिवाजीला हाणायचें. प्रतापरावाचा खानाला खास सल्ला होता की, जावळी काबीज करा. त्याच्या सज्ञान सल्ल्याप्रमाणे जावळीचा मनसुबा खान आखूं लागला. हा जावळीचा मुलुख गहन व बिकट जंगलदऱ्यांचा होता व प्रतापराव तेथील पूर्ण माहीतगार होता. म्हणून या अरण्यपंडिताचा सल्ला खान ऐकत असे. खानाचे बेत महाराजांस समजत होते. बातम्याहि येत होत्या. विश्वासराव नानाजी दिघे नांवाचा

महाराजांचा हेर वाईंत व भवती भिरभिरत होता. महाराजांनी हें सर्व विचारांत घेऊन ठरविलें की, आपण खानाशीं झुंजायचें तें जावळीच्या भयंकर अवघड मुलखांतच. आणि त्यांनी ठरविलें की, आईसाहेब व शंभूराजे यांस राजगडावर ठेवून प्रतापगडावर जायचें.[१४] आईसाहेबांचा जीव खालीवर होऊं लागला होता. का नाही व्हायचा ? त्या आई होत्या.

खान लौकरच स्वराज्यांत घुसणार हें नक्की होतें. आता महाराजांची मसलत पक्की झाली. खान स्वराज्यांत येतोय ? येऊं द्या ! सह्याद्रींतल्या वारुळांत शिरेपर्यंत साधा फूत्कारहि खानाला ऐकूं येणार नाही; पण तो एकदा वारुळांत शिरल्यानंतर........!

लगेच महाराजांनी नेताजी पालकरांस इषारा दिला:[१५]

" अफजलखानास आम्ही जावळीस बोलावितों. ते समयीं तुम्हीं घाटमाथां येऊन मार्ग धरणें."

महाराजांनी रघुनाथ बल्लाळ सबनिसांस फर्माविलें की, तुम्हीं सरनौबत नेताजी पालकरांच्या निसबतीस राहाणें. त्याचप्रमाणे आपले चुलत भाऊ बाबाजीराजे भोसले हे भीमथडीकडे होते त्यांना,[१६] आणि शामराजपंत रांझेकर व त्र्यंबक भास्कर हे कोकणांत होते त्यांना, जासूद रवाना केले की, जल्द अन् जल्द प्रतापगडावर हुजूरदाखल होणें. आम्ही तुमची इंतजारी करीत आहोंत.[१५]

आणि महाराज प्रतापगडावर जाण्यास निघाले. महाराज एका अत्यंत अवघड, अत्यंत भीषण, अगदी जिवावर येऊन बेतलेल्या प्रसंगाला तोंड देण्यास निघाले होते. केवढी कठीण कामगिरी होती ही ! महाराजांनी ठरविलें होतें की, खानालाच प्रत्यक्ष तोंड द्यायचें !

पण त्याहिपेक्षा अत्यंत कठीण गोष्ट प्रथम करायची वेळ आली होती. आईसाहेबांचा निरोप घेणें ही ती गोष्ट ! आणि हृदयाला पीळ पाडणारी दुसरी गोष्ट—सईबाई राणीसाहेबांचा निरोप घेणें ही ! आई आणि

पत्नी. दोन्हीहि नातीं किती नाजूक. कोणत्या शब्दांत हें सांगावें सारें? फार अवघड आहे हें. येथे शब्द दुबळे पडतात. तें शब्दांत सांगायचेंच नसतें. शब्दांत ऐकायचेंहि नसतें. तें हृदयाच्या डोळ्यांनी पाहायचें. हृदयाच्या कानांनी ऐकायचें, हृदयावरच लिहायचें, हृदयावरच वाचायचें, अन् तें समजतेंहि फक्त हृदयांतील हृदयांनाच. अबोल अश्रु हीच त्यांच हाक अन् उफाळणारे हुंदके हीच त्यांची ओ.

शिवबा आपल्याला सोडून प्रतापगडावर जाणार ही गोष्ट आई-साहेबांच्या काळजाचा ठाव घेणारी होती. शिवबाने खानाला प्रत्यक्ष तोंड द्यायचेंहि ठरविलें आहे, ही गोष्ट आईसाहेबांना समजल्यावर तर धारदार पात्याच्या खीने त्यांचें हृदय घुसळून निघूं लागलें. 'शिवबा, नको जाऊंस मला सोडून!' हाच त्या मातृहृदयाचा हुंदका होता. शिवाजीची आई होणें फार फार अवघड. एक खडतर व्रतच तें!

आईसाहेबांना एकूण सहा पुत्र झाले.[१७] शिवबा सहावा. आई-साहेबांचें अखेरचें स्तनपान शिवबाने केलें. पाहिल्या पांच पुत्रांपैकी चार पुत्र[१७] मृत्यूने आईसाहेबांच्या मांडीवरूनच उचलून नेले. अगदी अलगद. एकच जगला. संभाजीराजा. तो नेहमी वडिलांपाशी, शहाज़ीराजांपाशी बंगळुरास असे. पण तोहि ठार झाला! याच याच अफजलखानाच्या दुष्ट कुचराईमुळे शिवबाचा हा सख्खा थोरला भाऊ संभाजीराजा ठार झाला (इ. स. १६५५). आता उरला फक्त शिवबा. एकुलता एक. खानाला तोहि पाहावेना! कुऱ्हाड परजीत आला होता आता, मायलेकांचीताटातूट करायला.

निघतांना आपल्या कारभाऱ्यांना महाराज म्हणाले,[१४]

"एखादे समयीं युद्धीं प्राणनाश जहाला तरी संभाजीराजे आहेत. त्यांस राज्यावर बसवून त्यांचे आज्ञेंत तुम्हीं वागावें!"

आणि कठोर तटबंदींत मनाला घट्ट बांधून ठेवणाऱ्या आईसाहेबांकडे


महाराज वळले. आता काय बोलायचें ? शिवबा प्रतापगडावर जातोय आणि नंतर एक दिवशीं खानाला जातीने भेटणारहि आहे तो ! तो खान ! अफजलखान ! दगाबाजी हा स्वभावच ज्याचा ! आईसाहेब कळकळून म्हणाल्या,[१८]

" शिवबा तूं खानाला भेटायला जाऊं नकोस ! खान तुला ठेवणार नाहीं ! तो बेइमान आहे ! "

यावर महाराज गंभीरपणाने म्हणाले,[१८]

" एवढी माझी उमर झाली. आजपावेतो कोणास भेट दिली नाही. आईसाहेब एवढ्या गोष्टीची परवानगी द्या ! आई, हा अफजलखान

*मनोगतेंचि बोलणें । मनोगतेंचि चालणें*



आला. याने देवांनाहि धाक लाविला आहे. आता मी गेलेंच पाहिजे !"

आईसाहेबांना जगदंबेने केवढें साकडें आणून घातलें होतें. आईसाहेब मोठ्या धीराच्या होत्या. राजकारणाचा कठोर राजधर्म त्या जाणत होत्या. पीळ पेच ओळखून सावध बुद्धीने वागणाऱ्या होत्या. एखादा समशेरीचा मुत्सद्दी चुकला फसला तरी त्याला मोठ्या मनाने सांभाळून घेऊन हुरूप देणाऱ्या होत्या. पण अखेर त्या एका मुलाच्या आई होत्या ! आईचें काळीज आईलाच माहीत. म्हणतात ना कोणाची आई होऊं नये म्हणून !

आईसाहेबांच्या पुढे त्यांचें अखेरचें दर्शन—अखेरचें ? नाही ! नाही ! नकोच तो अभद्र विचार. आईसाहेबांच्या पुढे त्यांचें दर्शन घेण्यासाठी त्यांचा शिवबा उभा होता. देव, प्रजा आणि धर्म यांची सेवा हेंच शिवबाचें 'जगणें' होतें. शिवबा प्रतापगडावर 'जगायलाच' चालला होता. शिवबाने गेलेंच पाहिजे हें उघड होतें. आईसाहेबांचें हृदय सह्याद्रीच्या कड्यासारखें कठीण होत गेलें. शिवबाने प्रतापगडावर जावें हीच आता त्यांची इच्छा होती ! महाराजांनी त्यांच्या पावलांवर मस्तक ठेवलें.[१४] आईसाहेबांनी लाडक्या लेकाला निरोपाचा आशीर्वाद दिला,[१९]

" शिवबा, विजयी होशील ! शिवबा, चढती दौलत तुला लाभेल ! शिवबा, यशाचा विडा मिळवून आण ! पण शिवबा काम बुद्धीने कर ! संभाजीचें उसनें फेडून घे ! ! "

आवेशाने आईसाहेबांनी शिवबाला संभाजीराजांच्या मरणाची आठवण दिली. सूडाची आठवण दिली.[१८] आशीर्वाद दिला. निरोप दिला.

महाराजांनी सईबाई राणीसाहेबांचा निरोप घेतला.

त्या आजारी होत्या.

दोन वर्षांच्या संभाजीराजाला हृदयीं धरलें. दरूणी महालाचा निरोप घेतला.


आणि महाराजांचीं पावलें प्रतापगडाकडे निघालीं ( दि. ११ जुलै १६५९ ).

राजगडापासून प्रतापगड, किंचित् नैर्ऋत्येला बारा कोस.

* * *

आधारः—(१) राजखंड १५।३२५. (२) स. ग. जोशीसंग्रह–अप्रसिद्ध दफ्तर २०।३८ व ९१. (३) जेधेशका. व करीणा. (४) अजूनहि आहे (५) राजा शिवछत्रपति भा. २ पाहा. (६) मंडळ त्रै.व.८ अं.१ पृ.९६. (७) साधन चि. पृ. २८७. (८) शिचप्र. १९. (९) शिचप्र. पृ. ४३. (१०) राजखंड १५।३. (११) राजखंड १७।११. (१२) पसासं ७८२. (१३) शिभा २०।१ ते २४; सभासद पृ. १४ व १५; पोवाडा पृ. ११; दवापोगौरव पृ. ३०. (१४) सभासद पृ. १५. (१५) सभासद १५. (१६) शेडगांवकरब. पृ. २५. (१७) शिभा ५।२३. (१८) पोवाडा पृ. १८. (१९) सभासद पृ. १५; पोवाडा पृ. १८.

# ९ : हेजीब



महाराज प्रतापगडावर आले. पावसाला तोंड लागलेंच होतें. कृष्णा कोयना तुडुंब वाहूं लागल्या होत्या. पावसाळा होता म्हणूनच खान वाईंत गप्प होता. नाहीतर आल्या आल्याच तो महाराजांवर चालून आला असता. आपल्या बायकामुलांसह खानाने वाईंत मुक्काम ठोकला होता. आता तो वाट पाहात होता पाऊस थांबण्याची. पण त्या अवधींत त्यानें स्वराज्याच्या इतर कांही मुलखावर आपल्या फौजा पाठविल्या. कल्याणजी यादव ऊर्फ जाधव सुपे परगण्यावर, नाईकजीराजे पांढरे शिरवळावर, नाईकजी खराटे सासवडावर, सिद्दी हिलाल कर्यात मावळावर आणि सिद्दी सैफखान तळकोकणावर चालून गेले.[1] यांतील थोडा फार प्रदेश व शिरवळचें ठाणें त्यांच्या कबजांत गेलें.

परंतु खानाला हवा होता खासा शिवाजीच. ठाणीं, कोट अन् किल्ले घेण्यांत व्यय फार होत होता. खानाला भूक शिवाजीची होती. म्हणून हरहुन्नरेंकरून शिवाजीस पकडावा व शक्य तों वाईंतच शिवाजीला भेटीस आणून जिवंत धरावा आणि बादशाहाची मातब्बर चाकरी करून दाखवावी असा त्याने विचार केला. अन् आपला एक हुशार, मसलती बुद्धीचा हेजीब पैगामासाठी शिवाजीकडे पाठवावा आणि त्याच्यामार्फत शिवाजीला फसवून प्रतापगडावरून वाईंत आणवावा असा मनसुबा खानाने मनांत योजला. शिवाजीला फसवूनच पकड किंवा मार असा बेगम बडी साहेबा हिचा व बादशाहाचा सल्ला होताच. खान तोच विचार करीत होता.

महाराज प्रतापगडावर मसलतींत व्यग्र होते. खान महाराजांस

बुडवावयास आलेला पाहून कोकणांतले शत्रु सिद्दी व फिरंगी चुळबुळूं लागले होते. सिद्दी सैफखान मुलखमारी करीत होता. आणखी एक लबाड शत्रु खोड्या काढीत होता. तो म्हणजे राजापूरचा वखारवाला इंग्रज टोपीकर हेन्री रीव्हिंग्टन. महा धूर्त हे इंग्रज. व्यापाराच्या नांवाखाली त्यांची राजकारणाचीहि हातचलाखी चालू होती. महाराजांचे हेर सर्वत्र होते. ते सर्वांच्या गोटांतून बित्तंबातम्या आणीत होते.

जैतापूरच्या खाडींत अफजलखानाच्या मालकीचा माल भरलेलीं कांही गलबतें उभीं आहेत,[३] हीहि एक बातमी होती.

रोज गडावर येणाऱ्या बातम्या ऐकून, एखादा कचदिल माणूस महाराजांच्या जागीं असतां तर बसल्या जागींच खचून अंथरुणावर पडला असता. आपलें बळ वाढविण्याचा सपाटा खानाने चालविला होता. विजापुराहून विशाळगडच्या ठाणेदारास, म्हणजे अब्दुल कादीर सरवरखानास हुकूम गेला होता की, विशाळगडावरील फौजेसह अफजलखानास जाऊन सामील हो.[२]

एकेक बातम्या प्रतापगडावर येत होत्या.

अन् एक दिवशीं हृदय पिळवटून टाकणारी बातमी गडावर आली. अवघ्या प्रतापगडचें तोंड खर्रकन् उतरलें. सर्वांच्या माना खाली झाल्या. बातमी राजगडावरून आली होती. नशीबाने आणखी एक कडूजहर पेला महाराजांपुढे केला. महाराजांनी ती बातमी ऐकली. सौभाग्यवती सईबाईसाहेब राणीसाहेब मृत्यु पावल्या! (दि. ५ सप्टेंबर १६५९.) या दिवशीं भाद्रपद वद्य चतुर्दशी होती.[२२]

राणीसाहेब स्वभावाने अत्यंत गोड व रूपाने फार सुंदर होत्या.[४] महाराजांचें त्यांच्याशीं सुमारें अठरा वर्षांपूर्वी लग्न लागलें. पंत दादाजी कोंडदेव होते तेव्हा. फार फार तर वयाने सात वर्षांची असलेली ही सुकुमार लक्ष्मी महाराजांचें बोट धरून अठरा वर्षांपूर्वी भोसल्यांच्या

घरांत प्रवेशली. फलटणकर बजाजी नाईक निंबाळकरांची ही वहीण. दोन वर्षे व तीन महिन्यांपूर्वी त्यांच्या पोटीं पुरंदरगडावर संभाजीराजांचा जन्म झाला (दि. १४ मे १६५७). तेव्हापासून त्यांची प्रकृति ठीक नव्हती. अंगावरच्या दुधावर संभाजीराजांचें पोट भरेना. म्हणून मग आईसाहेबांनी कापूरवहाळच्या धाराई गाडे हिला दूधआई म्हणून राजगडावर आणलें होतें.

महाराजांवर खानाचें संकट आलेलें, सर्वजण चिंतेंत अन् अशा स्थितींत राणीसाहेब गेल्या. मरतांना कोणत्या वेदना त्यांना झाल्या असतील ? महाराजांसाठी जीव कसा घुटमळला असेल ? महाराजांसाठी त्या पतिव्रतेने कोणत्या विनवण्या देवापाशी केल्या असतील ! त्या फक्त कल्पनेनेच जाणायच्या. इतिहास मुका आहे.

महाराजांनी हें दुःख मुकाट्याने गिळलें.

आता चिंता स्वराज्याची.

आश्विन उजाडला. नवरात्राचे नऊ दिवस सुतकांतच गेले. दसरा उजाडला. सीमोल्लंघन करायचें कसें? अफजलखानाने सीमाच आडवली होती.

पण मावळचे घोडे शिलंगणासाठी फुरफुरत होते. तलवारी सळसळत होत्या. कान्होजी जेध्यांनी बारा मावळचे अवघे देशमुख फौजेसह एक केले. आता बादशाही फर्मानांच्या भेंडोळ्यांना ते डरायला तयार नव्हते. कान्होजींच्या मागोमाग ते हर हर महादेव गर्जत निघाले. झुंजारराव मरळ, हैबतराव शिळमकर, यशवंतराव पासलकर, मारणे, ढमाले, बांदल, डोहार वगैरे खासे खासे झुंजार निघाले. प्रतापगडाकडे मावळांतल्या शिवगंगा उचंबळून वाहात निघाल्या. कोयनेच्या खोऱ्यांत देवदैवतांचे जयजयकार घुमले. त्या निबिड अरण्यांतून सळसळत खळखळत ही लाट प्रतापगडावर चढली. महाराजांना खबर गेली. कान्होजी जेधेनाईक

28480 दि.

आले ! जेधेनाईक आले ! बारा मावळांतलीं हजार हजार मराठे घेऊन आले ! महाराजांचा आनंद उमलला. खानाचें हें संकट एवढें भयंकर होतें की, एका एका माणसाची किंमत महाराजांना स्वतःच्या हाताइतकी वाटत होती. अन् कान्होजी तर एकटे नव्हते. आता महाराजांत बळ आलें दहा हजार हत्तींचें !

तेवढ्यांत बाबाजी भोसले हेहि जमेतीनसी प्रतापगडास आले. बाबाजींनाहि बादशाहाने एक फर्मान पाठविलें होतें की, अफजलखानास सामील व्हा ! बाबाजींनी तें फर्मान गुंडाळून ठेवलें आणि तडख दौडत निघाले, ते थेट महाराजांच्या पायापाशी !

स्वराज्यांतला प्रत्येक शिलेदार, प्रत्येक गोलंदाज, प्रत्येक तिरंदाज अन् प्रत्येक साधा हुजऱ्यासुद्धा महाराजांची काळजी करीत होता. प्रत्येकाचें प्रेम महाराजांवर इतकें होतें की, त्यांना वाटत होतें की, कुठे लपवूं माझ्या राजाला? महाराजांची सेवा म्हणजे देवाधर्माची सेवा, अशी त्यांची नितांत श्रद्धा होती. महाराजांमुळेच आपल्या आयुष्याचें सोनें झालें ही प्रत्येकाची अनुभवाने खात्री झाली होती. भगवी पताका खांद्यावर घेऊन जन्मभर पंढरीच्या वाऱ्या करणें आणि भगवा झेंडा घेऊन बादशाहावर स्वाऱ्या करणें–दोन्हीहि धर्माचेंच, पुण्याचेंच, मोक्षाचेंच ! एक गाव सुलतानाच्या मिठींतून सोडविलें की, तुळजापूरची भवानी आनंदित होते. आता, तिचा पाणउतारा करणाऱ्या खानाला निर्दाळलें तर ती यशवंत खंडेश्वरी दुर्गाभवानी आठहि हातांनी पाठ थोपटील ! तें खरें देवकार्य. हें मऱ्हाष्ट राज्य. हें देवाधर्माचें राज्य. जीव वेंचून हें जपलें पाहिजे.

खानावरच्या रागाने सर्वांचें रक्त उकळत होतें. खान जिवावर उठलाय महाराजांच्या. येऊं दे त्याला ! आमच्या महाराजांना जगदंबा प्रसन्न आहे ! नाही हा बत्तीस दातांचा बोकड तिने घेतला तर आई भवानीचें

अन् शिवाजीराजांचें नातेंच लटकें ! पण असें कधी व्हायचेंच नाही !

अशी तिडीक अन् इरेसरी महाराजांच्या मावळ्यांत अवतरली होती. महाराजांनी आपल्या या साध्याभोळ्या, निष्ठावंत, मर्द मित्रांना असा कांही मायेने लळा लावला होता की, प्रत्येकाला महाराज हे सख्ख्या भावाप्रमाणेच वाटत.[५]

कान्होजीनाईक प्रतापगडावर पोहोचले. आता गड आगळ्या वीरश्रीने दणाणून गेला. नाही तर गडावरचे लोक काळवंडून गेले होते. तान्हाजी, येसाजी, मोरोपंत, सूर्याजी वगैरे मंडळी काळजावली होती. कारण खंडोजी खोपडे व सुलतानजी जगदाळे जसे खानाकडे गेले तसेच सारे देशमुख खानाकडे जातात की काय, अशी काळजी प्रत्येकाला पडली होती. पण कान्होजी आले आणि गड हसला.

महाराजांच्या मुजऱ्याला कान्होजी सर्वांसह गेले. भरल्या हृदयाने महाराजांनी त्यांचें आगतस्वागत केलें. महाराज नौगजींत बसले होते. कान्होजी व सर्व देशमुखमंडळी भवती बसली. बोलणीं अर्थात् खानासंबंधी सुरू झाली. तेव्हा कान्होजी सर्वांना म्हणाले की, गड्यांनो, आपलें इमान मोलाचें आहे. तें भुल्रुन मिऊन जाणारें नाही. वेलरोटीची आण वाहून सांगा आपल्या राजाला की, चिंता करूं नकोस; आम्ही आहोंत पायाशीं.

अन् भराभरा एका एका देशमुखाने महाराजांपुढे आणा शपथा वाहिल्या.[६]

आणि मग महाराजांनी सर्वांना भोजन घातलें.[७] मांडीला मांडी लावून गडावर पंगत बसली.

आणि तिकडे वाईंत ? खान घमेंडींत होता. त्याच्या अंगीं रेड्याचें बळ होतें. तो सहज पहारीची सरी करीत होता ! काय त्याचीं पापें

सांगावींत ? गोरगरिबांचा अन् देवांचा वैरी. मुलखाचा पदर ढळला. रयतेला धाक बसला.

खानाने आता वकील प्रतापगडावर पाठवायची तयारी केली. कृष्णाजी भास्कर कुलकर्णी वाईकर खानाच्या पदरीं होता. कृष्णाजीपंताला खानाबद्दल बरीच कळकळ होती. पंत खानाला सल्ला देत होता. हैबतराव शिळमकरांना व शिवजी जेध्याला पत्रें पाठवून आपल्याकडे घेण्याचा सल्ला त्यानेच खानाला दिला होता.[८] अर्थात् अशा फितुरीला कोणीहि बळी पडले नाहीं. सगळे गेले प्रतापगडावर महाराजांकडेच.

वाईहून खानाचा हेजीब कृष्णाजीपंत कुळकर्णी प्रतापगडावर येण्यास निघाला. खानाने त्याला सर्व सांगून पढवून पाठविलें.

खानाच्या या मोहिमेची बातमी सबंध दख्खनभर आणि हिंदुस्थानांतहि पसरली होती. औरंगझेब, कुतुबशाह, इंग्रज, फिरंगी, डिंगमार वलंदेज, फरांशीस, सिद्दी, मोंगलांचे सुभेदार आणि विजापूरकरांचे ठाणेदार या सर्वांचें लक्ष अफजलखान आणि शिवाजी भोसले यांच्या मुकाबल्याकडे अत्यंत उत्सुकतेने लागलें होतें. परस्पर शिवाजीचा काटा निघालेला प्रत्येकास हवाच होता. जो तो वाट पाहात होता नव्या बातमीची.

आणि गडावर बातमी आली की, खानाचा वकील गडावर येत आहे. खानाचा वकील! वास्तविक साधा माणसासारखा माणूस. पण त्याच्या येण्याने गडावर कुतूहल अन् काळजी दाटली. वकिलाला मोठ्या मानाने गडावर घेण्यांत आलें. त्याची उतरण्याची व्यवस्था एका स्वतंत्र घरांत उत्तम करण्यांत आली. शागीर्दपेशा व इतर इंतेजाम चोख ठेवण्यांत आला. नंतर वकिलाला महाराजांच्या भेटीस नेण्यांत आलें. आगत-स्वागत दरबारी रीतीने झालें. लौकिक बोलणें चालणें झालें आणि वकिलाने मुद्दयाला हात घातला. खानाने जें सांगून पाठविलें होतें तें

सर्व म्हणणें वकिलाने महाराजांस सांगण्यास सुरुवात केली. कृष्णाजी भास्कर म्हणाला,[९]

" खाने अजम अफजलखान महंमदशाही विजापुराहून वाईत आले आहेत. आपले तीर्थरूप महाराजसाहेब शहाजीराजे यांचा व खानसाहेब यांचा पुरातन भाईचारा व स्नेह चालत आला आहे. त्यामुळे खानसाहेबांस आपण कांही इतर नाही. आपण येऊन खानसाहेबांस भेटावें. आपणास पातशाहाकडून तळकोकणचें राज्य व जहागीर खानसाहेब देववितील. जे गडकोट आपण घेतले आहेत तेहि आपणाकडेच करार करवितील. वरकडहि नांवाजणी करवितील. जितकें आपल्या मनांत असेल तेणेप्रमाणे आपणास सरंजाम देववितील. आपण खानसाहेबांचे भेटीस यावें."

वकिलाने खानाकडून आणलेली साखर मुठीमुठीने पेरली. त्यावर महाराज गोडपणाने म्हणाले,[१०]

" जसे तीर्थरूप महाराजसाहेब, तसेच खानसाहेबहि आम्हास वडीलच आहेत ! त्यांची भेट अलबत्ता घेऊं ! "

खानाने महाराजांस देण्यासाठी एक पत्रहि दिलें होतें. तें पत्र कृष्णाजी भास्कराने महाराजांपुढे ठेवलें. महाराजांनी पत्र घेतलें व कृष्णाजीपंताला आपल्या मुक्कामावर जाण्यास निरोप दिला. उद्या या पत्राचे जवाब देऊं असें महाराज म्हणाले. गडावरच्या आपल्या मुक्कामावर कृष्णाजीपंत रवाना झाला.

महाराजांनी खानाचें पत्र घेतलें. आपल्या मुत्सद्दीमंडळासह महाराज एकांतांत बसले. पंताजी गोपीनाथ बोकील, मोरोपंत, शामराजपंत रांजेकर, रघुनाथपंत अत्रे, नारोपंत, सोनोपंत वगैरे मंडळी त्यांत होती.[१०] त्यांच्यापैकीच एकाने खानाचें पत्र वाचण्यास सुरुवात केली. खानानें महाराजांस लिहिलें होतें[११] :

" आपण आजकल कदम बरकदम बेजबाबदार बर्ताव करीत आहांत तो हजरत आदिलशाह बादशाहांच्या मनास तीरासारखा बोचत आहे. हा डोंगरी किल्ल्यांचा मुलुख आपण आपल्या कबजांत घेतला आहे. त्यामुळे दंडाराजपुरीचे सिद्दीहि आपणावर सख्त नाराज आहेत. आपण चंद्रराव मोऱ्यांची जावळी हल्ला करून बळजोरीने कबजा केलीत. कल्याण व भिवंडीहि कबजा करून तेथील मुसलमानांच्या मोठमोठ्या हवेल्या जमीनदोस्त केल्यात. त्यांची सारी दौलत फस्त करून ताख्तताराज केलीत. ते सर्वजण आपणावर अजुर्दा झाले आहेत. आपण काजींना आणि मुल्लांना कैद केलें आहे. तसेंच आपण बेगुमान-पणाने स्वतंत्र दौलतीच्या राजाप्रमाणे मानमरातब आणि निशाण्या धारण करीत आहां. बंडखोरी करून कोणालाहि जुमानीनासे झालां आहां. त्याअर्थी हजरत आदिलशाह बादशाहांनी आम्हाला आपणावर नामजाद करून पाठविलें आहे. हजरत आदिलशाह बादशाहांच्या हुकमावरून सहा प्रकारचें लष्कर आमच्याबरोबर आलें आहे. तें आमच्या मनांत लढाईची इच्छा रुजवीत आहे. आमच्या फौजेंतील मुसेखानांसारखे समशेरबहाद्दर व जावळी काबीज करूं इच्छिणारे सरदार मला लढाईचा फार आग्रह करीत आहेत. तरी आपण सर्व किल्ले व मुलुख आमच्या कबजांत देऊन टाकावा. हजरतींच्या मागणीप्रमाणे ही जावळीहि आमच्या कबजांत देऊन टाकावी, असा आपणास आम्ही हुकूम करतों. "

असें हें खानाचें पत्र महाराजांनी ऐकलें.[१२] खान असें दमदाटीने लिहीत होता. आपण युद्धास तयार नाही, ती इच्छाहि नाही, पण माझी शूर फौज व मुसेखानादि सरदारच मला युद्धासाठी प्रोत्साहन देत आहेत. तरी सर्व स्वराज्यच देऊन टाकून तह करा असा महाराजांस खानाचा 'हुकूम' होता! महाराजांनी खूप बारकाईने व सांगोपांग

खलबत केलें.[१०] आता वकील म्हणून खानाकडे कोणास पाठवावें हा महत्त्वाचा प्रश्न होता. महाराजांनी अगदी अचूक माणूस निवडला. हुशार, धूर्त, विश्वासू, मातबर, अनुभवी, हुन्नरबाज, अगदी जसा असायला हवा तसाच! वकील म्हणजे सभ्य लबाड! किंवा लबाड सभ्य! महाराजांनी निवडलेला वकील सभ्यहि होता अन् लबाडहि होता! पंताजी गोपीनाथ बोकील, हें त्यांचें नांव. गडावरच्या वृद्ध मंडळींपैकी एक खूपच वृद्ध. निदान सत्तरी तर खासच. अति घरोब्यांतले. महाराजांच्या घरचेच. आईसाहेबांच्या बरोबर सोंगट्याचा पट मांडून चौसर खेळण्याचा मायना होता त्यांचा. सर्वजण त्यांना मोठ्या मानाने व प्रेमाने 'काका' म्हणत.[१३] फार पुरातन नोकर. महाराज तर काकांना फार फार मानीत.[१४] पंताजीकाका महाराजांचे चिटणीस होते.[१५] काकांचें आडनांव बोकील. सासवडच्या जवळ हिवरें म्हणून गाव आहे. तेथील हे कुलकर्णी. महाराजांच्या जन्माआधी पंताजीकाका शहाजीराजांच्या पदरीं आले. राजकारणांतली अवघड सोंगटीं काकांवरच सोपवावीं. बरोबर खेळवीत ते.

आणि ठरलें की, पंताजीकाकांनी हेजिबीस खानाकडे जावें. कृष्णाजी भास्कराला काय जाबसाल करायचें तेंहि ठरलें. तो दिवस मावळला.

दुसरा दिवस उजाडला. महाराजांनी कृष्णाजी भास्करला मुलाखतीस बोलावूं पाठविलें. तो आला. खानाने त्याला अगदी बजावून पाठविलें होतें की, 'कित्येक गोष्टी सांगोन सल्लयांत शिवाजीस माझ्या भेटीस आणावें!'

कृष्णाजीपंत महाराजांकडे सदरेवर मुलाखतीस आला. पंताजीकाकाहि होतेच. काकांबरोबर खानासाठी जीं बोलणीं करावयाचीं तीं महाराजांनी केलीं होतीं. आता खानाच्या वकिलालाहि महाराजांनी अत्यंत सचिंतपणें म्हटलें,[१६]

" खानसाहेबांनी माझ्या हातून जिंकले गेलेले गडकोट व मुलुख व जावळी परत मागितली व मला तह करण्याचा हुकूम केला ही खरोखर माझ्यावर दयाच दाखविली आहे! त्यांचें बळ केवढें मोठें! त्यांचा पराक्रम आगीसारखा! त्यांच्यामुळेच पृथ्वीला शोभा आहे! त्यांच्याठायीं कपट मुळींच नाही! परंतु मी मात्र अत्यंत घाबरलों आहें. खानसाहेबांनी मला हुकूम पाठविला आहे की, मीं वाईंत भेटीसाठी यावें. परंतु मला भय वाटतें! म्हणून खानसाहेबांनीच जावळीला यावें! म्हणजे माझें भय नाहीसें होईल व माझें त्यामुळे वैभवहि वाढेल! आपले खानसाहेब मागत आहेत ते सर्व किल्ले आणि ही जावळीसुद्धा मी त्यांच्या स्वाधीन करीन! एरवी त्यांच्याकडे नजर लावून पाहणेंहि मला मुश्कील आहे. पण आता ते जावळींत आल्यास मी निःशंक मनाने ही माझी कट्यार त्यांच्यापुढे ठेवीन.[१६] खानसाहेबांनी अभयाची क्रियाशपथ द्यावी. याजकरिता आमचे हेजीब पंताजी गोपीनाथ यांस तुम्ही आपल्याबरोबर खानसाहेबांकडे घेऊन जावें. त्यांजपाशी खानसाहेबांकडून हस्तपंजराची आण देववावी. खानसाहेबांस जावळीस घेऊन यावें. खानसाहेब म्हणजे आमचे प्रत्यक्ष काकाच आहेत! काकांची भेट घेऊं. आमच्या मनांत कांही कपट नाही.[१०]

कृष्णाजी भास्करानें महाराजांना फार फार आग्रह करून पाहिला की, तुम्ही वाईला चला. पण 'मला खानसाहेबांची भीति वाटते. मीं आजवर फार चुका केल्या. आता खानसाहेबांनी जावळीस येऊन, मला क्षमा करून व मला बोटाला धरून बादशाहाकडे न्यावें. मी सर्व किल्ले स्वाधीन करतों. जावळीहि देतों. खानसाहेब आम्हाला वडिलांसारखे आहेत. त्यांनीच येथे यावें' असा नेटाचा आग्रह महाराजांनी धरला. तेव्हा महाराजांचें बोलणें खानाच्या वकिलाला इतकें बरोबर पटलें की, आपण हें सर्व खानसाहेबास सांगतों, असें त्याने कबूल केलें![१०]

महाराजांनी मग कृष्णाजी भास्कराला मानाची लुगडी दिली.[१७] लुगडी म्हणजे मानाचीं वस्त्रें. साडीचोळी नव्हे ! तसेंच पंताजीकाकांच्या बरोबर खानासाठीहि लुगडी देऊन महाराजांनी काकांची रवानगी कृष्णाजीपंताबरोबर केली. खानाने मात्र महाराजांना मानाची भेट म्हणून साधा शेलासुद्धा पाठविला नव्हता.

कृष्णाजी भास्कराबरोबर निघण्याची पंताजीकाकांनी तयारी केली.

निघण्यापूर्वी महाराजांनी पंताजीकाकांना एकांतांत सांगितलें,[१०]

"काका, खानाची भेट घेऊन बोलीचाली करणें. खानास क्रियाशपथ मागणें. खान तुमच्यापाशी शपथ मागेल तरी देणें. अनुमान न करणें ! हरप्रकारें खानास जावळीस घेऊन येणें. याखेरीज खानाच्या सैन्यामध्ये युक्तिप्रयुक्तीने ज्या रीतीने शोध मनास आणावयाचा त्या रीतीने आणणें. खानाचें चित्त आमच्या बरियावरी किंवा. वाईटावरी आहे, याचा शोध करणें."

काका इतके वस्ताद होते की, त्यांनी याहीपेक्षा जास्त सावधता ठेवलेली होती. प्रतापगडावरून काका व कृष्णाजीपंत वाईस जाण्यास निघाले.

पसरणीच्या उंच घाटावरून वाईंत पसरलेला खानाच्या छावणीचा पसारा दिसत होता. हिरव्या झाडींत पांढऱ्या तंबूराहुट्या पावसाळी छत्र्यांप्रमाणे दिसत होत्या. एका बाजूला पांडवगडाची, दुसऱ्या बाजूला सोनजाईची व उगवतीकडे चंदनगडाची डोंगरओळ उभी होती. मधून कृष्णाबाई वळसे घेत घेत वाहात होती. कृष्णेच्या हिरव्या तीरावर वसलेली वाई एरवी मोठी रम्य दिसे. हिरवी साडी नेसून आणि कृष्णेच्या प्रवाहांत पाय सोडून स्वतःचें हसरें प्रतिबिंब डोलवीत बसणारी मराठमोळी मुलगीच जशी. पण खानाच्या तंबूंच्या दाटींत वाईची देवळें-राउळें लुप्त झालीं होतीं. वाईचें अपहरण झालें होतें.

पंताजीकाका वाईच्या खोऱ्यांत उतरूं लागले. त्यांच्या डोक्यांत हजार तऱ्हेचे विचार चालू होते. प्रत्येक क्षणागणिक खानाची छावणी जवळ जवळ येत होती.

कृष्णाजी भास्कर व काका वाईत पोहोचले. आणि छावणींत प्रवेशाले. काकांची बारीक नजर छावणीवर फिरूं लागली. छावणी गजबजून गेली होती. तंबूंच्या तणाव्याच्या दोऱ्या इतस्ततः कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे पसरल्या होत्या. केवढें मोठें जाळें खानानें पसरलें होतें.[1] असंख्य हत्ती सोंडा झुलवीत होते. लहान मोठ्या कितीतरी तोफा जांभया देत उभ्या होत्या. सामानाचे उंट वहातूक करीत होते. हजारो घोडे ठाणबंद होते. शिवाय अनेक प्रकारचीं कामें करणारे असंख्य नोकर छावणींत वावरत होते. शस्त्रांची रेलचेल होती. बंदुका, भाले, चिलखतें, ढाली, तलवारी, दस्ते वगैरे साहित्य अगणित होतें.

छावणीच्या एका भागांत बाजार भरगच्च भरलेला होता. खाद्य-पेयादि पदार्थांपासून सराफी मालापर्यंत सर्वच वस्तूंची दाटी होती. शिवाजीचा पराभव खास होणार ही खात्री ठेवून विजापूर शहरांतील अनेक जवाहिरे, नगीनेवाले, खंबायती मोतीवाले आपल्या बरोबर हिऱ्या-मोत्यांच्या संदुका घेऊन ख़ानाबरोबर आलेले होते. छावणीचा मुक्काम पडेल तिथे नवी खरेदी व विक्री करतां येईल या उद्देशाने ते भरगच्च माल बरोबर घेऊन आले होते.

पंताजीकाका बारकाईने सारी छावणी हेरीत होते. एकूण खानाची छावणी अत्यंत बलाढ्य, अत्यंत समृद्ध, अत्यंत श्रीमंत, अत्यंत बेदरकार आणि अत्यंत हिम्मतबाज हुन्नरवंत होती.

आणि तिकडे प्रतापगडावरची फौज ? अगदीच तुटपुंजी व गरीब. लंगोटवाली ! एवढा बादशाही थाट, एवढे हत्ती, तोफा, दारूगोळा, खजिना, उंट, खेचरें, बैल, एवढी अमाप शस्त्रसामग्री, एवढा ताकदीचा

धिप्पाड म्होरक्या आणि एवढी मग्रुरी? छे: ! यांतलें स्वराज्याच्या वाट्याला कांहीच आलें नव्हतें ! खानाची ती अफाट व जय्यत तयारी पाहून काकांच्या मनांत काळजी शहारून गेली. आता कसें होणार आपल्या स्वराज्याचें ?

योजलेल्या ठिकाणीं पंताजीकाका खानाच्या वकिलाबरोबर जाऊन पोहोचले.

खान आपल्या व महाराजांच्याहि वकिलाची भेट घ्यावयास आतुरला होता. काय म्हणतो हा शिवाजी ! खानाचा वकील कृष्णाजीपंत खानाच्या भेटीस गेला व त्याने सारी कच्ची हकीकत खानाला निवेदिली. शिवाजी किती घाबरला आहे, किती पस्तावला आहे आणि लढाईचें नांवहि न काढतां कसा दीनवाणा होऊन दया भाकीत आहे हें कृष्णाजीपंताने खानाला सांगितलें. आपली फौज वाईंत आल्यापासून तर तो प्रतापगडावर दडूनच बसला आहे ! आपणच शिवाजीची घमेंड आणि झोप उडविली ! आता तो मुकाट्याने सर्व गडकोट व मुलुख, जावळीसुद्धा आपल्या स्वाधीन करण्यास तयार आहे. हें खानाने ऐकलें आणि तो खूष झाला ! खानाने शिवाजीराजाच्या वकिलाला मुलाखतीस घेऊन येण्यास कृष्णाजीपंताला फर्मावलें.[१८]

कृष्णाजी भास्कर पंताजीकाकांच्या भेटीस आला व म्हणाला की, खानसाहेबांनी तुम्हास बोलाविलें आहे. चलावें. पंताजीकाका उठले. महाराजांनी खानासाठी दिलेलीं वस्त्रें हुजऱ्याहातीं बरोबर घेऊन काका निघाले. आता खानाची भेट !

काका नम्रपणें खानापुढे मुजरे करीत गेले. तो धिप्पाड काळपुरुष सदरेवर बसलेला होता. काकांनी वस्त्रें खानाला नजर केलीं. आणि फक्त खान, कृष्णाजी भास्कर व पंताजीकाका यांचीं एकांतांत बोलणीं सुरू झालीं.[१८] काकांनी अति आदबीने पत्राची थैली खानास सादर केली.

महाराजांनी खानास लिहिलेलें पत्र होतें तें. त्याचा थोडक्यांत सारांश असा[१९] : "....आपलें आमचें सख्य असावें. मजकडून घडलेल्या अपराधांची क्षमा असावी. यापुढे मी हजरत बादशाहांची चाकरी करीन. कधीहि हुकमाबाहेर वर्तावे करणार नाही..... "

कृष्णाजी भास्कराने पत्र वाचून पुरें केलें. खानाच्या चेहऱ्यावर गुलाबी हसूं खेळत होतें. काका नम्रतेने म्हणाले,[१८]

" शिवाजीराजे आपणापासून वेगळे नाहीत. त्यांना जसे महाराज शहाजीराजे तसेच आपण.[१८] आपण भेटीची तयारी दाखवून केवळ किल्ले, कोट व मुलुख शिवाजीराजांनी आपल्या स्वाधीन करावा एवढीच साधी आज्ञा राजांना करून, राजांवर फार मोठी दयाच केली आहे. आपलें शौर्य आणि दरारा राजे जाणून आहेत. आपण कर्नाटकांतले राजे युद्धांत जिंकले. आपली ताकद बिनजोड आहे. आपली बहादुरी केवळ आगीप्रमाणे आहे. आपल्यामुळेच दुनियेला शोभा आहे. राजांची खात्री झालेली आहे की, आपल्या ठायीं कपट आजिबात नाही! आपल्या पराक्रमावाचून आदिलशाही फौज केवळ कस्पटासारखीच भासते! शिवाजीराजांची अगदी नम्र विनंती आहे की, आपण जावळीस यावें! राजे आपणास फार घाबरतात! आपण जावळीस येणेंच जास्त योग्य होईल. कारण राजांनी जी आपली भीति घेतली आहे, ती आपण तेथे आल्याने नष्ट होईल! आपल्या येण्यानेच राजांचें वैभव वाढणार आहे! आपण मागत आहां ते किल्ले, मुलुख व जावळीहि आपल्या कबजांत राजे देतील. राजांची एरवी आपल्या नजरेला नजर देण्याचीहि हिम्मत नाही. पण आपण जावळींत आल्यावर राजे आपल्यापुढे स्वतःची कट्यार काढून ठेवतील. जावळीची थंडगार जंगलशोभा आपण आपल्या सैन्यासह येऊन पाहावी व अनुभवावी अशी राजांची फार इच्छा आहे."[१६]

काकांचें हें बोलणें ऐकून खान अगदी निहायत खूष झाला. आपली मोहीम फत्ते झाली अन् जावळी आपल्या कबजांत आली असें त्याला वाटलें! पण जावळीच्या त्या भयंकर दरींत जायचें त्याला कसेंसेंच वाटलें. त्याला माहीत होतें तें अरण्य. त्याचा आग्रह होता शिवाजीनेच वाईंत यावें! शिवाजीचें कमालीचें कल्याण होईल! महाराजांचा हट्ट होता की, तुझेंच चांगलें कल्याण करतों! तूंच इथें ये!!

खानाने विचार केला. शिवाजी आपल्याला फौजेसह बोलावतोय. घाबरट आहे बेटा! माझी ख्याति ऐकूनच तो मगलूब झाला आहे. समजा, जरी आपण जावळींत गेलों, तरी आपण फौजेसहच जाणार आहोंत. काय करील शिवाजी आपलें वाकडें? मी त्याला मुर्गाळून काढीन! त्याचें तरी बळ असें कितीसें आहे? माझी समशेर, माझी फौज, माझ्या तोफा चवताळून उठल्या तर शिवाजी कुठें उरेल? बस्स्, जावळीला जायचेंच! आपला विश्वासू वकील कृष्णाजी भास्कर पंडित सांगतोय. शिवाय प्रतापराव मोरे, खवासखान आणि अंकुशखानासारखे बहादर म्हणतातच आहेत की, शिवाजी असेल तेथे जाऊन जंग झुंजावें म्हणून. मग काय हरकत आहे जावळींत जायला?[१८]

खान कलला! एकदा कलल्यावर कलंडायला वेळ लागत नाही! जरूर तेवढी घमेंड, उतावळेपणा व अविचार खानापाशी भरपूर होता. याच भांडवलावर त्याने खूप विचार केला. अर्थात् नेमका तो अविचारच होता. सबंध स्वराज्यच आपल्या स्वाधीन करून शिवाजी भेटायला यायला तयार आहे. फक्त त्याचें म्हणणें एवढेंच की, प्रतापगडाखाली भेट व्हावी. गेलों! काय होईल? शिवाजीची काय हिम्मत आहे ऐनवेळीं लढायची! मी न गेलों तर शिवाजी किल्ल्यांत दडून बसेल. या किल्ल्यावरून त्या किल्ल्यावर शिवाजी पळत सुटेल. मग सापडायचा

कसा ? तें मग फार जिकिरीचें होईल. हा मुलुख डोंगराळ आहे. आपण फौजेसह आहोंत. जर तो दगलबाज दिल्या जबानीला जागला नाही, तर युद्ध करायला आपली अफाट फौज आहेच तयार ! कबूल केल्या-प्रमाणे एकदा शिवाजी भेटीला आला की, मग तो माझ्या तडाख्यांतून सुटतच नाही ![१८] खानाने असा विचार केला.

शिवाय पंताजीकाका मोठया आर्जवाने त्याला म्हणतात,[१८]

" आपण शंका न धरितां जावळीस यावें. राजेहि निर्भय होऊन जावळीस येतील. त्यांची आपली मुलाजमत होईल. आपण सांगाल तें राजे ऐकतील. राजांची विनंतीच आहे की,[१७] आम्हाला वाईला कशाला बोलावितां ? सारी दौलत आपल्या हवालीं करतों. आपण बुध सांगाल तसेंच वागूं ! "

यावर खान म्हणतो,[१८]

" राजा काफर हरामज़ादा। जावली कबीह जगह है। वहाँ मुलाकात के लिये वह पैगाम भेजता है। ठीक है। लेकिन तुम बम्मन हो। यदि तुम ज़िम्मेदार बनकर यक़ीन दिलाते हो, तो शिवाजी की मुलाकात के लिये मैं जावली आने को तैयार हूँ। क्यों कि शिवाजी हरामज़ादा है। उसका यक़ीन नहीं। "

महाराजांचा असल्या कडू शब्दांत खानाने केलेला उद्धार ऐकून घेऊन पंताजींनी अगदी बेधडक शपथ घेतली ! आणि वर म्हणाले,[१८]

" आपण संदेह न धरूणें. भेटीस यावयाचें करणें. राजे आपल्या वाइटावरी नाहीत. "

अन् खानाने कबूल केलें ! जावळीस सैन्यासह यावयाचें कबूल केलें ! खानाने सैन्यासह व सर्व युद्धसाहित्यासह यावें अशी महाराजांचीच कळकळीची इच्छा होती ! कारण.... ? एकाच वेळीं हा

सगळा डाव साधावा म्हणून ! एकांत एक कार्ये होऊन जातात ! काकांनी निम्मा डाव येथेच जिंकला !

पंताजींना खानाने आपल्या मुक्कामावर जाण्यास निरोप दिला. पंताजीकाका मुक्कामावर आले. ते लगेच प्रतापगडाकडे निघाले नाहीत. मुद्दाम छावणींत राहिले. गुप्त बातम्या काय काय मिळतात तें पाहण्याकरिता थांबले. महाराजांचे हेर खानाची छावणी हेरीत होतेच.[२०]

काकांनी वकिली थाटांत अनेकांच्या गोड गोड गाठीभेटी घेतल्या. अनेक सरदार खानाच्या छावणींत होते. प्रतापगडावरून काकांनी येतांना त्यांच्यासाठी प्रेमाच्या वस्तु, नजराणे, आणि पैसा आपल्या पडशींत आणलाच होता. अगदी बेमालुमपणें काकांनी कांही नेमक्या सरदार, मुत्सद्दी मंडळींची भेट घेऊन, प्रेमाच्या भेटी देऊन गुप्त बातमी पोखरून काढली !

पेरूंची अन् फणसाची चोरी पचायला कठीण ! कितीहि लपवा, त्यांचा वास बोंबलून उठणारच ! जवानीची मस्ती अन् म्हातारपणचा खोकला कधी दाबून दबेल काय? कधी तरी उफाळून येणारच ! दारूबाजाच्या तोंडाची अन् बोकडाच्या अंगाची दुर्गंधी कधी झाकेल काय? बुरख्यांत झाकले तरी भपकारा यायचाच ! गजकर्णाची आणि राजकारणाची स्थितिहि अशीच. गुप्त राखणें फार कठीण. कधीतरी खाज सुटायचीच !

खानाच्या गुप्त राजकारणाचा सुगावा काकांना लागलाच ! काकांना कळलें की,[२१]

‘ खानाचें मत ठाम आहे की, शिवाजी हरामजादा आहे ! याशीं युद्ध करितां सापडणार नाही. याजकरिता राजकारण लावूनं भेटी घ्यावी आणि भेटीचे समयीं धरावा ! खानाची ऐसी तजवीज आहे ! ’

हें ऐकून काकांची छाती धडधडूं लागली. एकूण दगा करावा हाच

खानाचा उद्देश नक्की आहे. मग मात्र काकांना स्वस्थ बसवेना. त्यांनी ती रात्र छावणींत काढली व दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते प्रतापगडाकडे जाण्यास निघाले. निघण्यापूर्वी त्यांनी खानाची भेट घेतली व प्रताप-गडावर जाण्यास हुकूम मागितला. यावेळीं मात्र खानाने काकांचा मान सन्मान केला व त्यांस निरोप दिला.[२१]

एक गोष्ट ठरली. खान मुलाखतीसाठी प्रतापगडाखाली नक्की येणार! आनंद आणि काळजी उराशीं धरून पंताजी गोपीनाथ बोकिलांनी गडाचा रस्ता धरला.

* * *

**आधारः**—(१) शिभा २३।११ व १२; राजखंड २०।४७. (२) शिचसा ५।९२८. (३) पसासं ८००. (४) शिभा १०।४२ व ४३. (५) F. B. Shivaji Page 211. (६) जेधेशका व करीणा. (७) करीणा. (८) पसासं ७८२ व ९८. (९) सभासद पृ. १३. (१०) सभासद पृ. १६. (११) शिभा १८।४७ ते ६३. (१२) शिभा १८।६४. (१३) पोवाडे पृ. ३१; अत्रभावे टीप २२. (१४) पसासं २६६३. (१५) सपत्रें पृ. ११४. (१६) शिभा १९।३ ते १०. (१७) पोवाडा पृ. १३. (१८) सभासद पृ. १७. (१९) आघइ पृ. २००. (२०) शिभा १९।१ व २. (२१) सभासद पृ. १७ व १८. (२२) जेधेशका.

# १० : प्रतापगड



खानानें जावळीच्या दरींत जाण्याचें शिवाजीच्या वकिलापाशी कबूल केलें आहे, हें खानाच्या सर्व सरदारांना कळलेंच होतें. त्यांतील कांही सरदार अत्यंत दूरदर्शी व बादशाही हिताची खरोखरच निष्ठा-पूर्वक काळजी वाहणारे होते. कांही सरदार मात्र शुद्ध नंदीबैल होते! पंताजी गोपीनाथांनी गोड गोड बोलून त्यांच्याकडून खानाचा कपटी उद्देश केव्हाच माहीत करून घेतला होता! कांही सरदार मोठे उत्साही पीर होते. जावळींत जाऊन शिवाजीला जिंकलेंच पाहिजे, अशी त्यांना घाई झाली होती. पण कांही शहाणे दूरदर्शी सरदार मात्र खानाला अगदी स्पष्टपणें म्हणाले,[1]

"गुस्ताख़ी मुआफ हो हुजूर। आपके इरादेपर आप शौक से अमल कर सकते हैं। लेकिन इसमें सरासर धोखा है। शिवाजीने आजतक किसीके आगे सर नहीं झुकाया। शिवाजी बहुत चालाक है, बहादुर है, सूरमा है। उसके मनमें कोई भयंकर राज़ छिपा है। इस लिये यदि आज वह हुजूर को जावली में तशरीफ लाने का पैग़ाम भेज रहा है तो इसका साफ मतलब यह है कि उसका इरादा कुछ और है। जावली का मुल्क ख़तरनाक है। हाथी घुड़सवार और फौज को साथ लेजाना मुसबित मोल लेना है। वह मुल्क पहाडों, जंगलोंसे भरा हुआ है। इस ख़तरे को आप जान बूजकर मोल न लें। इसमें सरासर धोखा है।"

यावर रागाने लाल होऊन व द्वेषाने अंध होऊन गेलेला तो खान म्हणाला,[1]

" हाँ, ठीक ही है कि शिवाजी की बहादुरी की तुम तारीफ करो। अफजलखाँ कीं ताकतको तुमने अभी पहचाना भी कहाँ? मेरे दौडते घोडोंकी टापों के नीचे कर्नाटक की फौजने आखिरी साँसत लेली। काफरों के बूतों और मंदिरों को मैंनेही मिट्टी मे मिलाया है। मेरा गुस्सा देखकर शैतान भी काँप उठता है, फिर शिवाजी तो किस झाड़की पत्ती! जावली का जंगल तो मेरे रुख को देखतेही जलकर ख़ाक हो जाएगा। "

खानाची वृत्ति खरोखरच राक्षसी. तसेंच त्याचें बळहि. त्याला गर्व होता त्याच्या ताकदीचाच. खानानें ठरविलें. जावळीला जायचेंच. आणि जावळीकडे कूच करण्यासाठी तयारीचा हुकूम त्याने छावणीस सोडला.

महाराज गडावर वाट पाहात होते पंताजीकाकांची. काका अफजलखानाचा दमदाटीचा निरोप उरीं घेऊन निघाले व गडावर येऊन पोहोचले. महाराजांनी आतुरतेने काकांची भेट घेतली. काकांनी सर्व हकीकत सांगितली. खान जावळींत यावयास तयार झाला. ही गोष्ट इतकी उत्तम झाली की, निम्मी बाजी आत्ताच सर झाली, असें महाराजांना वाटलें. खानाशीं झालेलीं बोलणीं व छावणीची सर्व माहिती काकांनी सांगितली.

त्या रात्रीं महाराजांनी एकट्या काकांना अगदी एकांतांत बोलावून घेतलें. महाराजांनी, खानासंबंधी गुप्त हकीकत काय काय कळली ती सांगा म्हणून म्हटलें.[४] तेव्हा काका ती सारी गुप्त हकीकत सांगू लागले,[४]

" खानाच्या मनांत दुष्ट बुद्धि आहे. सल्ला करून महाराजांस भेटीस आणून दगा करून, कैद करून विजापुरास धरून न्यावें ऐसें आहे!"

खानाचा हेतु उघड उघड दगा करण्याचा ठाम कळला. महाराजहि मनाशीं हेंच धरून चालले होते. कारण याच खानाने कर्नाटकांत

शिरेपट्टणच्या कस्तुरीरंग नांवाच्या राजाला तहासाठी किल्ल्यांतून बाहेर बोलावलें. त्याला शपथपूर्वक विश्वास दिला. कस्तुरीरंग राजा खानावर विश्वासून भेटीस आल्यानंतर खानानें भेटींत दगाबाजी करून त्याचा खून पाडला![५] खानाचा हा इतिहास अगदी ताजा ताजा होता. पण ही खानाची राक्षसी वृत्ति पाहून महाराज जास्तच गंभीर झाले.

त्यावर काका म्हणतात,[४]

" महाराज मी खानास जावळीस घेऊन येतों. तुम्ही हिंमत धरून एकांगें करून खानास मारणें! त्याचें सारें लष्कर साफ लुटणें! राज्य सर्व आपलें करणें!"

म्हाताऱ्या पंताजींचा हा पीळ होता! ही इच्छा होती. हा सल्ला होता. महाराजांना तो पटला.[४] अत्यंत धाडसाची व जिवावरची ही गोष्ट होती. सोपें नव्हतें. तरीहि काका म्हणाले की, हिंमत धरून एकांगी मारा! खरोखर हा सल्लाहि हिंमतीचाच!

महाराजांनी काकांना पुन्हा खानाकडे पाठवायचें ठरविलें. पुन्हा एकदा खानास जावळीस येण्याबद्दल आग्रह करायचा. आपल्याला दगाच करायचा असा निर्धार करून आलेल्या ह्या देवद्वेष्ट्याला जावळीच्या दरींत कोंडून फौजेसह बुडवावयाचाच असा निर्धार महाराजांनी केला.

गडावरती रोजच खलबतें चाललीं होतीं. तान्हाजी, कान्होजी, येसाजी, मोरोपंत, शामराजपंत वगैरे सर्व मंडळी महाराजांभवती बसून आलेल्या या अरिष्टावर विचार करीत होती. गडावर दिवसेंदिवस अत्यंत गंभीर वातावरण पसरत होतें. तिकडे आईसाहेब राजगडावर चिंता करीत होत्या. त्यांना महाराजांनी प्रतापगडावर मुद्दाम आणलें नव्हतें. कारण प्रत्यक्ष खानाशीं होणारा डाव त्यांच्या डोळ्यांपुढे होऊं लागला

तर त्यांच्या मनावर फार ताण पडेल. पण राजगडावर राहून तरी कुठ कमी ताण पडत होता?

पुन्हा काका वाईस निघाले. प्रतापगड ते वाई म्हणजे सोळा कोसांचें अंतर. वाटा ह्या अशा. अर्ध्या कोसाचा प्रतापगड उतरायचा, पुन्हा दीड कोसाचा महाबळेश्वराचा डोंगर चढायचा, पुन्हा दीड कोसाचा पसरणीघाट उतरायचा. थोड का होते श्रम हे? पण थकले वाकलेले काका थोडें घोड्यावरून, पालखींतून आणि पायींहि हें अंतर तोडीत होते. एकदा वारी झाली. आता दुसऱ्यांदा निघाले होते. निघण्यापूर्वी महाराजांनी काकांना म्हटलें,[४]

"काका, खानास सांगणें की, राजा बहुत भितो. वाईस तुमच्या भेटीस यावयास धीर पुरत नाही. खानसाहेब वडील आहेत. जावळीस येऊन भेट देतात तरी भेटीस येतों. आपण यास हातीं धरून धीर भरंवसा देऊन, बादशाहाचे मुलाजमतीस नेऊन ऊर्जित करतील तरी थोरपण आहे, ऐसे कित्येक मजकूर सांगून खानास जावळीस घेऊन येणें."

काका निघाले. वाईंत आले. खान तर उतावळ्या नवऱ्याच्या वर घाई करीत होता जावळीस निघण्याची. तरी पण पंताजी म्हणाले,[६]

"आमचा राजा कचदिल आहे! येथें वाईंत भेटीस येतां शंका धरितो. आपणच जावलीस चलणें. तेथें भेटीस येतील. दिलासा करून बरोबर राजास घेऊन जाणें."

तेव्हा खान म्हणाला,[७]

"अरे भाई शिवाजी डरता क्यों है। मैं तुझे सलाह दे रहा हूं। जो किले तेरे हैं वह तो तुझे मिलेंगे ही। और उनके साथ और ज्यादा दौलत भी। शहाजी की कसम खाकर मैं यह सब कहता हूं।"

आणि खानाचें लष्कर हत्ती, उंट, घोडे, तोफा व बैलांसह जावळी-

कडे चालूं लागलें. आता एवढा तो दीड कोसाचा पर्वत चढून व माथ्यावरचें पांच कोसांचें गहन अरण्य पार करून व पुन्हा दीड कोसाचा अति अवघड असा रडतोंडीचा घाट उतरून हीं जनावरें जाणार होतीं कशीं! चैनींत आयुष्य घालविलेली ही विजापुरी फौज त्या अवजड तोफा, तंबू, सामानांचे पेटारे, धान्य, वैरण घेऊन, या डोंगरांतून जावळीच्या खोल पाताळदरींत जाणार तरी कशी? हा अजस्र सह्यादि ओलांडायचा म्हणजे काय थट्टा आहे? खानाला काय ही बुद्धि झाली! पूर्वी महंमद तुघ्लख नांवाच्या एका वेड्या पिराने हिमालय ओलांडून चीनवर स्वारी करायचें ठरविलें होतें. सारी फौज त्या बर्फाच्या ढिगाऱ्यांत तो गमावून बसला. हिमालयावरील अजिंक्य शिवशक्तीने त्याचा पराभव केला. आता अफजलखान सह्याद्रीची एक प्रचंड रांग ओलांडून प्रतापगडावरची शिवशक्ति जिंकायला चालला होता. धन्य त्याच्या मुत्सद्देगिरीची! आणि त्याचे सल्लागार कोण? प्रतापराव मोरे, खवासखान आणि अंकुशखान! अरण्यपंडित!

फौज मुंगीच्या पावलांनी महाबळेश्वराकडे वाटचाल करूं लागली. फौजेंतल्या बातम्या हेरांमार्फत गडावर रोज खडान् खडा जात होत्या. पंताजीकाकाहि गडावर जाऊन पोहोचले होते.

महाराजांनी गडाचा पक्का बंदोबस्त ठेवलेला होता. तयारी आणि चिंता रोज जास्त जास्त वाढत होती.

खानाचे हत्ती, उंट वगैरे प्राणी व तोफा वगैरे साहित्य त्या पर्वतावर चढवतांना काय हाल झाले, तें सांगणें अशक्य आहे. सोंडांनी झाडांना विळखे घालून त्यांचा आधार घेत हत्ती वर चढत होते. वारंवार खरचटून कातडी निबर झालेल्या हत्तींचे गुडघेहि रक्तबंबाळ होत होते. मेटाकुटीने ते वर चढत होते. घोड्यांचे व इतर जनावरांचेहि तेच हाल. हत्तींच्या पायांनीं निसटणाऱ्या धोंड्यांखाली, खालून वर चढणारे

लोक सापडून मरत होते. झाडांत अडकून खानाचीं निशाणें व छत्र्या पार फाटून गेल्या. अनेक लोक कड्यावरून कोसळून मेले. जनावरें मोडलीं. अतोनात श्रम पडले. सह्याद्रीच्या शिखरावर गेल्यावर त्यांना स्वर्गांत गेल्यासारखें वाटलें. आता पांच कोसांचें वाटा नसलेलें जंगल, मग फक्त दीड कोस घसरगुंडीसारखा उतार अन् मग जावळीची दरी. कमालीच्या यातना सोशीत, धडपडत, कोलमडत अखेर सारा हा पसारा जावळींत पोहोचला[८]. तें जंगल फौजेने गजबजून गेलें. झाडावर पाखरूं बसेना.

जावळीपासून प्रतापगडाचा पायथा दीड कोस होता. जावळी सर्व बाजूंनी उंच उंच पर्वतांनी व जंगलाने वेढलेली होती. तेथे अफजलखान येऊन पोहोचला.

गडावरचे सर्वच लोक चिंतामग्न होते. त्यांची झोप उडाली होती. जो तो डोळ्यांत तेल घालून प्रत्येक क्षण काटीत होता. या खानाने सर्वांचें चित्त बेचैन करून टाकलें होतें.

खानाचा तळ कोयनेच्या खोऱ्यांत पडला.[१] त्या भयंकर निबिड अरण्याचें व पर्वतमय प्रदेशाचें किती वर्णन करावें? त्या अरण्यांत खानाच्या हजारो सैनिकांनाहि भय वाटूं लागलें. पण खानाला मात्र अजिबात भय वाटलें नाही. तो मनांत म्हणाला[९] :

"बस अब जावली का मुल्क मेरा ही है।"

जंगलांत तंबू ठोकण्यासाठी जरूर तेवढी जागा साफ करून उंच व भव्य तंबू उभारण्यांत आले. साखळदंडांनी हत्ती ठाणबंद करण्यांत आले. जमिनींत मेखा ठोकून घोड्यांच्या रांगा बांधण्यांत आल्या. उंटांचें तांडेहि बांधण्यांत आले. सैनिकांच्या हालचालींनी व इकडे तिकडे भटकण्यांनीं तें अरण्य गजबजून गेलें. अफाट जंगलाच्या मानाने तें सैन्य चिमूटभर वाटत होतें. झाडींत तें पार झाकून गेलें होतें.[१०]

महाराजांनी गडावर सर्व खाशां खाशा मंडळींची सदर भरविली. आपण खानाच्या लष्करांत जाऊन खानाला भेटणें म्हणजे मरणच, हें नक्की होतें. म्हणून खानालाच प्रतापगडाच्या एका सोंडेवर भेटायला बोलवायचें आणि त्यानें कसें यावयाचें....म्हणजे कसें आलें पाहिजे.... .......याचा मसुदा महाराजांनीच तयार केला! सर्व तपशील अत्यंत बारकाईने ठरवून महाराजांनी पंताजीकाकांना खानाकडे बोलणीं करण्याकरिता पाठवावयाचें ठरविलें. काकांनी व हेरांनी यापूर्वीच महाराजांना एक अत्यंत मौल्यवान् माहिती पुरविली होती. खानाच्या छावणींत हिऱ्या-मोत्याचे व्यापारीहि मालासह विजापुराहून आलेले असून खूप मोठें घबाड त्यांच्यापाशी आहे, ही ती मौल्यवान् माहिती! ही माहिती समजल्यापासून महाराज अगदी बेचैन झाले! खानासारखा पितृतुल्य महापुरुष आपल्या भेटीस येणार! शिवाय अंकुशखान, मुसेखान, अंबरखान, याकूतखान व मंबाजीराजे भोसल्यांसारखे प्रत्यक्ष काका आपल्या मुलखांत आले. आता त्यांचा मानसन्मान कसा करावा? तेव्हा महाराजांनी ठरविलें की, हे हिरे-मोतीवाले अनायासें खानाबरोबर आलेले आहेतच. त्यांनाच गडावर बोलावून घ्यावें. खानाला सांगितलें म्हणजे खान देईल पाठवून सर्वांना आपल्याकडे. त्यांचा सगळा माल एका मुठीने एकदमच खरेदी करूं म्हणजे झालें![११]

आणि पंताजी गोपीनाथ गडावरून खानाकडे निघाले. खानाच्या छावणींत आले. त्याला भेटले. महाराज किती घाबरलेले आहेत व आपणाबद्दल त्यांना केवढा आदर व धाक वाटतो याचें पुन्हा एकदा पुराण त्यांनी खानाला ऐकवलें. खान फुशारून जात होता. अन् काकांनी मुद्द्याला हात घातला. ते म्हणाले की, राजे आपल्या भेटीस येथे यावयास घाबरतात! राजांची विनंती अशी आहे की, आपणच गडाजवळ एकट्याने यावें आणि राजांना भेटावें!

एकट्याने? खान बिचकलाच. पण काकांनी महाराजांचें सगळें म्हणणें तपशीलवार सांगितलें. भेटीच्या योजनेचा तपशील पुढीलप्रमाणे सांगितला.[१२]

'आपलें सैन्य आहे तसेंच छावणींत ठेवावें. एकट्या खानसाहेबांनी सशस्त्र निघावें व पालखींत बसून भेटीच्या जागीं यावें. त्यांनी आपल्याबरोबर दोन तीनच सेवक घ्यावेत. खानसाहेबांनी भेटीच्या शामियान्यांत येऊन थांबावें. खानसाहेबांनी आपल्याबरोबर दहा शूर नेकजात व सुसज्ज हशम आपल्या रक्षणासाठी आणावेत. परंतु ते एका बाणाच्या टप्प्यावर ठेवावेत. शिवाजीराजांनी प्रतापगडावरून सशस्त्र यावें व खानसाहेबांची भेट घेऊन आदरसत्कार करावा व दोघांनीहि तेथेच बोलणीं करावीं. शिवाजीराजांनीहि आपल्याबरोबर दहा शूर नेकजात व सुसज्ज हशम आणावेत व एका बाणाच्या टप्प्यावर मागे ठेवावेत.'

खानाने ही योजना एकदम मंजूर केली. हा भेटीचा तपशील खानाच्या वकिलाने आधी मंजूर केला होता.[१३] खान आता अगदी आतुर झाला होता. त्याला शिवाजी हवा होता. काकांनी तें ओळखलें होतें. काकांची नजर तीक्ष्ण, कान तिखट, बुद्धि भेदक आणि बोलणें खडीसाखरेसारखें गोड होतें. काकांनी खानाला अगदी हवें तसें डोलवलें.

काकांच्या डोक्यांत हिरे–मोतीवाल्यांची आठवण होतीच! ते खानाला आदबीने म्हणाले की, आपला व आपल्याबरोबर आलेल्या शूर सरदारांचा मानमरातब कसा करावा हें आमच्या राजांना समजेनासें झालें आहे! ते तर बावरून गेले आहेत! तरी पण आपल्या छावणींत असलेल्या सराफी व्यापाऱ्यांना आपण प्रतापगडावर पाठवून द्यावें अशी राजांची आपणास विनंती आहे. राजे हिरेमोती खरेदी करूं इच्छितात!

खानाला पटलें. आवडलें. त्याने लगेच हिरेमोतीवाल्यांना तश्रीफ

फर्मावली. व्यापारी खानापुढे हाजीर झाले. खानाने त्यांना हुकूम केला की, तुमचा सर्व माल घेऊन प्रतापगडावर शिवाजीराजाकडे जा! शिवाजी कांही खरेदी करील![१४] हें ऐकून व्यापारी खूष झाले. कारण त्यांचा माल आता एकदमच खपणार होता!! खानहि खूष झाला होता. कारण आपल्याला भ्यालेला शिवाजी आपली बडदास्त केवढी ठेवतोय हेंहि त्याला कळून चुकलें.

हिऱ्यामोत्यांनी गच्च भरलेल्या संदुका घेऊन व्यापारी पंताजींच्या मागोमाग निघाले. गडावर आले. गडावरचे लोक टकमका पाहूं लागले की, हे नवे पाहुणे कोण आले? ते व्यापारी महाराजांपुढे मालासह हाजीर झाले. तो देदीप्यमान माल पाहून महाराज आनंदून हसले! महाराजांनी सर्व माल ताब्यांत घेतला व व्यापाऱ्यांनाहि गडावरच ठेवून घेतलें! मालाची किंमत खानसाहेबांच्या भेटीनंतर द्यावयाची असें ठरलें! त्या भोळसट व्यापाऱ्यांना तें खरें वाटलें! खानाच्या छावणींतला मौल्यवान् ठेवा काकांनी बिनबोभाट आणला! खानाचेंहि महाराजांवर केवढें प्रेम! त्याने हा ठेवा महाराजांकडे घरपोच रवाना केला![१०]

खानाची व महाराजांची भेट जेथे व्हावयाची होती ती जागा गडाच्या अगदी पायथ्याशीं नव्हती. गडाचा निम्मा डोंगर चढून गेल्यावर डाव्या अंगाला डोंगराची एक सोंड पसरत गेलेली होती, तेथील मध्यावरची झाडी तोडून काढून जागा साफ करविली होती. तेथे अत्यंत मौल्यवान् सामान वापरून एक अत्यंत सुंदर शामियाना उभा करण्याचें काम महाराजांनी सुरू केलें होतें. ही भेटीची जागा खानाच्या छावणींतून, किंबहुना गडाच्या पायथ्यापासूनहि अजिबात दिसत नव्हती. भेटीची जागाहि महाराजांनी अत्यंत अडचणीची निवडली होती. हेतु हा की, खानाने कदाचित् दगाबाजी केली, तरीहि त्याचें सैन्य सहजासहजी तेथे येऊन पोहोचूं नये.

गडावर रोज चिंतेची आणि खबरदारीचीं खलबतें चालू होतीं. राजगडावर आईसाहेबांनी देवी भवानीचे पाय धरले होते. नेताजी पालकर यावेळीं मावळी लष्करासह घाटमाथ्यावर[१५] म्हणजे महाबळेश्वरापाशी होता. बाकीचे सारे जिवलग प्रतापगडावरच होते. गडाचा प्रत्येक चिरा न् चिरा आता अहोरात्र जागा होता. प्रत्येक मावळा महाराजांवरच्या प्रेमाने, निष्ठेने आणि खानावरच्या रागाने रसरसला होता. अनेक हेर खानाच्या छावणीभवती झाडींत लपून छपून घिरट्या घालीत होते. प्रत्येकाला काळजीने घेरलें होतें.

अन् मुलाखतीचा दिवस ठरला ! मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी गुरुवारीं दुपारीं ! काय होणार होतें ? तें फक्त ब्रह्मदेवालाच माहीत होतें ! बाहेरचें जग मात्र असें समजत होतें की, या दोघांचा तह होणार आहे.

महाराष्ट्रांत घरोघरीं या वेळीं वांगीसटीचे घट बसले होते. जेजुरी, पाली, सातारें, दावडी, रेवडी वगैरे ठिकाणच्या खंडोबाच्या पुढे चंपाषष्ठीचे किंवा वांगीसटीचे नंदादीप जळत होते. मार्गशीर्षाचा हा पहिला आठवडा होता.

भेटीच्या आदला दिवस उजाडला. गडावर प्रत्येक जण कामाच्य धावपळींत गर्क होता. कोणाचें चित्त ठिकाणावर नव्हतें. जो तो खंडोबाला अन् भवानीला विनवीत होता. ‘ आईबापांनो, एवढा राजा सांभाळा. तुमच्या हवालीं आहे आता ! ’

महाराज मात्र अत्यंत शांत चित्ताने पण अतिशय दक्षतेने प्रत्येक गोष्टीची अंमलबजावणी करवून घेत होते. त्यांनी सर्व योजना अतिशय बारकाईने केलेली होती. प्रत्येकावर कांही ना कांही कामगिरी सोपविलेली होती.

विशेष म्हणजे प्रतापगडापाशी एक विलक्षण खळबळीची व स्वराज्याच्या आणि महाराजांच्या प्राणाशीं खेळ करणारी ही घटना

घडत होती, तरीहि स्वराज्याच्या इतर कोणत्याहि मुलखांत व किल्ल्या-वर कोणत्याहि प्रकाराने शिथिलता किंवा गैराशिस्त, घबराट, बेजबाबदार-पणा वा फितुरी आजिबात झाली नव्हती. होत नव्हती. अत्यंत व्यवस्थितपण सर्व व्यवहार चालू होते. फक्त सर्वांचे कान, मन, डोळे, महाराजांविषयींच्या चिंतेने व्यग्र झाले होते.


आदल्या दिवसाची रात्र प्राप्त झाली. काळरात्रच ती ! ( बुधवार ९ नोव्हेंबर १६५९. ) सारें बरेंवाईट भवितव्य या रात्रीच्या गर्भांतून उद्या बाहर पडणार होतें. रात्र दाटत गेली. महाराज नवगजींत बसले होते. त्यांनी आपल्या सर्व सख्यासौंगड्यांना, जिवलगांना, वडीलधाऱ्या मुत्सद्दी विचारवंतांना बोलावलें. पंताजीकाका, मोरोपंत, रघुनाथपंत अत्रे, नारोपंत, सुभानजी इंगळे, माणकोजी दहातोंडे, शामराजपंत रांझेकर, जिवाजी देवकांते, सुभानजी कनखरे, पिलाजी बेलदार, बहिर्जी, कान्होजी जेधे, झुंजारराव मरळ, जिवा महाला, संभाजी कोंढाळकर, शामराजपंत पद्मनाभी, बाजी जेधे, सिद्दी इब्राहीम, काताजी इंगळे, कृष्णाजी गायकवाड, किती जणांचीं नांवें सांगू ? सर्वजण महाराजां-भवती बसले. नेताजी पालकरहि घाटमाथ्यावरून आला होता. तान्हाजीचें आणि येसाजी कंकाचें नांव सांगायलाच हवें का ? ते तर महाराजांचे जीव की प्राण होते. सगळे जमले. अगदी गंभीर वातावरण होतें. सर्वांच्या चित्तांत केवढा कालवा उडाला होता हें त्यांचें त्यांनाच ठावें. निष्ठा, वीरश्री, तळमळ, काळजी, संताप आणि सूड त्यांतून उफाळत होते. अगदी तळाशीं होता महाराजांवरील प्रेमाचा गहिवर. महाराजांनी सर्वांना कळकळीने व तितक्याच वीरश्रीने म्हटलें,[१६]

" खान भेटीसाठी उद्या येतो आहे. तुम्ही सर्वजण हत्यारबंद सज्ज आहांत हें ऐकून खान कदाचित् भीतीची शंकाहि घेईल म्हणून तुम्ही सर्वांनी खानाच्या सैन्याभवती असलेल्या दाट झाडींत गनिमाला

कळूं न देतां दडून राहा. ठरलेल्या कराराप्रमाणे जर खान वागला नाही आणि त्याने जर बेइमानी केली तर गडावरून नौबतीची आणि तीन तोफांची इशारत होईल. ती होतांच तुम्ही सर्वांनी एकच एल्गार करून खानाची सारी फौज कापून काढा! साफ लष्कर बुडवा!"

मनगटें फुरफुरूं लागलीं. त्या गंभीर मध्यरात्रीं मशाली व समयांच्या उजेडांत डोळे आणि कान टवकारून बसलेल्या जिवलगांपुढे महाराज बोलत होते. महाराज पुढे बोलतांना एका एका बहाद्दराचें नांव घेऊन त्याला कामगिरी सांगूं लागले. जो तो आपली कामगिरी झेलायला उत्सुक झाला. महाराज म्हणाले,[१६]

*रात्रीच्या गर्भांत उद्यांचा असे उषःकाल*



" बांदलानाईक ! तुम्ही तुमच्या जमावानिशी जावळीच्या व पाराच्या झाडींत दडून राहा ! कान्होजीनाईक, तुम्ही आणि बाजी सर्जेराव यांणी पाराच्या वाटा रोखणें ! खानाचें लष्कर पारांत आहे. तें कदाचित् डोंगर चढून वर येईल तर त्याला डोंगर चढूं न देणें ! अवघें लष्कर बुडविणें ! हैबतराव व बाळाजी नाईक शिळमकर यांना आम्हीं बोचेघोळीचे घाटांत ठेविलें आहे. ते खानाच्या लष्करास घाट चढूं देणार नाहीतच. नेताजी ! इशारतीचे आवाज गडावरी होतांच तुम्हीं घाटमाथ्यावरोन खाली खानाचे लष्करांत उतरोन चालोन येऊन मारामारी करणें. "

महाराजांनी याप्रमाणेच मोरोपंत पिंगळे, शामराजपंत, तान्हाजी, बाबाजी भोसले, मारणे, ढोहार, पासलकर, त्र्यंबक सूर्याजी, ढमाले वगैरे सर्व सरदारांना जागा आणि कामें नेमून दिलीं. काम सर्वांना एकच होतें. मारा ! कापा ! तोडा ! जागा फक्त वेगवेगळ्या माऱ्याच्या होत्या. अशी अगदी जाम नाकेबंदी महाराजांनी खानाच्या फौजेची केली. खानाचा पराभव झाल्यासारखाच होता, इतकी ही लष्करी योजना बेमालूम होती. आता अवघड फक्त खानाची प्रत्यक्ष मुलाखत होती.

महाराजांनी त्या चेतलेल्या सरदारांना अखेरचा व महत्त्वाचा इषारा दिला. ते म्हणाले,[१६]

" गनिमांपैकी जो हत्यार फिरंग खाली ठेवील त्याला मारूं नका. पण हत्यार उगारल्या पाइकाला राखूं नका ! कापून काढा ! "

भेटीस जातांना बरोबर कोणा कोणाला न्यावयाचें हा मोठा प्रश्न होता. कारण ज्याला त्याला वाटत होतें की, त्या काळझडप घालणाऱ्या खानापुढे महाराज जातात, तेव्हा आपणच हवें महाराजांसंगतीं. पण महाराजांनी दहाजणांची निवड केली होती. सगळेच चांगले. त्यांतले

दहा निवडले. बाकीच्यांना कामें आधीच सांगितलीं होतीं. मुलाखतीला जातांना पुढील दहाजणांनी सांगातीं यावें असें ठरलें.[१७] संभाजी कावजी कोंढाळकर, जिवा महाला, सिद्दी इब्राहीम, काताजी इंगळे, कोंडाजी कंक, येसाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, सूरजी कांटके, विसाजी मुरुंबक व संभाजी करवर. हे दहा पटाईत वाघ अत्यंत शूर, चपळ, हुशार, आणि निष्ठावंत होते. हे दहाजण म्हणजे महाराजांच्या अंगावरील दहापदरी पोलादी चिलखतच होतें. पंताजीकाका महाराजांच्या बरोबर असणार होतेच.

सर्वांनी आपआपल्या हशमांचे जमाव घेऊन गुपचूप, चोरपावलांनी, गनिमाला थोडीसुद्धा चाहूल लागूं न देतां जंगलांतील गर्द जाळ्यांत, झाडांवर, ढोल्यांत, खाचखळग्यांत, कुठेहि जागा सापडेल तेथे, चोरासारखें दडून राहायचें आणि गडावरून इशारतीच्या तोफा झाल्याबरोबर गनिमावर तुटून पडायचें. हें काम चोख पार पाडण्यासाठी कमींत कमी सात आठ तास एका जागीं खिळून व टपून बसावयाचें होतें! खानाच्या सैन्याला न दिसतां आठ तास तोफेच्या आवाजाची वाट पाहात बसायचें! हें सोपें होतें काय? महाराजांनी बजावलें की, सावधपणे आणि हुशारीने वागणें. जर का गनिमाला संशय आला, तर सारा डाव उधळला जाईल. म्हणजे युद्धाचें यशापयश प्रत्येक सैनिकावर अवलंबून होतें.

रात्रभर झोप तरी कुठली? उजाडलें. अंधाराअंधारांतच कान्होजी, तान्हाजी, मोरोपंत वगैरे मंडळी आपआपल्या लोकांसह निघाले. महाराजांना त्यांनी मुजरे केले. सर्वांच्या मनांत विलक्षण कालवाकालव होत होती. आज आपल्या राजाची खानाशीं मुलाखत आहे. कसें होणार अन् काय होणार? महाराजांनी सर्वांना प्रेमाने व गदगदल्या हृदयाने निरोप दिला. खात्री एकच दिली. श्रीजगदंबा भवानी आपल्या

पाठीशीं आहे. चिंता करूं नका. हत्यार कडक चालवा. फत्ते आपली आहे. जय भवानी !

नंतर महाराजांनी खाशा मुत्सद्दी मंडळींशीं खलबत केलें. कृष्णाजी बंककर, रघुनाथपंत अत्रे, माणकोजी दहातोंडे, शामराजपंत रांझेकर, सुभानजी इंगळे ही मंडळी त्यांत होती. महाराजांनी विचारलें,[१८]

" खानास भेटावयास कैसें जावें ? "

खानाला जें भेटायला जायचें तें कोणत्या खबरदारीनें जायचें, याचा खोल विचार सुरू झाला. तेव्हा कृष्णाजी बंककर म्हणाले,[१८]

" शिवबा, सील करा अंगाला ! "

सील म्हणजे चिलखत. कृष्णाजी मोठ्या काळजीचे. त्यांनी सुचविलें की, अंगांत चिलखत घालूनच भेटीला जा. मग कोणीं कांही, कोणीं कांही काळजी सुचविली आणि मग महाराजांनी कसें कसें करायचें तें आपल्या मनाशीं पक्कें केलें.

उषःकाल झाला. सूर्यनारायण सप्त अश्व दौडीत महाबळेश्वराच्या शिखरावर आला.

भेटीचा शामियाना सजून तयार होता. अतिशय सुंदर खांबांवर शामियाना उभा होता. बऱ्हाणपुरी चिटाचे पडदे व आडपडदे लावले होते. कनाती अशाच मौल्यवान् कापडाच्या होत्या. पडद्यांना व झालरींना मोतीलग लावलेली होती. मधून मधून मोत्यांचे घोस लोंबत होते. भरजरी अस्मानगिरी केलेली होती. हिरे, मोती अन् माणकें जडवून त्यावर चांदवा लावलेला होता. रुजामे, गाद्या, लोड, गिरद्या भरजरी चिटें घालून सजविलेल्या होत्या. असा हा दिमाखदार फरास डोळे दिपवीत होता. चार कोपऱ्यांत चार सुंदर समया उभ्या होत्या. वाळ्याचे पंखे ठेवले होते. शामियान्याला सोन्याचे चंदराई कळस लावले होते. सदरेवर कस्तुरी सिंचून सुगंधाचा घमघमाट उडविलेला

होता. इतका की, सहजासहजी कोणताहि विषारी नाग तेथे धुंदच व्हावा. मौल्यवान् पिकदाण्या, दवण्याचे कुंड, तबकें, सुरया वगैरे जिन्नस ठेवले होते. सदरेचा ढाळ असा कांही नखरेबाज होता की, त्याने कुबेराचीहि कांचबंदी व्हावी. बादशाहाच्या बापासाठीसुद्धा अशा शिणगाराचा शामियाना कोणीं उभा केला नव्हता आजपर्यंत ![३४] गडावरून शामियाना स्पष्ट दिसत होता. आजच दुपारीं येथे भेट होणार होती.

गडावरचें वातावरण कांही भयंकरच विचित्र झालें होतें. सर्व कामें चोखपणाने चालू होतीं. पण कोणाचीहि मनें स्वस्थ नव्हतीं. हृदयें थरथरत होतीं.

आणि खानाच्या छावणीवर कबुतरें फडफडत होतीं. आनंदीआनंद होता. काळजी नव्हतीच. सर्वांची खात्री होती की, आज आपण शिवाजीला घेऊन विजापुरास माघारीं निघणार ! आपले खानसाहेब मुलाखतीला जातील. तो घाबरलेला भ्याड शिवाजी खानसाहेबांच्या स्वाधीन आपण होऊन होईल. मग शिवाजीसह ते परत येतील. मग निघायचेंच ! न लढतां केवढी प्रचंड लढाई आपण जिंकीत आहोंत याबद्दल स्वतःचेंच कौतुक वाटत होतें ! शिवाजी मूळचाच भित्रा असून आता तर अगदीच घाबरगुंडी उडाली आहे त्याची, अशी खास माहिती खानाच्या सबंध लष्कराला वाईंतच भरपूर मिळाली होती. त्यामुळे हे लोक अत्यंत निष्काळजी, बेफिकीर आणि गाफील होते. तिन्हींचा अर्थ एकच !

प्रतापगडावर महाराजांच्या देवपूजेची तयारी राजोपाध्यांनी केली होती. महाराजांनी स्नान केलें. ते शांत होते. यत्किंचितहि डगमगलेले नव्हते. त्यांची भवानीशंकराच्या पायीं वज्रश्रद्धा होती. त्यांची हीहि खात्री होती की, हें आपलें स्वराज्याचें कार्य परमेश्वरी कार्य आहे. त्यांत यश येणारच. पण प्रयत्नांत तिळमात्रहि कसूर होतां कामा नये आणि तशी कसूर प्रयत्नांत आणि श्रमांत अजूनपर्यंत झालेली नव्हतीच.

महाराज स्नान करून शिवपूजनास बसले. राजोपाध्ये मंत्र म्हणून पूजा सांगत होतें. विविध प्रकारांनी अगदी यथासांग पूजा चालली होती. महाराज तन्मय झाले होते. पूजाविधि आटोपल्यावर महाराजांनी नित्याचा दानविधि पार पाडला.

यावेळीं सकाळचे सुमारें अकरा वाजले होते. पंताजीकाकांना महाराजांनी खानाच्या छावणींत जाण्यास निरोप दिला. कारण खान भेटीसाठी छावणींतून निघेल तेंव्हा काकांनी तेथे जवळ असणें जरूर होतें. आयत्या वेळीं खानाने करारापेक्षा जादा हशम बरोबर घेतले तर ? त्याने तसें करूं नये म्हणून सावध राहण्यासाठी काकांना गडावरून खानाकडे रवाना केलें.

खानाच्या छावणींत आनंद उचंबळत होता. खानाची भेटीसाठी निघण्याची तयारी सुरू झाली होती. काका आले. आणि त्यांना जरा विचित्रच प्रकार दिसला ! जवळ जवळ दीड दोन हजार करोल हशम बंदुका घेऊन निघण्याच्या तयारींत होते ! हा काय प्रकार ? शामियान्या-बाहेर एक प्रशस्त पालखी तयार होती. खान तयारी करीत होता. अगदी गुप्तपणें त्याने एक धारदार कटयार लपवून घेतली ! !

गडावर तोफा ठासून सज्ज झाल्या. महाराज जेवावयास बसले. ते अगदी थोडेंसेंच जेवले.[१९]

खान आपल्या शामियान्यांतून बाहेर आला. केवढा तो प्रचंड देह ! त्याच्या डोक्याला कीमॉश आणि अंगावर भरदार दरबारी पोषाख होता. खानाबरोबर कृष्णाजी भास्कर वकील व सय्यद बंडाहि बाहेर पडले.

बारा वाजले !

सूर्य माथ्यावर आला. महाराज निघण्याची तयारी करूं लागले.

इकडे खानाची पालखी भोयांनी पुढे आणली. ते दीडदोन हजार बंदुकी-

२४४८० वि: १.३१ 
क्रमांक ८६६ नों: दि: १-२-५

वाले हशम निघण्याच्या तयारीने पुढे आले ! ते पाहतांच पंताजीकाका बिचकले. ते घाई घाई खानापुढे आले आणि त्यांनी खानाला विचारलें की, हे दीड हजार बर्कंदाज आपल्याबरोबर मुलाखतीच्या जागीं येणार आहेत की काय ? तेव्हा खान म्हणाला की, होय, ते येणार आहेत ! हें ऐकून काका चटकन् म्हणाले,[२०]

"इतका जमाव घेऊन गेलियाने राजा धाशत खाईल ! माघारा गडावर जाईल ! भेटी होणार नाही. शिवाजीराजा म्हणजे काय ! त्यास इतका सामान काय करावा ? राजा दोघां माणसांनिशी तिकडोन येईल. आपण इकडोन दोघांनिशी चलावें. दोघे बैसोन भेटावें."

पंताजींचें हें म्हणणें ऐकल्यावर खान क्षणभर उभा राहिला. वास्तविक करारांत असें ठरलें होतें की, फौज वगैरे कोणींहि आणूं नये. पण खान रेटून तशीच फौज घेऊन निघाला होता. पण शिवाजी भेटीलाच येणार नाही व घाबरून परत जाईल हें ऐकल्यावर त्याचा निरुपाय झाला. त्याने मुकाट्याने बेत फिरविला. फौज रद्द केली ! फक्त करारा-प्रमाणे दहा हशम नेण्याचें त्याने ठरविलें. तरीपण खानाला आनंदच झाला ! गालावर गुलाब फुलले ! डोळ्यांत चमक उठली ! पण कां ? कां ? तें काकांनाच विचारा ! शिवाजी घाबरट आहे, तो जास्तच घाबरेल असें काकांनी सांगितलें ना ? म्हणून !

महाराजांच्या 'भित्रेपणामुळे', 'घाबरटपणामुळे', 'भेकडपणामुळे' खानाच्या फौजेची व खानाची खूपच करमणूक होत होती. आणि म्हणूनच महाराजांच्या भित्रेपणावर पूर्ण विसंबून मंडळी अगदी गाफील बनली होती. काकांनी हें फार सफाईने घडवून आणलें.

खान पालखींत बसला. चौघां भोयांनी पालखी उचलली. खाना-बरोबर पंताजीकाका व खास खानाचे असे, कृष्णाजी भास्कर, सय्यद बंडा, अबदुल सय्यद, खानाचा पुतण्या रहीमखान, पहिलवानखान,

पिलाजी मोहिते, शंकराजी मोहिते व आणखी इतर चार खान निघाले. खान निघाला !

महाराज आचमनाप्रमाणे वारंवार थोडें थोडें पाणी प्याले. जगदंबा तुळजा भवानीचें त्यांनी स्मरण केलें. रात्रीं ठरविल्याप्रमाणे त्यांनी पोषाख करण्यास सुरुवात केली. अंगांत चिलखत घातलें. डोक्यास जिरेटोप घातला. चिलखतावर जरीचें कुडतें व अंगरखा घातला. जिरेटोपावर नेहमीचा त्यांचा मंदील बांधला. कमरेला शेला बांधला. मोजके अलंकार घातले. त्यांच्या मंदिलाचा आणि अंगरख्याचा रंग पांढरा शुभ्र होता. मंदिलावर नेहमीप्रमाणे मोत्याचा तुरा खोविला. शुभ्र अंगरख्यावर केशराचा थोडासा शिडकावा केलेला होता. पायीं सुरवार पेहेरली. महाराजांनी अस्तन्या सारल्या आणि ताटांतील बिचवा आणि वाघनखें उचललीं ! बिचवा एका अस्तनींत व बोटांत वाघनखें लपविलीं ! [२१]

नंतर महाराजांनी आरशांत आपलें मुखावलोकन केलें. निघावयाची तयारी झाली. पूर्ण तयारी झाली.

दुपारचा एक वाजला.

—खानाची पालखी भेटीच्या शामियान्यापाशी येऊन पोहोचली. खान पालखींतून उतरून शामियान्याकडे पाहात पाहात आंत प्रवेशला. त्याच्याबरोबर कृष्णाजीपंत, पंताजी काका व सय्यद बंडा आंत आले. खानाचे बाकीचे नऊ हशम दूर उभे राहिले. खान तर सदरेचा थाट पाहून दिपूनच गेला. पण त्याच्या मनाचा मत्सराने जळफळाट झाला. तें वैभव पाहून खान म्हणाला,[२२]

“ओ हो ! क्या शानदार शामियाना है । शहाजी जैसे मामूली सरदार का यह छोकरा और उसकी यह हैसियत । कहाँसे इसने यह असबाब पैदा किया ? इतनी कीमती बिछायत तो हमारे वजीरे-आलम को भी नसीब नहीं । हुजूर आदिलशाह के पास भी इतना कीमती

असबाब मौजूद नहीं। इन्शाल्ला। कहाँ से इसने ये सारा इकट्ठा किया?"

त्यावर काका खानाला आदबीने म्हणाले,[२२]

"पादशाही माल पादशाहाचे घरींच जाईल! त्याची एवढी तजवीज कशाला?" तेव्हा खान लोडाशीं बसला.

महाराज गडावरून निघण्याचा तयारींत होते. त्यांनी राजोपाध्यायांना व इतर ब्राह्मणांना नमस्कार केला. त्यांनी शुभाशीर्वाद दिले. मग महाराजांनी, तेथे मुद्दाम आणलेल्या दहीं, दूर्वा आणि अक्षता यांस स्पर्श केला. सूर्यदर्शन घेतलें. तेथे एक सवत्स गाय आणविलेली होती, ती महाराजांनी सुवर्णदक्षणेसह एका गुणवान् ब्राह्मणास दान दिली.[२१]

---

*डुमडुमत डमरु ये। खणखणत शूल ये।......येई रुद्रा...येई रुद्रा...*



आणि महाराज निघाले ! ते निघालेले पाहून अनेक जण हट्ट धरूं लागले की, 'आम्हांला बरोबर न्या!' सर्वांचींच हृदयें गलबलून भरून आलीं. किल्लेदार आणि इतर असंख्य मावळी मंडळी भवती होती. महाराजांचा कंठ दाटून आला. ते म्हणाले की, "माझ्याबरोबर तुम्ही सर्व येऊं नका. ठरलेले दहाजण फक्त येतील. पण तुम्ही गडाचें रक्षण करा." महाराज पुढे म्हणाले,[२३]

"माझ्या भावांनो ! संभाजीराजाला सांभाळा माझ्या ! गड मी तुमच्या-वर निरवितों. स्वराज्य नेताजी पालकरावर निरवितों. माझें विनवणें आहे- सांभाळा ! येथूनच आमचा मुजरा तीर्थरूप शहाजी महाराजांना सांगा ! हीच निरवानिरव ! माझ्या दादांनो ! राम राम घ्या, माझ्या दादांनो !"

प्रतापगडाचा गळा दाटून आला. आईसाहेबांची आठवण झाली. तो मायेचा बंध केवढ्या कठोर मनाने महाराजांनी राजगडावर ठेवला होता ! पण तेथे आईसाहेबांची स्थिति काय असेल ?

महाराज निघाले. सांगितलेलीं कामें चोख करण्यास सांगून महाराजांनी एका हातीं पट्टा घेतला. महाराजांच्याबरोबर जिवा महाला, संभाजी कावजी कोंढाळकर, संभाजी करवर, काताजी इंगळे, कोंडाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, सिद्दी इब्राहीम, सूरजी काटके, विसाजी मुरुंबक आणि येसाजी कंक हे पाठच्या भावांसारखे रक्षक निघाले.

गडावर तोफा व तोफांजवळ मशाल घेऊन एक मावळा सज्ज होता.

खानाने अधीरपणाने काकांना म्हटलें की, राजाला सिताब, म्हणजे ताबडतोब घेऊन या. तेव्हा लगेच बाहेर दूर उभ्या असलेल्या मराठा जासुदाला बोलावून काकांनी गडावर निरोप पाठविला की, 'महाराज चला ! खान आला !' हा जासूद गडावरचाच होता.[२२] काका स्वत

तेथून हालले नाहीत. कारण एखाद वेळीं त्यांच्या गैरहजेरींत खान आणखी कांही डोकें लढवायचा !

जासूद महाराजांपाशी आला. त्याने निरोप सांगितला. महाराज थांबले. त्यांनी जासुदाला, शामियान्यांतील सर्व माहिती बारीक विचारली. तेंव्हा जासुदाने सर्व सांगितलें. त्यांत हेंहि सांगितलें की, खानापाशी सदरेवर एक सय्यद बंडा नांवाचा हत्यारबंद हशम उभा आहे! हें ऐकून महाराज तेथेच निम्म्या वाटेवर उभे राहिले.[२४] तेथून खानाचा शामियाना दिसत होता. महाराजांनी यांत दगा आहे हें जाणलें. त्यांनी पंताजींना निरोप पाठविला की, येथे या.

काकांना निरोप आला. खानाला आश्चर्य वाटलें. शंकाहि आली. ही आता निरोपानिरोपी कसली? काका खानाला सांगून लगबगीने महाराजांपाशी आले. तेंव्हा महाराज म्हणाले,[२४]

"जैसे आम्हास महाराज तीर्थरूप, तैसेच खान ! मी तर खानाचा भतीजा ! खान वडील ! सैद बंडा खानाजवळ आहे, त्याकरिता शंका वाटते. या सय्यद बंडास यांतून दूर पाठविणें."

हा महाराजांचा निरोप, नव्हे अर्ज !....खानासाठी होता. काकांनाहि तें पटलें. महाराज कमालीचे सावध होते. काका पुन्हा तुरुतुरु खानापाशी आले. त्यांनी खानाला सांगितलें की, एवढा हशम दूर ठेवा. राजे फार घाबरतात !

खान वाईंत आल्यापासून सारखें ऐकत होता, 'राजे भितात,' 'घाबरतात,' 'भितात,' 'घाबरतात'! हा आता अगदी शेवटचा 'भीतीचा' वळसा ! खानाने लगेच सय्यदाला दूर जाण्यास फर्माविलें ![२४]

अन् मग महाराज पावलें टाकीत निघाले. मुखानें ते आदिशक्ति भवानीचें स्मरण करीत होते. जगदंब ! जगदंब ! जगदंब !

समोर दूरवर शामियान्यांत बसलेला खान दिसूं लागला! प्रत्येक पावलागणिक मृत्यु पावलें टाकीत जवळ जवळ येत होता!.... कोणाचा? कोणाच्या?

लांबून येत असलेल्या महाराजांस खानानेहि पाहिलें.[२४] खान आतुर झाला. हवा असलेला तो शिवाजी आला! आता तो सुटत नाही!

महाराज शामियान्यापाशी आले. आता खानाला स्वर्ग फक्त दोनच बोटें उरला! खान एकदम उभाच राहिला![२५] केवढा धिप्पाड तो पर्वत! महाराजांशीं त्याची नजरानजर झाली. महाराजांनी गालांत स्मित केलें.[२६] खान सामोरा आला. दोन्ही वक़ील तेथेच होते. महाराज आंत गेले. सूर्यहि थबकला! वारा स्तब्ध झाला! चित्रगुप्ताची लेखणी थांबली! यमदूतांचीहि छाती धडधडूं लागली! खानाने आपली तलवार चटकन् कृष्णाजी भास्करापाशी दिली. खान खोटा, नाटकी जिव्हाळा दाखवीत होता. परंतु त्यांत कपट ओतप्रोत भरलेलें होतें. महाराजांच्या सराईत नजरेला बरोबर सर्व अंदाज आला. खान छद्मीपणाने म्हणाला,[२७]

" राजाजी, आप की सद्र तो शाह आदिलशाह से भी बेहतरीन है। शायद आप भूल गये कि आप एक नाचीज शख्स हैं। "

" खानसाहेब, ज्याची करणी त्याला! कांहीं भ्यावें तर तें प्रभु रघुनाथाला भ्यावें! की तुम्हाला? आपण कोण तें आम्ही फार चांगलें जाणतों! "[२७] महाराज म्हणाले.

" तू अपनी हिंमतबहादुरी की शेखी बधारता है। बेअदबसे बुरी राह पर क्यों चलता है? अलि आदिलशाह, कुतुबशाह और मुगलों की हुकूमत को ठुकराकर बेलाग बरतता है। तेरी शेखी को मिटाकर तुझे सबक सिखलाने के लिये मैं यहाँ आया हूँ। तेरे ये सारे किले मेरी काबू में दे, मेरा मातहत बन जा। पहले तुझे मैं आला हजरत अलि आदिलशाह के आगे पेश करूंगा। उसके सामने सर झुकाने

पर मजबूर करूंगा। फिर उसीसे तुझे बड़ी जागीर इनायत करूंगा। आओ अपनी सारी शेखी छोड़कर इस अफझलखाँ के गले लगाओ!"

एवढें बोलून खानाने महाराजांना आलिंगन देण्याकरिता दोन्ही हात पसरले! मृत्यूचा जबडाच तो! त्या जबड्यांत तो महाराजांचा, स्वराज्याचा, देवाधर्माचा, सौभाग्याचा, आईसाहेबांच्या पुत्रसुखाचा, सर्वस्वाचाच एकदम घास घेत होता! खानाने एकदम महाराजांना मिठी मारली! धिप्पाड खानापुढे महाराज अगदीच खुजे होते. त्यांचें डोकें खानाच्या छातीला लागलें! आणि–आणि–आणि–खानाने एकदम महाराजांची मान आपल्या डाव्या काखेंत पकडली! दाबली! एकच क्षण·

*परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्......*



पापणीहि लवली नाही ! खानाने एकदम कटयार काढली आणि दात ओठ खाऊन खसकन् महाराजांच्या कुशींत खुपसली ! टर्रकन अंगरखा फाटला ! कटयार खरखरली ! आंत चिलखत होतें ! तेवढ्यांत महाराजांनी अत्यंत चपळाईने बिचव्याचें तीक्ष्ण पातें खसकन् खानाच्या पोटांत खुपसलें ! एकदम खानाने प्राणांतिक आरोळी मारली ! खान ओरडला.[२८]

" ऑऽऽ ऑऽऽ ! दगाऽ दगाऽ दगाऽ ! लव्हाऽ ! लव्हाऽऽ ! "

भळकन् खानाचीं आतडीं बाहेर पडलीं ! रक्ताचा धबधबा सुरू झाला. कसें घडलें ? खानालाहि उमजलेंच नाही ! सर्व कांही एका निमिषांत घडलें ! अवघा निमिषाचा खेळ ! एकदम गलबला उडाला. शामियान्याबाहेरहि खानाच्या व महाराजांच्या रक्षकांची झुंज जुंपली. खानाच्या धैर्याची तरी कमालच ! त्याने आपल्या हाताने आतडीं सावरून, झोकांड्या जात होत्या तरी उभे राहून ओरडून म्हटलें,[२९]

" दुश्मन ने मुझे कत्ल किया । इसे काटो, खत्म करो । "

तेवढ्यांत वकील कृष्णाजी भास्कर याने आपल्यापाशी असलेल्या तलवारीने महाराजांवर वार काढला ! तो वार अडवून महाराज म्हणाले,[२९]

"ब्राह्मणास शिवाजी ठार मारणार नाही ! आम्हाला शिवशंकर हसेल ! शहाजीमहाराजांची आम्हाला आण आहे की, ब्राह्मणांस मारूं नकोस ! "

तरीहि कृष्णाजीपंत महाराजांवर चालून आला. मग मात्र त्याच्या ब्राह्मण्याचा क्षणभरहि विचार न करतां महाराजांनी कृष्णाजीपंतास तलवारीच्या सपाटयाने ठार केलें ! [३५] पण तेवढ्यांत बाहेर चाललेल्या दंगलींतून सय्यद बंडा आंत घुसला. तो महाराजांवर चालून आला. तेवढयांत जिवा महालाहि महाराजांपाशी धावत आला. महाराजांवर सय्यद आलेला पाहून जिवाने मोहरा घेत म्हटलें,[३०]

" महाराज ! याला मीच ठार करतों ! येऊं द्या त्याला ! "

[illegible]सय्यदाचा वार जिवाने आपल्या अंगावर घेत अडविला आणि सपकन् घाव घालून सय्यद बंडयाच्या दोन चिरफाकळ्या केल्या !

या धामधुमींत खान शामियान्याबाहेर पडला. रक्त गळत होतें. झोकांडया जात होत्या. तेवढयांत त्याच्या भोयांनी पालखी भराभरा आणली. खानाने पालखींत अंग टाकलें. भोई पालखी उचलून पळवीत नेऊं लागले. हें संभाजी कावजीने पाहिलें. तो धावत गेला. त्याने सपासप घाव घालून भोयांचे पायच छाटले ! पालखी भुईवर आदळली गेली. संभाने खानाचें मुंडकें तलवारीने कापलें व तें घेऊन तो महाराजांपाशी आला.[३१] इतरांच्या झटापटी चालूच होत्या.

एवढ्या धूमधडाक्यांत गडावरच्या तोफांनी किंकाळ्या फोडल्या ! दरीखोरीं घुमलीं ! खानाच्या गाफील फौजेला वाटलें, भेटीच्या वेळीं उडालेल्या या मानाच्या तोफा ! पण तसें नव्हतें तें ! रणचंडिकेने, तुळजाभवानीने जंगलांत लपलेल्या मराठ्यांना मारलेली ती हाक होती ! तोफांची इशारत होतांच कान्होजी, तान्हाजी, नेताजी, मोरोपंत, शामराजपंत आणि झाडून सगळे मराठी वाघ झेपा टाकीत गर्जत गर्जत बाहेर पडले आणि गनिमांवर त्यांनी असा कांही हल्ला चढवला म्हणतां ! काय भयंकर अक्राळविक्राळ आवेश त्यांचा तो ! खानाच्या फौजेंत अकस्मात् आकांत उडाला ! कत्तल, कत्तल आणि कत्तल ! केस मोकळे सोडलेली, भयंकर संतापलेली, भयंकर आरोळ्या फोडणारी, हजारो हातांत हजारो शस्त्रें घेऊन करकरा दात खात जणूं प्रत्यक्ष भवानीच खानाच्या उन्मत्त व महामूर्ख फौजेचा संहार करीत होती. हत्ती बिथरून सैरावैरा धावत होते. मराठे बेभान होऊन खांडोळीं उडवीत होते. रक्ताचे लोट वाहूं लागले. बांदल, मारणे, शिळमकर, बाजी जेधे वगैरे सर्वांनी अगदी शर्थ मांडली. प्रत्येक सामान्य मावळाहि चिडून लढत होता. गेले सहा महिने खानाने व

त्याच्या सैन्याने केलेल्या सगळ्या पापांचा झाडा आता घेतला जात होता. शिवाजीराजा हवाय न्हाई का र तुला ? हा घे शिवाजीराजा ! घाल घाव की, तोड मुंडकें ! असें चाललें होतें. कोयनाबाई कृष्णाबाई लाल लाल होऊन वाहूं लागल्या. नेताजी पालकराने तर कहर कहर केला. तें जावळीचें अरण्य आक्रोश आणि रणगर्जना यांनी भरून गेलें. पळून सुद्धा जातां येईना. फक्त एकाच ठिकाणीं जायला वाट मोकळी होती ! ती म्हणजे स्वर्गाची !

शामियान्याबाहेर खानाच्या व महाराजांच्या खाशा प्याद्यांची झुंज चाललीच होती. येसाजी कंक, इंगळे, करवर, काटके व सिद्दी इब्राहीम यांनी विलक्षण तडाखा दाखविला. खानाकडील पहिलवानखान, रहीमखान, अबदुल सय्यद, पिलाजी व शंकराजी मोहिते वगैरे दहाचे दाहीजण शामियान्याभवती ठार होऊन पडले. महाराजांच्या दहा वीरांपैकी मात्र एकहिजण दगावला नाही ! [३२]

महाबळेश्वर आणि प्रतापगड यांच्या दरम्यान असलेल्या त्या दऱ्याखोऱ्यांत युद्धाचा कल्लोळ उडाला होता. सर्व वाटा रोखून धरून कापाकाप चालली होती. अक्षरशः दाणादाण उडाली होती गनिमांची. रणयज्ञ धडाडून पेटला होता.

भेटीच्या जागीं तर यज्ञाचे खासे बळी पडले होते. संभाजी कोंढाळकराच्या डाव्या हातांत खानाचें मुंडकें रक्त गाळीत होतें व उजव्या हातीं तलवार निथळत होती. तो अगदी कालभैरवाप्रमाणे दिसत होता. या सगळ्या धुमश्चक्रींत पंताजीकाकांच्या दंडाला तलवारीची जखम झालीच ! महाराजांच्या मस्तकालाहि खोक पडली. आंत जिरेटोप असल्यामुळे जखम बेताचीच होती. त्यांच्या अंगावर रक्ताची रंगपंचमी साजरी झाली होती. महाराज, काका व त्यांचे खासे हशम झपाटयाने गडावर निघून गेले.

शके १५८१ विकारीनाम संवत्सरांत, मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीसह सप्तमी, गुरुवारीं दुपारीं आठवे तासीं, म्हणजे सुमारें दोन वाजतां देवद्वेष्टा अफजलखान ठार झाला.[३३] गडावर नौबती वाजत होत्या. शिंगें ललकारत होतीं.

राजगडावर आईसाहेबांना खबर गेली.

खानाच्या फौजेचा साफ फन्ना उडाला. जे जे शरण येत होते ते तेवढे वांचत होते. खान ठार झाल्याची ओरड झाल्यावर तर मराठ्यांना जास्तच अवसान चढलें. गनिमांचा धीर खस्त झाला. घोरांदर युद्ध झालें. निदान करोन मोठेंच भांडण केलें. हत्ती घोडेहि बरेच मेले. माणसें किती मेलीं त्यांची संख्या न करवे! कमळोजी सोळंखे, रामाजी पांगारकर, नारोपंत यांनी तलवारीची हौस फेडून घेतली. त्यांनीच काय, सर्वांनीच!

अंधार पडत चालला. खानाचा पुत्र फाजलखान जखमी झाला होता. तरी लढत होता. तो वाट शोधत होता पळून जायला! बिचाऱ्याचा बाप गेला. आणि त्याचे दोन भाऊ मराठ्यांनी कैद करून नेले. मुसेखान सर्वांना प्रोत्साहन देत होता, लढा म्हणून! पण त्याचें कोण ऐकतो! अखेर स्वतः मुसेखानच झाडींत घुसून पळाला! त्याच्या मागोमाग फाजलखान, हसन, याकूब आणि अंकुश हे खानहि पळाले! अंकुशखान हा अफजलखानाचा सल्लागार. आता झाडाझुडुपांत घुसून जीव बचावेल कसा ही चिंता करीत होता. फाजलच्या पायास जखम झाली होती.

खानाचे खासे खासे लोक ठार झाले. मंबाजीराजे भोसले म्हणजे महाराजांचे चुलत चुलते ठार झाले. शिवाय कैदहि असंख्य झाले. झुंझारराव घाटगे, अंबरखान, छोटा रणदुल्लाखान, अफजलखानाचे दोन मुलगे वगैरे सापडले. त्यांना गडाकडे चालविलें. पायथ्याशीं त्यांना आणण्यांत

आलें. महाराजांना शत्रूकडील कैदी आणल्याची खबर गेली. ते लगेच जातीनें गडावरून खाली आले. कैद्यांना वाटलें, आता मरणच ! परंतु राजा पुण्यश्लोक. शरणागतास मारीत नाही. महाराज या कैद्यांना भेटले. त्यांतल्या कित्येकांस पोटाशीं धरून त्यांनी दिलासा दिला.[३४] ' संस्कृति ' ' संस्कृति ' म्हणतात ना, ती हीच !

महाराजांच्या सैन्याच्या हातीं लूट तर अमूप सापडली. पासष्ट हत्ती, हजारो घोडे, उंट, बैल, कापडचोपड, वारूद, तंबू, तोफा, पालख्या, हत्यारें आणि खजिना. अन् जडजवाहीर अपार, चिक्कार, अगणित !

यशवंत खंडेश्वरी तुळजा भवानी राजास प्रसन्न. बहुताप्रकारें श्रम-साहस करोन राजा यशवंत झाला. खानासारिखा दुर्योधन मारिला. हें कर्म भीमाचें ! आदिलशाहीचा शौर्यसागर एका आचमनीं गिळून टाकला. हें कर्म अगस्तीचें ! तुळणा नसे ! तुळणा नसे !

---


**आधार**—(१) शिभा १९।२५ ते ४४. (२) आघइ पृ. १७८. (३) सोलापूर देशमुख अप्रसिद्ध दप्तर, संशोधक प्रा ग. ह. खरे. (४) सभासद पृ. १८. (५) शिचवृसं २।१२. (६) सभासद पृ. १९. (७) पोवाडा पृ. १४. (८) शिभा २०।३२ ते ४७. (९) शिभा २०।४८ ते ५१. (१०) शिभा २०।५२ ते ५५. (११) शिभा २०।६१ ते ६३. (१२) शिभा २१।३ ते ८; सभासद पृ. १९ व २०; पोवाडा पृ. १४ ते १६; जेधेशका व करीणा. (१३) शिभा २१।२. (१४) शिभा २०।६१. (१५) सभासद पृ. २०. (१६) शिभा २०।२५ ते ३०; जेधेशका, करीणा, पोवाडा पृ. १९ ते २१; सभासद पृ २० व २१. (१७) शिभा २१।७० ते ७३. (१८) पोवाडा पृ. १७. (१९) सभासद पृ.२०; शिभा २१।२२. (२०) सभासद पृ. २० व २१; पोवाडा पृ. १६ (२१) शिभा २१।१२ ते २३; पोवाडा, सभासद पृ. २० व २१. (२२) सभासद पृ. २१; पोवाडा पृ. १६. (२३) पोवाडा पृ. १७; शिभा २१।१७. (२४) सभासद पृ. २१. (२५) सभासद पृ. २२. (२६) शिभा २१।२४ ते २६. (२७) पोवाडा पृ. १८ ते २०; शिभा २१।२८

ते ३३. (२८) सभासद पृ. २२, पोवाडा, जेधेशका, करीणा, शिभा २१।४०. (२९) शिभा २१।४३ ते ४६. (३०) शिभा २१।७६ ते ७८. (३१) पोवाडा, सभासद पृ. २२. (३२) शिभा २१।८०. (३३) शिभा २१।८४; जेधेशका; शिचप्र पृ. ५७. (३४) पोवाडा पृ. १५ व १६. (३५) जेधेकरीणा; शिचसा ६; वाईचे यादीनामे. याशिवाय पुढील आधार अवश्य पाहावेत:— शिचवृसं २। पृ. ३५, ६०; भाग ३ पृ. ६४ व ६५ आणि १९; पसासंले. ७९१, ७९९, ८१२.

पुढील ग्रंथांतील शिवकालीन लिखाण शिचवृसं भाग २ व ३ मध्ये व कांही इलियट ॲन्ड डौसनच्या सातव्या खंडांत अंतर्भूत आहे. (१) आलमगीरनामा (२) मुंतखबुल्लुबाब. (३) मआसिर-इ-आलमगिरी. (४) मुहम्मदनामा. (५) तारीख–इ–अली. (६) अलीनामा. (७) हफ्त कुर्सी. (८) बसातीनुस्सलातीन.

* * *

# १३ : महाराज



राजगडावर आईसाहेब तळमळत होत्या. एकच चिंता. प्रतापगडाखाली काय झालें असेल ? त्यांनी सारा भार भगवतीवर टाकला होता. पण मन प्रतापगडाकडे धावत होतें. ऊर धडधडत होतें. मंगल महत्त्वाकांक्षांचा गणपति, आईसाहेबांनी हृदयाच्या ताम्हनांत ठेवून आसवांत बुडविला होता. हात जोडून आर्ततेने त्या त्याला आळवीत होत्या. त्यांचें मन एका निमिषांत हजारदा प्रतापगडाच्या बुरुजापर्यंत धावत होतें. गडावरून घारीसारखें भिरीभिरी खाली पाहात होतें. ओक्साओक्सी रडत होतें. पुन्हा पुन्हा जगदंबेला विनवीत होतें की, तुझ्या शिवबाला तूंच सांभाळ !

आणि प्रतापगडावरून राजगडाकडे हसत, उधळत, दौडत, बागडत महाराजांचा बातमीदार थैली घेऊन आला. प्रतापगडावरून थैली आली. बातमी आली.[१]

राजगडच्या दरवाजांनी, बुरुजांनी, तटकोटांनी, वृक्षलतांनी, तोफांनी, बंदुकांनी, नगाऱ्यांनी, चौघड्यांनी, शिंगा-कर्ण्यांनी, ध्वजांनी अगदी अधीर होऊन, चित्रासारखें स्तब्ध होऊन, डोळे ताणताणून प्रतापगडच्या बातमीकडे जिवाचे कान टवकारले. एकमेकांच्या हृदयाचे ठोके एकमेकांना ऐकूं येऊं लागले. बातमी आली ! काय झालें प्रतापगडाखाली ? काय ? काय ? काय ?

—आणि दिवाळीच्या दारूसारखी बातमी राजगडावर फुटली ! सप्तरंग उधळीत फुटली ! देवद्वेष्टा अफजलखान महाराजांच्या हातून ठार झाला ! खान पुरा झाला ! महाराज फत्ते झाले ! प्रतापगड फत्ते झाला !

ही बातमी ऐकतांक्षणींच केवढा केवढा आनंद ! आईसाहेबांचा आाण राजगडचा आनंद आभाळांत मावेना ! खान मेला ! खानाची गर्दन उडाली ! राजगडच्या नगाऱ्यांनी आणि चौघड्यांनी आनंदाने थाड थाड छाताडें बडवून घेण्यास सुरुवात केली. शिंगे-कर्ण्यांच्या हसण्या-खिदळण्यास ऊत आला. बंदुकांनी आणि तोफांनी तर गर्जून गर्जून आकाशपाताळ धुंद करून टाकलें. खान खतम् झाला ! महाराष्ट्राची महन्मंगला भगवती तुळजाभवानी संतुष्ट झाली. आईसाहेब तुष्टल्या. सारे अपमान धुवून निघाले. आईसाहेबांनी गडावर साखरा वांटल्या. नगारे, कर्णे केले. भांडीं वाजविलीं. मोठी खुशाली केली.[१] आईसाहेबांनी आसवांत बुडवून ठेवलेल्या हृदयाच्या ताम्हनांतल्या मंगल महत्त्वाकांक्षेच्या गणपतीने उसळी मारली.

आईसाहेबांच्या आणि अवघ्या मावळ मुलखाच्या उरीं चिंतेचा डोंगर पडला होता, तो उमळून दूर फेकला गेला. हौस होती अफजलखान मारावा. ती हौस शिवबाने पुरविली. जणू जगदंबेची ओटी खानाच्या मुंडक्याने भरली गेली. संभाजीचें उसनें फिटलें.

महाराजांनी खानाचें मुंडकें प्रतापगडावर नेलें होतें. त्यांनी खानाचा देह रिवाजरीतीप्रमाणे सन्मानपूर्वक दफन करविला. खानाच्या मुंडक्याला त्यांनी पिंजरा केला.[२] म्हणजे एक प्रकारच्या वेष्टणांत तें घातलें. मुंडक्याचा तो पिंजरा त्यांनी लगेच राजगडास रवाना केला.[२] आईसाहेब राजगडावरच होत्या. त्यांना पाहावयासाठीच शिर तिकडे पाठविलें असणें अगदी स्वाभाविक नाही का ?

तें मुंडकें राजगडावर आलें. तें पाहून आईसाहेबांच्या हृदयांत कोणते भाव आले असतील ? त्यांत संतोष होता यांत शंकाच नाही. कारण त्यांच्याच सांगण्याप्रमाणे संभाजीचें उसनें फिटलें होतें. खान उघड-उघड वैरीच होता. पण तरीहि खानाच्या देहाची वा शिराची विटंबना

महाराजांकडून किंवा आईसाहेबांकडून यत्किंचितहि झाली नाही. मराठ्यांची अन् त्यांतल्या त्यांत या मायलेकरांची ती रीतच नव्हती. ह्यातभर असंख्य शत्रूंशीं ते भिडले व लढले. असंख्य शत्रु त्यांनी कापून काढले. पण कोणत्याहि शत्रुवीराच्या प्रेताची विटंबना त्यांनी कधीहि केली नाही. अफजलखानाच्या प्रेताचीहि विटंबना केली नाही. महाराजांचें वैर अफजलखानाशीं होतें. त्याच्या प्रेताशीं नव्हतें. खानाचें शिर राजगडावर पाठवितांना तें नेणाऱ्या मंडळींना महाराजांनी हुकूम दिला होता की, खानाचें शिर राजगडच्या बालेकिल्ल्याच्या दरवाजावर असलेल्या कोनाड्यांत बसवा आणि त्याची पूजाअर्चा व नैवेद्य नित्य चालवा ![१] त्याप्रमाणे व्यवस्था राजगडावर करण्यांत आली.[२]

गनिमाचा फन्ना उडविल्यानंतर कान्होजी जेधे, बांदल, मोरोपंत, तान्हाजी, नारोपंत वगैरे सर्व जिवलग पराक्रमाची शर्थ करून प्रतापगडावर आले. सर्वजण लालीलाल झाले होते. गडावर विजयाचा आनंद उसळत होता. सकाळचा प्रतापगड आणि आत्ताचा प्रतापगड यांत सुतकसोयराइतकें अंतर होतें. रक्तांत निथळून आलेल्या आपल्या जिवाच्या सोबत्यांना महाराज उराउरीं कडकडून भेटत होते.[३] प्रचंड म्हणजे अगदी आस्मानी फत्ते झाली होती. कित्येक महिने अहोरात्र केलेले श्रम फत्ते झाले होते. फत्तेमुबारकीच्या तोफा सुटत होत्या.

पण विश्रांति घ्यायला महाराजांना अन् कोणालाच सवड नव्हती. जखमी झालेल्या वीरांची व मरण पावलेल्यांचीहि व्यवस्था लावायची होती. महाराज जातीने निघाले. अति आस्थेने आपल्या व शत्रुच्याहि जखमी लोकांची व्यवस्था त्यांनी लावली. महाराजांचे बरेच लोक पडले होते. त्यांची दखल त्यांनी कसोशीने घेतली.

लूट गडावर जमा होत होतीच. अनेक लोक जंगलांत दडून बसले होते. कित्येक संधी साधून पळाले होते. घोरपडे त्यांतच पळाले.

कोयनेच्या काठाने धडपडत पळाले. फाजलखान, मुसेखान, याकूतखान, अंकुशखान, हसनखान वगैरे वीरहि ठेचाळत, कोलमडत पळाले. मसूरचा सुलतानजी जगदाळेहि पळाला. आणखी एक महत्त्वाकांक्षी बहाद्दर पळाले. त्यांचें नांव प्रतापराव मोरे. त्यांना जावळीचें राज्य हवें होतें! पण खानहि गेला, जावळीहि गेली आणि मनोराज्यसुद्धा गेलें! खानाच्या फौजेची न भूतो न भविष्यति दाणादाण उडाली. प्रतापरावांना जावळीचें अखेरचें दर्शन जीव घेऊन पळत असतांना होत होतें. पुन्हा मोऱ्यांना जावळी दिसलीसुद्धा नाही! पळाले![४]

झाडी दाट दाट, त्यांतून काळाकभिन्न काळोख. त्यांतूनच जिवाच्या आशेने अनेकजण धडपडत निसटले. शेकडोजण आधीच कैदेंत पडले. पण एक माणूस आता अंधारांतून चाचपडत चाचपडत त्या भयाण जंगलांतून लपत लपत वाट काढीत होता. तो भांबावला होता. जिवाच्या आशेने तो अंधारांतून तोंड लपवीत धडपडत चालला होता. कोण हा?

खंडोजी खोपडे देशमुख! स्वराज्याशीं हरामखोरी करणारा तो स्वार्थी, दगलबाज, भेकड फितूर![२] खंडोजी खोपडा! त्याला महाराजांच्या प्राणाची, देवाधर्माची, स्वराज्याचीहि पर्वा वाटली नाही. अफजलखानाला सामील झाला. तिथे तरी निष्ठा? नाहीच! खान मेला आणि हा बेवकूफ हरामखोर लपत छपत जगायची इच्छा करीतच पळत होता. खंडोजी खोपडे पळाला.

पण कुठे जाणार? खान तर मेला. आता वाली कोण? आज ना उद्या आपण नक्की सापडणार आणि महाराज नक्की आपल्याला ठार मारणार, ही भीति त्याला वाटत होती. खंडोजी खोपडा जावळीच्या जाळींतून पळाला आणि दूरच्या जंगलांत तो दडून राहिला.[२] तो विचार करीत होता की, आता जगायचें कसें?

प्रतापगडचा वणवा शमला असें पाहून मग खंडोजी एके दिवशी

चोरून बाहेर पडला. आणि त्याने आपला एक पोरगा, म्हणजे नोकर, गुपचूप हैबतराव शिळमकरांकडे पाठविला. हैबतराव शिळमकर महाराजांचे सरदार होते. ते निष्ठेने महाराजांच्या संगतीला राहिले. त्यांनी मोठी समशेर गाजविली. महाराजांची शाबासकी मिळविली. हैबतराव म्हणजे महाराजांचा सखा. शिळमकरांच्या कुळाला भूषण झालें. असे हे हैबतराव खंडोजी खोपड्याचे जावई होते.[२] जावई इमानाला जागून महाराजांची पाठराखण करीत होता आणि सासरा लाज सोडून महाराजांच्या अन् स्वराज्याच्या दुष्मनाच्या उष्ट्या पत्रावळी गोळा करीत होता.

तितक्याच निलाजरेपणाने सासऱ्याने जावयाकडे आताहि पोरगा पाठवून कळविलें की, मी जगून वांचून निसटलों आहें; पण माझ्या उरीं महाराजांचा धाक बसला आहे. सांगा आता काय करूं नि कसें करूं तें ?

खोपड्याला धीर निघेना. पोरग्याच्या मागोमाग खंडोजी स्वत: हैबतराव शिळमकरांकडे गेला. नको असलेलें हें अवघड दुखणें त्यांच्याकडे पायांनी चालत आलें ! आता हा सासरा काय मागणें मागतो ? खंडोजी हैबतरावांना म्हणाला,[२]

" याउपर आमचा विचार महाराजांचें अभय घ्यावें असा आहे ! "

हैबतराव शिळमकरांच्या डोळ्यांपुढे काजवे चमकले. महाराजांना भीड घालायची ? महाराजांच्या समोर उभें राहिल्यावर शब्द तरी निघेल का तोंडांतून भिडेचा ? अन् महाराज ऐकतील ? संतापतीलच ! शिळमकरांच्या डोळ्यांपुढे जणू संतापलेले महाराजच दिसूं लागले. आग नुसती ! कसें सांगायचें या विस्तवाला की, एवढा तेलाचा बुधला पदरांत घे म्हणून ? जाळून खाक करील की तो !

शिळमकर हैबतराव कांहीच बोलले नाहीत. पण मुकाट उठले आणि प्रतापगडाखाली जावळीला आले. कान्होजी नाईक जेध्यांचा मुक्काम

जावळींत होता.[२] हैबतराव अवघड चेहरा करून कान्होजी नाइकांच्या पुढे गेले. कान्होजींनी जाणलें की, हैबतराव मनांत कांहीं तरी जिन्नस धरून आले खास. काय व्येतावर येणें केलें असेल ? आणि मग हैबतरावांनी कान्होजी नाइकांना सासऱ्याचें अवतारकार्य सांगितलें.[२] कान्होजींनी निपचीप ऐकून घेतलें. खंड्या खोपडा लढाईतून जिवंत सुटला. आता जगायला बघतोय. पण आता कठीण ! आता खंड्या महाराजांच्या तलवारीखालून सुटत नाही ! एक दिवशीं राजाच्या भवानीचा तडाखा खंड्या खाणार ! कान्होजींनी महाराजांना चांगलें बयाजवार जाणलें होतें. त्यांनी खोपड्याचें भविष्य ओळखलें. महाराजांच्या समशेरीला अन् शिस्तीला लवचीकपणा ठावाच नाही. वाकडा गेला की तुकडा पडायचाच ! पण आता ? हैबतरावांनी कान्होजींना म्हटलें,[२]

" नाईक, तुमची भीड महाराजांपाशी आहे. तुम्ही खंडोजी खोपडे यांचा जीव-वतन वांचवून यश घ्या ! "

म्हणजे ? महाराज कान्होजींचें ऐकतील ? हो ! ऐकतील, असें हैबतरावांना वाटत होतें. कान्होजींनी महाराजांची आजवर जिवापाड सेवा केली आहे. भोसल्यांच्या शब्दांखाली त्यांनी चोवीस वर्षे देह राबविला आहे. महाराजहि कान्होजींना वडिलांप्रमाणे मानतात. मग एवढी दयेची रदबदल मानणार नाहीत काय ? महाराज मानतील. आपल्या माणसांपुढे महाग होणार नाहीत, असें हैबतरावांना वाटत होतें.

कठीण काम कान्होजींच्या गळ्यांत आलें. आता हा गळून पडलेला रोगट आंबा पुन्हा झाडाला कसा चिकटवायचा ? कान्होजी पेचांत पडले. साफ नाही म्हणावें, तर तसें म्हणवेना. कारण खोपडा पडला हैबतरावाचा सासरा. शिवाय रोहीडखोऱ्यांतला शेजारी. म्हणून कान्होजी नाईक उठले. महाराजांकडे निघाले. काय बोलायचें याचा विचार

करीत ते गड चढूं लागले. शंभर मणांचें ओझें शिरावर असल्यागत त्यांची चाल जड पडत होती.

कान्होजी गडांत शिरले. ऊर धडधडूं लागलें. मनाचा हिय्या करून तसेच ते महाराजांपुढे एकांतीं गेले.[२] नाईक कांही तरी नाजुक बोलायला आले हें महाराजांनी हेरलें. कान्होजींनी धाडस करून शब्द काढला.[२] उत्रवळीचा खंडोजी खोपडा जिवंत निभावला आहे, आणि आता कसा पस्तावला आहे, याचें सगळें वर्तमान नाइकांनी महाराजांना सांगितलें. महाराज ऐकून घेत उगी राहिले. त्यावर कान्होजी नाइकांनी धीर करून म्हटलें,[२]

"महाराज,....खंडोजी खोपड्यास अभय द्यावें!"

कान्होजी नाइकांनी एवढें म्हणायचा अवकाश. महाराज एकदम भडकले. जणू आगीन परजळली! वीज कडकडली!

"तो हरामखोर! त्यास वतनास ठिकाण नव्हता; त्याची वतनदारी स्थापना आम्हीं केली. निमें वतन, सिक्का आम्हीं दिल्हा. यैसे असोन त्याणें बेइमानी करून अफजलखानाकडे जाऊन लबाडी केली आणि हतेर धरिलें! तो हरामखोर! त्याचीं चार धडें चौ मार्गीं टाकावीं! त्याची रदबदली तुम्हीं न करणें! त्यास आम्ही कौल देत नाही!!"[२]

विश्वासघातकी स्वराज्यद्रोह्यांबद्दल महाराजांना काय वाटतें, तें स्वच्छ कळून चुकलें. अशा द्रोह्यांचे तुकडे तुकडे करून चौ मार्गीं फेकले पाहिजेत, असें ते गरजले. झालें! संपलें रदबदलीचें कामकाज! कान्होजींना हा अंदाज होताच. पण अजून एकवार आर्जवांची विनंती करून पाहावी म्हणून कान्होजी उठून उभे राहिले आणि नम्रपणें अर्जी बोलले,[२]

"महाराज, खंडोजीचा गुन्हा आम्हाला द्यावा आणि त्याचा जीव वांचवावा. वतन चालवावें."

कान्होजींनी यैसी अतिशयाची रदबदल केली. तेव्हा महाराजांनी विचार केला की, नाइकांसारखा दौलतीचा कदीम अर्कान अर्ज करतो आहे. न मानावा तर सखा दुखावतो. मानावा तर फितूर सुखावतो. काय करावें ? पण महाराज मोठे चतुर कारीगर. चलाख बुद्धिवंत. त्यांनी आपला राग विझविला आणि नाइकांस म्हटलें,[२]

"नाईक, तुम्हीं भीड घातली, यास उपाय नाही. तुमचे भिडेकरिता मान्य केलें. खंडोजी खोपड्यास आणवणें!"

कान्होजी आनंदले. महाराजांनी शब्द मानला. महाराज कधी कोणाचें ऐकणार नाहीत, तें कान्होजींचें ऐकलें. केवढा त्यांच्या शब्दाचा मान झाला. कान्होजी बिगीबिगी तसेच गडाखाली आले. त्यांनी खंडोजीला सांगावा पाठविला की, महाराजांनी तुला तखसीर माफ केली. मुजऱ्याला ये.

खंडोबाचा जीव आनंदाने आभाळाएवढा फुगला. तो कान्होजींपाशी आला. कान्होजी, खंडोजीला घेऊन गडावर महाराजांकडे मुजऱ्याला गेले. महाराज असे समोर बसलेले होते. कान्होजींनी मुजरा घातला. खंडोजीनेहि खालच्या मानेने मुजरा केला. वर मान करून महाराजांकडे बघायची हिम्मत त्याला होईना. महाराजहि कांही बोलले नाही.

आणि मग खंडोजी रोज गडावर मुजऱ्याला जाऊं येऊं लागला.

एके दिवशीं खंडोजी गडावर मुजऱ्यासाठी आला. महाराजांपुढे तो येतांच महाराजांचे डोळे भडकले. दबलेली आग एकदम उसळली. भिवया चढल्या. मस्तकावरचा तुरा गदगदा हिन्काळला. खंडोजीने वर मान केली. एकच निमिष. नजरेला नजर भिडली. खंडोजी प्राणांतिक दचकला! आग भडकली होती महाराजांच्या डोळ्यांत. अन् एकदम महाराज कडाडून ओरडले! त्यांनी आपल्या ढालाइतांना हुकूम फर्मावला की, पकडा या हरामखोराला!

भराभरा ढालाईत धावले. खंड्या जेरबंद झाला ! महाराजांच्या मुद्रेकडे तर बघवतच नव्हतें. महाराजांनी हुकूम सोडला की, या हरामखोर दगलबाजाचा उजवा हात आणि डावा पाय कलम करा ! तोडा ! ![२]

गड हादरला. महाराजांच्या हुकमांच्या विजांनी आणि खंडोजीच्या केविलवाण्या ओरडण्याविनवण्यांनी गड चित्रासारखा चिडीचिप्प झाला. महाराजांचें चित्त किंचितहि द्रवलें नाही. खंडोजीचा उजवा हात आणि डावा पाय तुटला ![२]

शिवाइतके शांत आणि सहनशील शिवाजीमहाराज शिवाइतकेच भयंकर उग्र होते.

गडाखाली कान्होजी नाइकांना ही बातमी कळली. कान्होजी तापले. काय केलें महाराजांनी हें ? हातपाय तोडले ? हा काय न्याव झाला ? दिलेला शब्द मोडला राजांनी ! कान्होजी फार फार तापले. तस्सेच उठले अन् लगबगा खंडोजीकडे धावले. त्याच्या जखमा बांधल्या अन् ताड ताड पावलें टाकीत रागें रागें तडख महाराजांकडे गेले.

महाराजांना ठाऊक होतेंच की, आता नाही तर मग, कान्होजी भेटायला येणार. महाराज जणू इंतजारीच करीत होते. कान्होजी आले. झटपट मुजरा करीत रुसवियाच्या बोलीने कान्होजींनी बोली केली,[२]

" खंडोजीस अभय देऊन शास्ती केली ! आमचे रदबदलेची भीड काय राहिली ? "

कान्होजींना रागावलेलें पाहून महाराज अतिशय समजुतीच्या गोड आर्जवी शब्दांत कान्होजींना म्हणाले,[३]

" नाईक, तुमचे भिडेकरिता खंडोजी जिवें मारिला नाही. त्याने ज्या हातें तरवार धरिली तो हात कापिला. ज्या पायाने चालोन गेला तो पाय कापिला ! "

....नाहीतर तो हरामखोर! त्याचीं चार धडें चौ मार्गी टाकावीं ऐसी त्याची लायकी! परंतु त्यास ठार मारणार नाही, असें महाराज म्हणाले होते. त्याप्रमाणे त्याला जिवंत सोडला. पण त्याने केलेला भयंकर गुन्हा क्षमा करण्यासारखा होता काय? स्वराज्याशीं भयंकर हरामखोरी करून कोणीहि सुखरूप सुटूं लागला तर लोक म्हणतील की, या राज्यांत कसेंहि वागलें तरीहि चालतें! पश्चात्ताप लिहून दिला की, माफी पदरांत पडते! लोकांचा असा समज होणें योग्य नाही. राज्यावर सलाबत राखायची असेल, तर अशा स्वराज्यद्रोही गुन्हेगारांना कडक शासन केलेंच पाहिजे. नाहीतर हें स्वराज्य फितुरी-हरामखोरीपायीं रसातळाला जाईल!

महाराजांचें चुकलें? महाराज कान्होजींना ही स्वराज्याची जबाबदारी अति मायेच्या गोड शब्दांत समजावून सांगत होते. वास्तविक कान्होजींना हें न सांगतांच समजावयाला हवें होतें. पण मायेममतेच्या पोटीं माणसाला कर्तव्याचें भान राहात नाही. पण राज्य करायचें असेल तर राज्यकारभारांत कोवळी माया उपयोगी ठरत नसते. राजधर्म फार फार जोखमीचा आहे. अनेकांना तो पेलत नाही. आणि मग स्वराज्यें बुडतात! ठार बुडतात!

कान्होजी नाइकांना हें अगदी मनोमन पटलें. महाराज म्हणतात तेंच खरें. पृथ्वीमोलाचें! आपणच अशी हरामखोरांची वेडी माया धरूं नये. आणि नाईक हसले. रुसले होते ते हसले. त्यांना पटलें की, आपल्या मराठ्यांचा हा महादेव नाही चुकत कधी.

....आणि कान्होजींनी महाराजांना हसून मुजरा घातला!

* * *

---

**आधारः**—(१) जेधे करीणा व सभासद. (२) जेधे करीणा. (३) सभासद पृ. २४. (४) शिभा. शिवाय जेधे शकावली व जेध्यांचे कागद.



# १४ : शाहीर अज्ञानदास

महाराज अफजलखानास 'पुरून' उरले! कधी नव्हता झाला असा आनंद आईसाहेबांना झाला. त्यांच्यासारख्याच तळतळणाऱ्या कितीतरी आयांचीं मनें निवलीं. महाराजांचें करवलें तितकें कौतुक आईसाहेबांनी केलें. परंतु तें आईचें मन थोड्या थोडक्या कौतुकावर तृपेना. त्यांच्या अतृप्त मनांत एक कल्पना चटकन् आली. कल्पना अशी आली की, शाहिराकडून ह्या पराक्रमावर पोवाडा म्हणवावा. घाई घाई आईसाहेबांनी अज्ञानदास शाहिराला सुपारी धाडली.[१]

अज्ञानदास शाहीर गडावर धावत आला. शाहिराच्या प्रतिभेला स्फुरण आलें. शब्दांचे पैंजण पायीं बांधून अज्ञानदासाची प्रतिभा डफाभवती रिंगण धरून नाचूं लागली. त्याने असा गुंजावणी पोवाडा बांधला की, सराफ-पटवेकऱ्यांनी पटवलेली हिऱ्या-मोत्यांची जणू चिंचपेटी! अज्ञानदासाच्या वाणींत विलक्षण जादू भरली होती. नामर्दालाहि वीरश्री चढावी! मर्दांचे तर भानच उडावें! त्याने कानावर नुसता हात ठेवून धारदार आवाजांत ललकारी दिली की, जमिनीवर ठेवलेली काडी, डफ, झांजा, तुणतुणीं जागच्या जागीं जणू आपोआप आवाज करीत थयथय नाचूं लागावींत! संजीवनी होती त्याच्या शब्दांत. त्याच्या कंठांत. त्याच्या जिभेवर उभी राहून प्रत्यक्ष सरस्वतीच जणू वीररस उधळी! लौकरच गडावर जखमनाम्याचा दरबार भरला. युद्धांत कामगिरी बजावलेल्या सर्व धारकऱ्यांचा मानसन्मान करण्याकरिता महाराजांनी दरबार भरविला. आनंदाच्या लाटा दरबारांत उठत होत्या. पूर्वीची व्याकुळ चिंता आता

शोधून सापडत नव्हती. दरबारांत सर्वजण होते. त्यांत कान्होजी जेधेहि होते. राजाची सभा दाटली होती. एवढ्यांत दरबारांत एकदम डफावर झणझणीत थाप पडली. महाराजांसकट सर्वांच्या नजरा तिकडे खेचल्या गेल्या. तुणतुण्याची तार झंकारली. झांजांची झिणझीण साथ देऊन उठली. खंजिरी तडाडली. घुंगरांनी नाद घुमविला आणि मर्दानी आवाजाची ललकारी दरबारचें काळीज फुलवीत फुलवीत आरपार गेली.

महाराजांना आणि राजसभेला शाहिरी मुजरा ठोकून अज्ञानदासाने गणगौरीला आवातन दिलें,

*यश जगदंबेचें । तुळजा प्रसन्न शिवराजाला..*



माझें नमन आधीं गणा । सकळिक ऐका चित्त देऊन ॥
नमियेली सारज्या । त्याली जडिताचें भूषण ॥
अज्ञानदासाचें वचन । नमिला सद्गुरु नारायण ॥
सद्गुरुच्या प्रसादें । संपूर्ण अंबेचें वरदान ॥
गाइन वजिराचें भांडण । भोसल्या सरजा दलभंजन ॥
फौजेवर लोटतां । यशवंत खंडेश्वरी प्रसन्न ॥
अज्ञानदास बोले वचन । गाइन राजाचें भांडण ॥
देश इलाइत । काबिज केलें तळकोंकण ॥

सारा दरबार जास्तच खुषींत आला. सगळा जीव आता पोवाड्याकडे लागला. ताजा ताजा पोवाडा, खानाच्या वधाचा पोवाडा आणि रचणारा अन् गाणारा अज्ञानदास शाहीर. काय सांगावी त्याची चव ! भरल्या वांग्याची भाजी अन् लसणाची तळलेली चटणीसुद्धा त्याच्यापुढे फिक्कीच !

अज्ञानदासाने चौकापुढे चौक ओलांडायला सुरुवात केली.

गड मी राजाचे गाइन । कोहज माहुली भर्जन ॥
पारगड कर्नाळा । प्रबळगड आहे संगिन ॥
मस्त तळा आणि घोसाळा । रोहरी आनसवाडी दोन ॥
कोरला, कासागड मंडन । दर्यांत दिसताती दोन ॥
गड बिरवाडी पांचकोन । सुरगड अवाचितगड भूषण ॥
कुबल गड भीरिका । कुर्डुगडाचें चांगुलपण ॥
घोडप तळकोंकणचे किल्ले । घाटावरले गड गाइन ॥
देश दुनिया काबिज केली । बारा माउळें घेतलीं ॥
चंद्रराव कैद केला । त्याची गड जाउली घेतली ॥
चेतपाउली काबिज केली । ठाणीं राजाचीं बैसलीं ॥
घेतली जाउली न माहुली । कल्याण भिवंडी काबिज केली ॥

सोडविलें तळकोंकण । चेउलीं ठाणीं बैसविलीं ॥
कूबल, बांकी घरें । शिवराजाच्या हाता आलीं ॥
मुलाना हामाद । फिर्याद बाच्छायाप गेली ॥
बाच्छायजादी क्रोधा आली । जैशी अग्न परजळली ॥
जित धरावा राजाला । कुल वजिरांला खबर दिली ॥

अफजलखानाने भरदरबारांत प्रतिज्ञा केली आणि त्याने मोहिमेचा विडा उचलला. विजापुराबाहेर खान डेरेदाखल झाला.

खान कटबंद केला । कोटाबाहेर डेरा दिला ॥
मोठा अपशकुन जाहला । फत्यालसकरा हत्ती मेला ॥
खबर गेली बाच्छायाला । बिनीचा हत्ती पाठविला ॥
बारा हजार घोडा । अबदुलखानालागीं दिला ॥

पोवाडा रंगत चालला, दणाणत चालला. पोवाडयाची जडणघडण अशी कडकडीत होती की, महाराजांसकट साऱ्या दरबाराचें चित्त अज्ञानदासाने आपल्या कबजांत घेतलें. घडलेल्या—नव्हे घडविलेल्या करामतीचें चित्र तो सहीसही डोळ्यांपुढे उभें करीत होता. लोक ऐकण्यांत तल्लीन झाले होते.

तेथुनि कुच केलें कटकाला । अबदुल फौजेने चालिला ॥
मजलीवर मजल । अबदुल.तुळजापुरा आला ॥
फोडिली तुळजा । वरती मसुदच बांधिली ॥
मसुद बांधुनी । पुढें गाय जब केली ॥
अबदुलखान फोडी देवीला । 'कांहीं एक अजमत दाव मला!'॥
कोपली भद्रकाळी । बांधुनी शिवराजाप दिला ॥
अंबा गेली सपनांत (ला) । कांही एक बोले शिवराजाला ॥
'बत्तीस दातांचा बोकड । आला वधायाला ! ॥'
तेथुनि कुच केलें कटकाला । अबदुल वाईलागीं आला ॥

आपुल्या मुलखांत राहिला । कोट बांधुन पिंजरा केला ॥
बरेपणाचा कागद (देऊन) । हेजिब महाराजाप गेला ॥
राजा पुण्यांत मस्त झाला । देश पाठीशीं घेतला ॥
सोडुन दिले किल्ले । डेरा जाउलींत दिला ॥
राजा जाउलींत राहिला । हेजिब अबदुल्याचा आला ॥
हेजिब बोले महाराजाला । 'खान बऱ्यापणाशीं आला ॥
खानाला भेटतां । थोर बाच्छाये सल्ला झाला' ॥
राजा बोले हेजीबाला । 'कशाला बोलावितां वाईला? ॥
किल्ले गड कोट । दवलत खानाच्या हवाला ॥
जाउली खानाच्या हवाला । लिहून देतों हेजिबाला ॥
बैसूं दोघेजण । खान बुध सांगेल आम्हाला' ॥
लुगडीं दिलीं हेजीबाला । हेजीब बेगीं रवाना झाला ॥
हेजीबाची खबर ऐकुनी । अबदुल महाभुजंग झाला ॥
अबदुलखान (नें) कऊल दिला । रोटीपीर पाठविला ॥
'भिऊं नको शिवाजी भाई । आहे तेरा मेरा सल्ला ॥
तुझे गड तुझ्या हवाला । आणिक दवलत देतों तुला ॥
तुझी थोडीशी गोष्ट । क्रिया शहाजीची आम्हाला' ॥
इकडे कऊल पाठविला । (पण) शीलचा राऊत निवडिला ॥
हत्तीचे पायीं तोरड । लाविला गजढाला ॥
नदरे पडतां । दस्त करा शिवराजाला ॥
राजा हेजीबासी बोलतो । "खंड काय मला मागतो ॥
चउआगळे चाळीस गड । मी अबदुलखानालागीं देतों ॥
मजवर कृपा आहे खानाची । जावलींत सदरा सवारितो ॥
तेथें यावें भेटायाला । मी खानाची वाट पाहतों" ॥
हेजिब तेथुनि निघाला । अबदुलखानाजवळ आला ॥

अनुक्रमांक २४४८०
१५८
१२-२-५९

## भाग तिसरा

अफजलखानाने जावळीच्या खोऱ्यांत येण्याचें कबूल केलें आणि त्याने फौजेसह वाईहून जावळीकडे कूच केलें.

हत्तीचे पायिं तोरड ज्याला । वरी सोडल्या गजढाला ॥
फौजामागें फौजा । भार कडक्याने चालला ॥
रडतोंडीच्या घाटाखालीं । अबदुल सारा उतरूं दिला ॥
इसारत सरज्याच्या लोकांला । ज्यांणीं घाट बळकाविला ॥
मागल्याची खबर नाही पुढिल्याला । कटकाची खबर कैची त्याला ॥
जाऊं जाणें येऊं नेणें । ही गत झाली अबदुल्याला ॥
जावलींत उतरूनी । अबदुल दिशीभुला जाहला ॥
राजानी सदरा सवारिल्या । गाद्या पडगाद्या घातल्या ॥
तिवाशा जमखान टाकिले । सदर पिकदाण्या ठेविल्या ॥
सुरंग चारी खांब सदरेचे । वरी घोंस मोतीयांचे ॥
माणिकाच्या भरणी । हारी मोत्यांच्या बसविल्या ॥
दुसरे सदरेची मांडणी । सूर्य लखलखतो गगनीं ॥
माणिकाचे ढाळ । सदरे सुवर्णाचें पाणी ॥
काचबंदी पटांगणाचा ढाळ । कापुर कस्तुरी परिमळ ॥
तिसरे सदरेची मांडणी । हिरे जोडिले खणोखणीं ॥
वाळियाच्या झांजी । दवण्याचे कुंड घालोनी ॥
बराणपुरी चिटाचे । आडोआड पडदे बांधुनि ॥
चाउंकोनी चारी समया । चांदवा जडिताचा बांधोनी ॥
घोंस मोतियांचे । वर ठिकडी नानापरिची ॥
अवघी जडिताची लावणी । हिरे जोडिले खणोखणीं ॥
बहुत सवारिल्या सदरा । ऐशा नाहीं देखिल्या कोणी ॥
राजा नवगजींत बैसला । मोरो शाम बोलाविला ॥
रघुनाथ पेशवे । नारो शंकर पाचारिला ॥

दहातोंडया माणकोजीला । त्या इंगळ्या सुभानजीला ।।
देवकांत्या जीवाजीला । राजानें बोलाविलें तुम्हांला ।।
करनखऱ्या सुभानजीला । वेलदारा पिराजीला ।।
सरसुभाजीला । पालीकर नेतोजीला ।।
त्या बोबडया बहिरजीला । सरदार आले भेटायला ।।
राजा विचारी भल्या लोकांला । "कैसें जावें भेटायला ?"
बंककर कृष्णाजी बोलला । "शिवबा सील करा अंगाला"
भगवंताची सील ज्याला । आंतून, (तो) बारीक झगा त्याला ।।
मुसेजरीच्या सुरवारा । सरजा ( जें ) बंद सोडुन दिला ।।
डावे हातीं बिचवा त्याला । वाघनख सरज्याच्या पंजाला ।।
पटा जिव म्हाल्याप दिला । सरजा बंद सोडुन चालिला ।।
"माझा रामराम दादानु !" । गडच्या गडकऱ्या बोलिला ।।
जतन भाईनु करा । आमच्या संभाजीराजाला ।।
सराईत उमाजी राज्य ( राजा ) । होईल तुम्हांला ।।
गड निरवितो गडकऱ्याला । राज्य निरवितो नेतोजीला ।।
निरवानिरव दादानु । विनंति केली सकलीकांला ।।
"येथुनि सलाम सांगा । माझा शहाजी महाराजाला" ।।

आणि अज्ञानदास खास मुलाखतीच्या शामियान्यांत आला. खानाच्या आणि महाराजांच्या खाशा भेटीचा तुकडा तो दरबारांत गाऊं लागला—

इतक्या उपरी राजा बोले । त्या अबदुलखाला ।।
"खाना ज्याची करणी त्याला । कांहींएक भ्यावें रघुनाथाला ।।
तुम्ही जातीचे कोण । आम्ही जाणतों तुम्हाला" ।।
यावर अबदुल बोलला । "शिवा तुम चलो विजापुराला" ।।

यावर खानाची आणि महाराजांची शाब्दिक झटापट झाली. खानाला आला राग आणि—

इतकिया उपरी । अबदुल मनीं खवळिला पुरा ॥
कव मारिली अबदूल्याने । सरजा गवसून धरला सारा ॥
चालविली कट्यार । सीलवर मारा न चाले जरा ॥
सराईत शिवाजी । त्याने बिचव्याचा मारा केला ॥
उजवे हातीं बिचवा त्याला । वाघनख सरज्याच्या पंजाला ॥
उदरच फाडुनी । खानाची चरबी आणिली द्वारा ॥
खान 'लव्हा लव्हा' बोलिला । खानाचा लव्हा बेगिन आला ॥
अबदूलखान शिवाजी दोनी । भांडती दोनी धुरा ॥
बारा हजार घोडा । सरदार नाहीं कोणी तिसरा ॥

खान निघाला–खान आला–खान मारला–फौज कापली–लुटली! अज्ञानदास हातवारे करकरून आवेशांत गात होता. मधूनमधून न कळत दरबारी श्रोत्यांतून शाबासकी मिळत होती. आणि अज्ञानदास चौकांत उतरला,—

अज्ञानदास विनवी श्रोत्यांला । राजा अवतारी जन्मला ॥
नळ नीळ सुग्रीव जांबूवंत । अंगद हनुमंत रघुनाथाला ॥
एकांगी भांडण । जैसें रामरावणाला ॥
तैसा शिवाजी सरजा । एकांगी नाटोपे कवणाला ॥
दृष्टी पर्यंस शिवाजीला । कलीमधीं अवतार जन्मला ॥
विश्वाची जननी । अंबा बोले शिवाजीला ॥
मोठे भक्तीचें फळ । महादेव भाकेला गोंविला ॥
जिकडे जाती, तिकडे । यश राज्याच्या खडाला (खड्गाला) ॥
माता जिजाऊ बोलली । पोटीं अवतार जन्मला ॥

शंकपाळ शिवाजी महाराजाने केला । आतां मी गाईन ।
भोसले शिवरायाच्या ख्याति ॥
दावा हेवा जाण । अखेर संग्रामाच्या गति ॥
राजगड राजाला । प्रतापगड जिजाऊला ॥
धन्य जिजाऊचे कुशीं । राजा अवतार जन्मला ॥
आपल्या मतें अज्ञानदासाने । वीरमाल राज्याचा गाइला ॥
यश जगदंबेचें । तुळजा प्रसन्न शिवराजाला ॥

पोवाडा संपवतां संपवतां अज्ञानदासाने कान्होजी जेध्यांकडे आणि त्यांच्या शेजारींच बसलेल्या बांदलांकडे हात करीत दोन ओळी मोठ्या झोकांत उठवल्या – ‘ अंगद हनुमान रघुनाथाला । तैसे जेधे बांदल शिवाजीला ऽ ऽ ऽ.... ”

—हा जी ऽ जी रं ऽ जी ऽ जी ऽ रं जी ऽ जी ऽ जी ऽ ! !

—आणि लगेच दरबारांत हसण्याचा आणि वाहवा वाहवाचा नुसता कल्लोळ उडाला ! महाराजांनीहि हसून कौतुक केलें. कान्होजींच्या अन् बांदलांच्या पोटांतून गुदगुल्या उठल्या !

अज्ञानदासाने महाराजांस मुजरा केला. सारा दरबार त्याचें कौतुक करीत होता. आईसाहेबांची तब्यित खूष झाली होती.

महाराजांनी एक शेर सोन्याचा तोडा अज्ञानदासाच्या हातांत घातला. अन् एक उत्तम जातवान् घोडा त्याला बक्षीस दिला.

आणि नंतर सर्व शूर वीरांची पूजा महाराजांनी सुरू केली. मोहरांनी, हिऱ्यामोत्यांच्या अलंकारांनी, भरजरी शेले मंदिलांनीं आणि सोन्याच्या कडीतोड्यांनीं गच्च भरलेलीं मोठमोठीं चांदीचीं असंख्य ताटें पंतांनीं हुजऱ्यांकरवीं दरबारांत आणून महाराजांपुढे हाजीर केलीं. ताटांवर पांघरलेले शेले बाजूला झाले. शिवरायाची गुणग्राहकता आणि औदार्यच त्या ताटांत शिगोशीग भरून झगमगत होतें.

महाराजांनी सर्वांचेंच मनःपूर्वक कौतुक केलें आणि मुक्त हस्ताने एकेका बहाद्दरास बक्षिसी देण्यास सुरुवात केली. कुणाला ओंजळी ओंजळीने मोहरा दिल्या, शेलेपागोटीं दिलीं, कुणाला कडींतोडे, कुणाला मोत्याचे चौकडे, शिरपाव, कंठे, बाजूबंद, कलग्या, तुरे, कुणाला घोडे, हत्ती, पालख्या, चौघडे दिल्याचें जाहीर केलें; तर कुणाला मोहरा अन् ढाल तलवारी दिल्या. केवढें कौतुक केलें. राजा उदार! राजा मायेचा! अशी माया आईनेच करावी! लढाईंत जे सैनिक ठार झाले आणि जे जन्माचे पंगु झाले त्यांच्या घरीं त्यांच्या नांवच्या भरघोस देणग्या रवाना केल्या. त्यांना आडशेऱ्या दिल्या. विधवा झालेल्या मायबहिणींकरिता लुगड्याचोळीचीं वर्षासनें लावून दिलीं.

जे कैद झाले होते, त्या शत्रूंचासुद्धा महाराजांनी परामर्श घेतला! त्यांचा सन्मान केला. जे राहिले त्यांना ठेवून घेतलें. जे नाही म्हणाले त्यांना सन्मानाने विजापुरास पोहोचविण्याची मोरोपंतांना व्यवस्था करण्यास सांगितलें. सिद्दी हिलाल, नाईकजी पांढरे, नाईकजी खराडे वगैरे सरदार खानाबरोबर आले होते, ते महाराजांच्या पदरीं राहिले.

महाराजांनी पंताजी गोपीनाथांस सात हजार होन दिले. शिवाय त्यांना शेला पांघरला. पंताजी काकांनी फारच मोठी कामगिरी केली होती. मग महाराजांची नजर कान्होजी जेध्यांवर वळली. बांदल वगैरे सर्वच देशमुखांचा त्यांनी फारच उत्कृष्ट मानसन्मान केला होता. कान्होजींना काय द्यावें? महाराजांनी कान्होजींना दोन्ही दोन्ही हातांनी देणग्या दिल्या. किती देऊं असें महाराजांस झालें. जणू लक्ष्मीचा तो पति मानवरूप धारण केल्यामुळे अवघ्या दोनच हातांच्या ओंजळीने द्रव्य देण्याचा प्रसंग आल्यामुळे मनांत लाजला होता!

कान्होजी जेधे संतुष्ट झाले. सबंध दरबार खूष झाला होता आणि

समोर सारीं ताटें रिकामीं होऊन पडलीं होतीं. आंतून आईसाहेब कौतुक पाहत होत्या.

महाराजांनी मोरोपंतांना, तान्हाजीला, येसाजीला, जिवा महाल्याला संभाजी कावजीला, बाजी सर्जेराव वगैरे सौंगड्यांस काय दिलें ? खूप खूप दिलें. तें सोन्याचांदींत मोजलें तर संपून जाईल ! महाराजांनी स्वतःलाच देऊन टाकलें होतें त्यांना !

दरबार संपायची वेळ आली. निरोपाचीं तबकें दरबारांत आलीं. महाराजांनी तबकांतली विडासुपारी उचलली आणि कान्होजी जेध्यांस जवळ बोलाविलें. आणि राजसभेतील तलवारीचें मानाचें पहिलें पान कान्होजींना दिलें. कान्होजी मानाच्या पानाचे धनी झाले ! एवढा मोठा मान दुसरा कोणता ?

सर्वजण तुष्टले, संतुष्टले. ऐसा राजा होणें नाही. गर्वरहित, उदार, शूर. गरिबांचा भाऊ. राजांच्या लालनपालनाने सर्व सुखी झाले होते. सर्वत्र आनंद भरून उरला होता. वनीं आनंद ! भुवनीं आनंद ! आनंद आनंदवनभुवनीं.

* * *

---

**आधारः**—(१) पोवाडे—शाळिग्राम पहिली आवृत्ति. इ. १८७९. शिवाय शिभा. सभासदब.

हा पोवाडा दि. १३ जुलै १६६० नंतरच अज्ञानदासाने राजसभेंत म्हटला.

स्थलप्रत.
REFBK-0009872
दा. क. ९८८२

[illegible] ठाणे
[illegible]